# द्वितीय वर्ष कला

## सत्र - IV (CBCS)

## समाजशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. II

# भारतीय समाज : विकासाचे समाजशास्त्र

## विषय कोड : UASOC401

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **श्री. अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि
प्रमुख कला शाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **प्रा. अमित विजय जाधव**
सहाय्यक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **प्रा. शिवाजी उकरंडे**
गोगटे जोगळेकर महाविद्यालय,
रत्नागिरी, जि. रत्नागिरी

: **प्रा. अमित सुवर्णा सिद्धार्थ जाधव**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **प्रा. सर्जेराव बोराडे**
मोहिते कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
कसारा (खोडाला)

: **डॉ. संजय कांबळे**
सहाय्यक प्राध्यापक
शिवाजी विद्यापीठ

: **प्रा. सचिन सनगरे**
सहाय्यक प्राध्यापक,
गोगटे, जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

: **प्रा. प्रशांत नरगुडे**
सहाय्यक प्राध्यापक
आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालय, देवरुख

**एप्रिल २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रनालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | विकास समजून घेताना | ०१ |
| २. | अवलंबित्व सिध्दांत आणि नव उदारवादी सिध्दांतांचा दृष्टीकोन | १४ |
| ३. | मानवी विकास निर्देशांक | २७ |
| ४.अ | सामग्री संकलनाच्या पध्दती सर्वेक्षण | ३३ |
| ४.ब | सामग्री संकलनाच्या पध्दती व्यष्टी अध्ययन | ४३ |
| ५. | जागतिकीकरण आणि विकासाचे संकट - जमीन विस्थापन, वन हक्क कायदा २००६ आणि त्याचा आदिवासी समुदायावर होणारा परिणाम | ५२ |
| ६. | प्रतिकार चळवळी | ६५ |
| ७. | विकासाचा पर्यायी दृष्टिकोन | ७६ |
| ८. | लोककेंद्रित विकासः हिवरे बाजार आणि मेंढा लेखा | १०७ |


❖❖❖❖

**SYLLABUS SYBA SOCIOLOGY**
**SOCIOLOGY Paper II**
**SEMESTER IV (CBCS)**
**SOCIOLOGY OF DEVELOPMENT**

**Course Rationale:**

- To introduce various theoretical perspectives in Indian society that have shaped the concept of development.
- To help students to gain an insight into emerging issues and contemporary debates within the development discourse.

**UNIT I Understanding Development** **12 Lectures**

a. Meaning of Development and theories of Modernization
b. Dependency theory
c. Neo - Liberal Economic approach

**UNIT II Measuring Development** **12 Lectures**

a. Indicators of Development – Human Development Index (HDI)
b. Survey and Case Study as Methods of Data Collection
c. Questionnaire as a Technique of Data Collection

**UNIT III Globalization and the Crisis of Development** **12 Lectures**

a. Land Displacement
b. Forest Rights Act 2006 and its impact on the tribal community
c. Resistance Movements - i) Delhi Mumbai Industrial Corridor (DMIC)
ii) Jaitapur (Nuclear power)
iii) Raigad & Gorai (SEZs)
iv) Water Rights (Sangli)
(Focus on farmers and fisher folk)

**UNIT IV Alternative approaches to Development** **09 Lectures**

a. Sustainable Development – Eco-Friendly practices, Organic Farming, Ankoli in Solapur
b. People - Centric Development –Menda Lekha, Gadchiroli
c. 'Adarsh Gaon' – Hiware Bazaar, Ahmednagar

**Reading List:**

1. Ahmed, Kundu et al (ed), (2010) India's New Economic Policy: A Critical Analysis, New York: Routledge
2. Arundhuti Roy Choudhury, (2000) Amusement Parks versus People's Livelihood, EPW, Vol. 35, Sept. 9-15
3. Banerjee Swapna, (2011) Contradictions of 'development' in contemporary India, Open Democracy
4. Bryan Alan, (2012) Social research methods, Oxford Publication

5. Bokil Milind, Goshta Mendha Gavachi, Mauj Prakashan
बोकिल मिलिंद गोष्ट मेंढा गावाची, मौज प्रकाशन
6. Bokil Milind, Sahitya, Bhasha v samaj, Mauj Prakashan
बोकिल मिलिंद साहित्य, भाषा व समाज, मौज प्रकाशन
7. Bidwai Praful, 19 Feb, 2011, People v/s Nuclear Power in Jaitapur, Maharashtra, EPW, Vol. 46
8. Collective water management through water banks, July 2010, Clean India Journal
9. Dias Anthony, (2012) Development and its human cost, Rawat publication
10. Deshpande M G, 2007. The nature of ecological problems, Environmental changes and natural disasters, Md. Babar, New India Publication
11. Devale Kaustubh and Paranjape Suhas, Pani Sang harsh Chalwal, www.waterconflictforum.org
12. Giddens Anthony, 2000, Runaway world: How globalization is reshaping our lives Routledge, New York
13. Hiware Bazaar – Dec 22, 2010, Model village for the nation, The Better India
14. India HDR: (2011) Towards social exclusion, Oxford Publication
15. Jogdand P G & Michael S M (2003), Globalization and social movements, Rawat Publication
16. Munshi Indra, (2012) The Adivasi Question – Issues of land, Forests & livelihood, Orient Black swan
17. Neeraj, (2013) Globalization or Re-colonization, Lokayat Publication
18. Padel, Felix and Das Samarendra (2010), Out of This Earth. East India: Adivasis and the Aluminium Cartel, New Delhi: Orient Black swan
19. www.payog.org –Arun Deshpande, Development of Ankoli village, Solapur

❖❖❖❖

# १

# विकास समजून घेताना

**घटक रचना**

१.० उद्दिष्टये

१.१ प्रस्तावना

१.२ मुलभूत संकल्पना

- १.२.१ सामाजिक परिवर्तन
- १.२.२ उत्क्रांती
- १.२.३ विकास
- १.२.४ आधुनिकीकरण

१.३ विकासाचे सिद्धांत

- १.३.१ आधुनिकीकरण सिद्धांत
- १.३.२ मॅक्लेलॅण्ड आणि हॅगेन
- १.३.३ हॉझेलिट
- १.३.४ स्मेलसर
- १.३.५ रोस्टोच्या वृद्धीच्या अवस्था

१.४ सारांश

१.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- सामाजिक परिवर्तन, उत्क्रांती आणि विकास या संकल्पनांचे आकलन होईल.
- विकासाचा आधुनिकीकरण सिद्धांत दृष्टीकोन याचे आकलन होईल.
- आधुनिकीकरण सिद्धांताचे चिकित्सक मूल्यमापन करता येईल.

## १.१ प्रस्तावना

समाजशास्त्राचा उत्तरोत्तर विकास होताना अनेक नवनवीन विषयांना, क्षेत्रांना त्यांनी आपला अभ्यासविषय बनविले आहे. सामाजिक परिवर्तन हा समाजशास्त्राचा केंद्रवर्ती अभ्यासविषय आहे. सामाजिक परिवर्तनाशी संबंधित उत्क्रांती, विकास, वृद्धी आधुनिकीकरण, पश्चिमात्यीकरण या संकल्पनांचा अभ्यास साम्ज्शास्त्रात सुरु झाला आणि त्यातूनच आधुनिकीकरण आणि विकासाचे समाजशास्त्र ही ज्ञानशाखा पुढे आली. विकास ही केवळ आर्थिक प्रक्रिया नाही तर तिला सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक बाजू असतात त्यांचा अभ्यास विकासाचे समाजशास्त्र करते. खरेतर आधुनिकीकरण आणि विकासाचे समाजशास्त्र हे तिसऱ्या लोकांशी जास्त संबंधित राहिले आहे. पहिल्या जगातील म्हणजेच विकसित राष्ट्रांच्या विकास आणि प्रगतीच्या संकल्पना, त्यामागील राजकीय आशय याचे विश्लेषण या ज्ञानशाखेने केले. पाश्चात्य आधुनिक विकास प्रारूपाची तिसऱ्या जगातील नवस्वतंत्रराष्ट्रांनी केलेली उसनवारी त्यामधून अपरिहार्यपणे पुढे आलेले परावलंबन आणि परिणामी मागासलेपणा याची कारणमीमांसा विकासाच्या समाजशास्त्राने केली आहे. एवढेच नाही तर आधुनिक विकास प्रारुपाच्या चिकित्सेतून पुढे आलेल्या पर्यायी विकास प्रारूपाची नोंद ही या अभ्यास शाखेने घेतली आहे.

## १.२ मुलभूत संकल्पना

### १.२.१ सामाजिक परिवर्तन

सामाजिक परिवर्तन ही संकल्पना वर्तनबंध आणि सांस्कृतिक मुल्ये आणि नियमने यांच्यातील कोणत्याही महत्वाच्या बदलासंबंधी वापरली जाते. महत्वाचे बदल याचा अर्थ जे बदल मोठे सामाजिक परिणाम घडवितात. दिर्घकालीन परिणाम करणाऱ्या महत्वाच्या सामाजिक बदलाची उदाहरणे म्हणजे औद्योगिक क्रांती, गुलामगिरीचे निर्मुलन आणि स्त्रीवादी चळवळी इ. होत. हॅरी जॉन्सन यांच्या मते, मुलभूत अर्थाने सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचानेतील बदल होय. यामध्ये सांस्कृतिक प्रतिके, वर्तनाचे नियम, सामाजिक संघटना आणि मूल्य व्यवस्था यांच्यातील बदलांचा समावेश होतो. समाजशास्त्रज्ञ स्थूलमानाने सामाजिक परिवर्तनाला कारणीभूत असणारे घटक खालीलप्रमाणे सांगतात,

१) **भौतिक परिस्थिती -** जमीन, डोंगरदऱ्या, तापमान, नदीनाले, वादळवारे, हवामान, ऋतुचक्र, ज्वालामुखी, भूकंप, महापूर, जनः=गले, खनिजसंपत्ती

२) **लोकसंख्येतील बदल –** लोकसंख्या प्रमाण, लोकसंख्या वृद्धीदर, जन्ममृत्यू दर, लिंगप्रमाण, आयुर्मान, घनता, स्थलांतर यामधील बदल.

३) **सामाजिक सांस्कृतिक घटक –** समाज संरचना आणि सांस्कृतिक संघटन स्वरूप, तंत्रज्ञान आणि विचारप्रणाली यामधील बदल

४) **प्रभावी व्यक्तिमत्वे –** महत्वाची भूमिका पुढाकार आणि प्रेरणा

उदा. कार्ल मार्क्स, महात्मा गांधी, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर

### १.२.२ उत्क्रांती

समाजशास्त्र या ज्ञानशाखेच्या विकासाचा आढावा घेतला तर समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक परिवर्तनाच्या प्रारुपांची इतर ज्ञानशाखांकडून उसनवारी केल्याचे दिसते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जीवशास्त्रीय बदलाच्या आकलनासाठी प्रारूप म्हणून उत्क्रांती संकल्पना पुढे आली. हीच संकल्पना सामाजिक परिवर्तनाच्या कल्पनांना लागू केली. समाज सामान्यत: सध्या अवस्थेतून गुंतागुंतीच्या अवस्थेकडे स्थित्यांतरीत होतो म्हणजे पारंपारिक अवस्थेकडून आधुनिक अवस्थेकडे स्थित्यांतरीत होतो यावर उत्क्रांती सिद्धांत विश्वास ठेवतात. प्रारंभिक समाजशास्त्रज्ञ कॉम्त, स्पेन्सर आणि दुर्खिम मानवी समाज एकरेषीय पद्धतीने उत्क्रांत होतात यावर विश्वास ठेवतात. समाजशास्त्राचे जनक ऑगस्त कॉम्त यांनी मांडलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या धर्मशास्त्रीय, अधिभौतिक आणि प्रत्यक्ष अवस्था या तीन अवस्थांच्या नियमांच्या सिद्धांतावर उत्क्रांती वादातच प्रभाव दिसतो. हर्बट स्पेन्सरने समाजाची तुलना मानवी जीवाशी केली आहे. जगण्यासाठीचा लढा आणि सर्वोत्तमाचा विजय या डार्विनच्या तत्वाचा अवलंब करित समाज सैनिकी समाजातून औद्योगिक अवस्थेत उत्क्रांत होतो असे ते म्हणतात. दुर्खिम यांनी समाज यांत्रिक ऐक्यभावाकडून विशेषीकरण आणि श्रमविभाजनाच्या वाढीने युक्त अशा जैविक ऐक्यभावाकडे उत्क्रांत होतो, अशी मांडणी केली आहे. या सर्वांच्या मते, सामाजिक परिवर्तन हे सकारात्मक, प्रगतीच्या दिशेने जाणारे आणि समाजाला लाभदायक असणारे असते. समाजाचे उत्क्रांतीवादी दृष्टीकोन चार्ल्स डार्विनच्या जैविक उत्क्रांतीच्या सिद्धांताशी संबंधित आहेत. मात्र उत्क्रांतीचा बहुरेषीय सिद्धांत हा सर्व समाज एकाच दिशेने उत्क्रांत होत जातात यावर विश्वास ठेवत नाही.

### १.२.३ विकास

विकास ही केवळ आर्थिक घटित तर संपूर्ण आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेच्या पुर्नसंघटन आणि पुर्नराभिमुखतेमध्ये समाविष्ट बहुपैलू प्रक्रिया आहे. तिची एकच एक व्याख्या नाही ती एक नियमनात्मक स्वरुपाची आहे. वेगवेगळ्या वेळी आर्थिक वाढ संरचनात्मक आर्थिक बदल, औद्योगिक बदल, भांडवलशाही, समाज या अर्थानेही ती वापरली जाते. काळाच्या ओघात विकासा या संकल्पनेकडे पाहण्याच्या परिदृष्टीत बदल होत गेलेला दिसून येतो.

प्रथमतः विकास म्हणजे आर्थिक वाढ या अर्थाने ही संकल्पना रूढ झाली. आर्थिक वाढ म्हणजे स्थुल देशांतर्गत उत्पादना, उप्भोड, शासकीय खर्च आणि गुंतवणूक यामध्ये झालेली वाढ आणि आयातीमध्ये झालेली घट इ.होय. त्या आर्थिक वाढीचे म्हणजेच पर्यायाने विकासाचे  मोजमाप कसे करायचे, कोणते सूचकांक वापरायचे, त्यांना संख्याबद्ध कसे करायचे हे ठरविले गेले. मग राष्ट्रीय उत्पन्नात, उत्पादनात वृद्धी, दरडोई सरासरी उत्पन्न किती वाढले इत्यादी निकष वापरले गेले. पुढे विकास प्रक्रियेचा नेमका परिणाम सामाजिक वास्तवावर कसा होतो याचा आवाका येण्याच्या दृष्टीने आर्थिक वाढ ही संकल्पना तुटपुंजी,

अपुरी आहे हे अधिकाधिक लक्षात येऊ लागले विकास अभिमुख अर्थशास्त्रज्ञांनीच त्यासंबंधी असमाधान व्यक्त केले.

आर्थिक वाढ या संकल्पनेचा अपुरेपणा लक्षात आल्यानंतर विकासाचा परिणाम संपत्तीच्या समान नाही तर निदान न्याय वाटपाच्या दिशेने होतो आहे की नाही यावर भर दिला जाऊ लागला. थोडक्यात विकास संकल्पनेबद्दलची विचारधारा बदलल्यामुळे म्हणजे अपेक्षित उद्दिष्ट्ये बदलल्यामुळे अशा प्रकारचे बदल घडले.

त्यानंतरच्या काळात राष्ट्रीय उत्पादन, साधनसंपत्तीचे न्याय वाटप याच्याही पुढे जाऊन प्रत्यक्षात जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनक्षमतेच्या गुणवत्तेत ठळकपणे फरक पडला आहे की नाही हे पाहिले जाऊ लागले म्हणजे दरमाणसी आहार सुधारला आहे की नाही, साक्षरतेचा व शिक्षणाचा प्रसार वयोगटानुसार आणि स्त्री-पुरुषांमध्ये कितपत झाला आहे, कौटुंबिक आरोग्य आणि त्यासाठीच्या सुविधांमध्ये कितपत गुणात्मक सुधारणा झाली आहे, रोजगार उपलब्ध झाला आहे की नाही, सामान्यांच्या क्रयशक्तीत वृद्धी कितपत झाली आणि एकंदरच अन्न, वस्त्र, निवारा इ. जीवनावश्यक बाबींमध्ये तळागाळातील लोकांच्या बाबतीत लक्षणीय वाढ झाली आहे की नाही हे पाहिले जाऊ लागले.

थोडक्यात विकास प्रक्रीयेबाबत बदल नेमका काय होतो आहे? कोणत्या सामाजिक स्थरांमध्ये या बदलाचे लाभदायक किंवा हानिकारक परिणाम दिसून येतात? बदल कोणत्या गतीने होतो आहे. एकूणच विकास प्रक्रियेचे सामाजिक फलित काय किंवा त्यासाठी समाजाला कोणती किंमत मोजावी लागत आहे? यासारख्या प्रश्नांकडे विकास विषयक चर्चाविश्वाचा रोख वळला आहे. थोडक्यात विकास प्रक्रियेकडे पाहण्याच्या आपल्या परिदृष्टीतच फरक पडला आहे.

### १.२.४ आधुनिकीकरण

आधुनिकीकरण ही समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना आहे. ही एक गुंतागुंतीची समाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. विविध समाजशास्त्रज्ञांनी आधुनिकीकरण या संकल्पनेच्या व्याख्या केल्या आहेत त्या खालीलप्रमाणे,

१) **टिश्नेअर व्हायटन आणि हंटर –** "पारंपारिक समाजाचे जसजसे औद्योगिकीकरण होत जाते तसतसे त्या समाजात घडून येणाऱ्या गुंतागुंतीच्या परिवर्तनाच्या संचास औद्योगिकीकरण असे म्हणतात. "

२) **डेव्हिड पॉपेनो –** "पारंपारिक, औद्योगिकीकरण पूर्व समाजातील संस्थांचे औद्योगिकीकरण झालेल्या समाजातील संस्थांप्रमाणे सामाजिक रुपांतर घडून येणे म्हणजे औद्योगिकीकरण होय."

३) **लाईट आणि केल्लर –** "प्रगत औद्योगिक देशातील समाजाप्रमाणे बदल किंवा परिवर्तन घडवून आणणे यालाच आधुनिकीकरण असे सामान्यत: समजले जाते."

वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते की, औद्योगिकीकरण घडून येणे हीच आधुनिकीकरणाची पूर्व अट आहे. पण केवळ औद्योगिकीकरण म्हणजेच आधुनिकीकरण असे म्हणता येणार नाही. औद्योगिकीकरणाबरोबरच औद्योगिकीकरण पूर्व अशा पारंपारिक समाजातील समाज-संरचना, मुलभूत सामाजिक संस्था, नियमाने, मुल्ये, श्रमविभाजन, स्थरीकरण इत्यादी घटकातही परिवर्तन घडून येणे आधुनिकीकरणाच्या संकल्पनेत अभिप्रेत आहे.

या संकाल्पनेसंदर्भात द.ना.धनागरे म्हणतात की, आधुनिकीकरण संकल्पनेची चलती प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धानंतर सुरु झाली. शेकडो वर्षाच्या वसाहतवादी शोषणाचा अनुभव घेऊन मुक्त झालेल्या नवस्वतंत्र राष्ट्रांनी युरोपीयकरण आणि पाश्चातीकरण या संकल्पनेऐवजी आधुनिकीकरण ही संकल्पना वापरली.

द. ना. धनागरे म्हणतात, "इतर परिवर्तन प्रक्रीयांप्रमाणेच आधुनिकीकरण ही देखील एक परिवर्तन प्रक्रियाच आहे, त्यात प्रामुख्याने बदल घडून येतो तो संस्थांमध्ये, जीवनपद्धती आणि आचारविचारांमध्ये आणि हे परिवर्तन युरोपीकरण – पाश्चातीकरणाप्रमाणे समाजातील उच्चभ्रू वर्गापुरते मर्यादित न राहता समाजातल्या सर्व थरांमधील व्यक्तींवर त्याचा प्रभाव पडतो तो मुख्यत्वेकरून संचारमाध्यमांद्वारे त्यातून नवीन कल्पना आणि मनोवृत्तींचा प्रादुर्भाव होतो आणि प्रसार ही हा बदल सर्वसमावेशक असतो एवढेच नाही तर आधुनिकीकरण प्रक्रियेत सातत्याने परिवर्तन घडत राहणे व त्याद्वारे व्यक्ती-व्यक्तींची समाजिक व मानसिक गतीशीलता हाच समाजाचा स्थायीभाव बनतो. याखेरीज बदल हा लादला जात नाही तर स्वेच्छेने स्विकारला जातो. आधुनीकीकरण प्रक्रियेचा गाभा धर्मातील/ धर्मनिरपेक्ष असतो. म्हणजेच त्या संक्रमण अवस्थेतून जाणाऱ्या समाज अथवा राष्ट्रांमध्ये साधारणपणे एकसारखे परिणाम दिसू शकतात."

थोडक्यात विकास, आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरण या तीन परस्परसंबंधित संकल्पना आहेत. यापैकी विकास ही सामान्य प्रक्रिया आहे. आधुनिकीकरण हे विकासाचे एक विशिष्ट उदाहरण आहे. तर औद्योगिकीकरण हा आधुनिकीकरणाचा विशेष असा पैलू आहे.

**आपली प्रगती तपासूया :**

१) सामाजिक परिवर्तन उत्क्रांता, वाढ आणि विकास या संकल्पना स्पष्ट करा?

२) आधुनिकीकरण आणि विकास हे कसे परस्परसंबंधित आहे ते दर्शवा?

## १.३ विकासाचे सिद्धांत

भूतकाळात आधुनिकीकरण सिद्धांतकारांना आधुनिकीकरण आणि विकास एकसारखे मानणे आवडले. त्यांनी मोठ्या प्रमाणावर नव्या राष्ट्रराज्यांवर प्रकाश टाकला. पाश्चात्य समाजामध्ये जे घडून आले त्याची पुनरावृत्ती होऊ शकते असे ते गृहीत धरतात. भांडवल, तंत्रज्ञान, तंत्रज्ञ आणि विवेकशीलता यांच्या मार्गाने हे शक्य आहे असे त्यांना वाटते. अविकसतेचे सिद्धांतकार आणि आधुनिकीकरण सिद्धांताचे इतर चिकित्सक यांचा पाश्चातीकरणासंबंधीचा दृष्टीकोन विरोधी आहे. ते म्हणतात की, पाश्चात्य भांडवलशाहीच्या

विस्ताराने तिसऱ्या जगाला शोषीत जागतिक व्यवस्थेमध्ये समाविष्ट केले, अशा प्रकारे त्यांनी अविकसितेला पुढे नेले.

### १.३.१ आधुनिकीकरण सिद्धांत

विकासामधील सांस्कृतिक अडथळ्यांमुळे आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या खंडातील देशांचा विकास झाला नाही हे आधुनिकीकरण सिद्धांतांनी स्पष्ट केले. पारंपारिक मुलांनी त्यांना मागे सारले काही आधुनिकीकरण सिद्धांतकारांनी विकासातील आर्थिक अडथळ्यांवर प्रकाश टाकला. विकास करण्यासाठी कमी विकसित देशांनी विकासाच्या भांडवली-औद्योगिक प्रारुपाचा स्विकार करण्याची गरज आहे असे त्यांचे सारभूत प्रतिपादन आहे. आधुनिकीकरणाचा केवळ एकच-एक सिद्धांत नाही. आधुनिकीकरण सिद्धांताची सुरुवात १८ व्या शतकात जेव्हा समाजाच्या उत्क्रांतीचे व्यवस्थित अध्ययन केले गेले तिथपासून दिसून येते. दिर्घकालीन सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला विभेदिकरण म्हणून समजण्यात आले. साध्या अवस्थेकडून गुंतागुंतीच्या अवस्थेकडे होणाऱ्या स्थित्यंतराची व्याख्या केली गेली आणि तीच सामाजिक विचार म्हणून जगभर पसरली आणि एकोणिसाव्या शतकात प्रभावी ठरली आणि त्यातूनच पुढे समाज आणि माणसाचे विज्ञान प्रस्थापित झाले.

अलीकडे डॅनियल लर्नरकडून आधुनिकीकरण अध्ययन हाती घेण्यात आले. त्यांनी आपल्या “The Passing of Traditional Society” (1958) या ग्रंथात काही मध्यपूर्व देशातील आधुनिकीकरण प्रक्रियेचे परिक्षण केले आहे. त्याच्यामध्ये आधुनिकीकरण ही एक जागतिक प्रक्रिया आहे. जगभर पारंपारिक समाज सावकाश अदृश्य होत आहे. यामध्ये विशेषत: प्रसारमाध्यमांची भूमिका निर्णायक आहे. आणि ती विकासाच्या इतर निर्देशकांशी संबंधित आहे. नागरीकरण, साक्षरतेमधील वाढ हे प्रसारमाध्यमांचे महत्व वाढण्यास प्रेरित करतात. वाढती साक्षर आणि नागरी लोकसंख्या व्यापक आर्थिक व्यवस्थेत सहभागी होते. लर्नरसाठी आधुनिकता ही केवळ संस्थांमधील बदलांनी पुढे येत आहे असे नाही तर व्यक्तींमधील बदलांनी पुढे येते. विवेकशीलता आणि सहानुभूती ही वैशिष्ट्ये असणाऱ्या गतिशील व्यक्तिमत्वाचा विकास हा आधुनिकीकरणाचा निर्णायक पैलू आहे. असे नवीन गतिशील व्यक्ती बदलत्या जगात कार्यक्षमतेने काम करतात.

पूर्वीच्या आधुनिकीकरण सिद्धांतातील काही सामान्य कल्पना लर्नरच्या अध्ययनात दिसून येतात. उदा. समाजाचे पारंपारिक आणि आधुनिक असे वर्गीकरण, साक्षरता आणि नागरीकरण यावर आधुनिकतेचे निर्देशक म्हणून प्रकाश प्रसारमाध्यमांचे महत्त्व, आधुनिकीकरण प्रक्रियेतील विशिष्ट व्यक्तिमत्वाच्या प्रकाराला महत्व मूल्य आणि त्यांचे व्यापक समुदायाबरोबरील संबंध हे विकासाच्या चर्चेतील महत्वाचे घटक आहेत.

### १.३.२ मॅक्लेलॅण्ड आणि हॅगेन

डेव्हिड मॅक्लेलॅण्ड हे अमेरिकन मानसशास्त्रज्ञआहेत. त्यांनी आपल्या The Achieving Society या ग्रंथात विकास प्रक्रियेची मानसशास्त्रीय कारणमीमांसा केली आहे. आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या दिशेने काही देश का पुढे गेले आणि काही देश रेंगाळत मागे का पडले? असा प्रश्न विचारून विविध कालखंडातील इतिहासाचा ते मागोवा घेतात.

इसवीसनापूर्वी सहाव्या शतकात ग्रीक नगर राज्ये-विशेषत:-अथेन्स-का वाढत गेली? कार्थेजीयन संस्कृतीशी समुद्रावर झगडता झगडता रोमन लोकांचा प्रथम पराभव झाला. परंतु शेवटी हवे तितके नाविक सामर्थ्य रोम लोकांनी मिळविले. हे सामर्थ्य संपादन करण्यासाठी आवश्यक असलेला पैसा त्यांनी कसा मिळविला, असा प्राचीन इतिहासातील आर्थिक वैभवाचा पुरावा मॅक्लेलॅण्ड यांनी ऐरणीवर आणला आहे.

आधुनिक इतिहासाचा मागोवा घेताना ते असा पुरावा देतात की, उत्तर अमेरिकेच्या ज्या भागात इंग्लिश लोकांनी वसाहत केली त्या भागाची आर्थिक सुधारणा वेगाने झाली. मात्र याच उत्तर अमेरिकेच्या ज्या भागात स्पॅनिश लोक उतरले तो भाग मात्र मंद गतीने सुधारत गेला.

मॅक्लेलॅण्ड तिसरे उदाहरण चीन-जपानच्या विकासाचे देतात. एकोणिसाव्या शतकात जपान आर्थिक विकासाच्या क्षेत्रात भराभर पुढे गेला आणि याउलट चीन होता तसाच मध्ययुगात खितपत पडला.

या तीन ऐतिहासिक उदाहरणांना समोर ठेवीन मॅक्लेलॅण्ड यांनी काही देश पुढे का गेले आणि काही देश मागे का राहिले या प्रश्नाचे मानसशास्त्रीय उत्तर दिले आहे. त्याच्या मते, आर्थिक विकासामागे एक विशिष्ट वैचारिक मार्ग असतो, एक विशिष्ट प्रेरणा असते. ही प्रेरणा म्हणजे एक प्रकारची मानसिक लसच असते. ती मनात भिनली की व्यक्ती एका विशिष्ट चैतन्याने भारून जावून जीवनाकडे बघते आणि त्याचप्रमाणे समाजव्यवहार करू लागते.

या मानसिक लसीला किंवा प्रेरणेला सिद्धी प्रेरणा असे नाव देता येईल. व्यक्तींच्या विचारात ही सिद्धी प्रेरणा आली की त्याच्या हातून होणारे काम इर्ष्येने आणि चांगले होत जाते. लोकांच्या परंपरेत, साहित्यात त्यातील गीतात, म्हणीत भांड्याकुंड्यावरील चित्रात आणि प्रतिकाल ही सिद्धी प्रेरणा प्रतिबिंबित झालेली असते आणि तिचा आणि आर्थिक विकासाचा कार्यकारणसंबंध वस्तूनिष्ठ पद्धतीने दाखविता येतो असेही मॅक्लेलॅण्ड आग्रहाने सांगतात.

उदा. आरंभीच्या काळातील लोकप्रिय ग्रीक साहित्यात व्यक्त झालेली ही प्रेरणा उत्तर काळातील ग्रीक साहित्याच्या तुलनेने जास्त होती. त्याचप्रमाणे १६ व्या शतकातील स्पॅनिश साहित्याच्या तुलनेने या प्रेरणेचा आशय त्याच शतकातील इंग्लिश साहित्यात जास्त प्रकर्षाने व्यक्त झालेला दिसतो. इतकेच नव्हे तर इ.स. १४००-१८०० या ४०० वर्षातील इंग्लिश शाहिरी गीतात, नाविक कप्तानांच्या पात्रात आणि लोकप्रिय नाटकात व्यक्त झालेली सिद्धी प्रेरणा आणि या काळातील इंग्लंडच्या आर्थिक प्रगतीचा काही एक संबंध आहे हेही दाखविता येईल असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

थोडक्यात, समाजात सिद्धी प्रेरणा ज्या प्रमाणात आहे त्या प्रमाणात आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात संचालक नेते निर्माण होतीळ आज आघाडीवर आलेल्या पश्चिमेकडील समाजात तिचे प्रमाण फार मोठे आहे. पूर्वेकडील मागासलेल्या देशागत ही प्रेरणा सापेक्षत: फार कमी आहे म्हणून या देशाचा आर्थिक विकास आणि वाढ व्हायची असेल तर सिद्धीच्या या प्रेरणेची गुरुकिल्ली हस्तगत केली पाहिजे हे मॅक्लेलॅण्ड यांच्या विवेचनाचे प्रतिपादन आहे.

### इ. हॅगेन

मॅक्लेलॅण्ड प्रमाणेच हॅगेन यांनी ही विकासाची पातळी आणि प्रगतीच्या प्रेरणा यांच्यामध्ये सहसंबंध असतो हे मॅक्लेलॅण्डचे सूत्र हॅगेन यांनी स्विकारले आहे. समाज आणि तांच्या वर्गांमध्ये प्रगतीच्या वेगळ्या का असतात हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्थिक वीकसच संबंध समाजरचनेशी आणि त्यातून शक्य होणाऱ्या समाज परिवर्तनशी आहे. सामाजिक रचना आणि सामाजिक परिवर्तन यांचे स्वरूप नेमक्या कोणत्या घटकांमुळे निश्चित होते याचे उत्तर हॅगेन सारखेच मानसशास्त्रज्ञ मुलांचे सामाजीकरण असे देतात.

या सामाजीकरणामागचे लहानपणातील सभोवतालचे सांस्कृतिक वातावरण आणि त्यातून निर्माण होणाऱ्या व्यक्तित्वाच्या साचाला मुलभूत असे महत्व आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सामाजिक रचना आणि सामाजिक बदल यांच्या शक्याशक्यता त्या त्या समाजातील सामाजीकरणातील विविध प्रेरणात आणि प्रक्रियात सुप्तपणे अस्तित्वात असतात.

पारंपारिक समाजात व्यक्तीचा दर्जा निश्चित जैसे थे असा स्थिर असतो आणि तो कायम राखला जातो. प्रस्थापित नियमने मुले शिकतात त्याचबरोबर विचलनात्मक वर्तन केले तर शिक्षा होते हेही ते शिकतात असे असले तरी बाह्य प्रभाव नव्या समूहास निर्माण करतो जो समूह जुन्या अभिजनांच्या दर्जास आव्हान देतो. या आव्हानातून उदयास येणारी असुरक्षितता आणि निराशा वर्तन बदलास प्रेरित करते. ज्याचा कुटुंबावर मोठा परिणाम होतो. मुले नवी मुल्ये स्विकारण्यास तयार होतात आणि याचा काळात सृजनशील व्यक्तिमत्व पुढे येतात. जर या व्यक्ती समाजातील प्रभूत्व समूह बनल्या तर त्याच आर्थिक विकासाचे कारण ठरतात.

लवचिक, बंधमुक्त, कर्तुत्वाच्या नव्या वाटा, नवी कौशल्ये आत्मसात करणारे – थोडक्यात कल्पक, सर्जनशील व्यक्तित्व हे वेगळ्या प्रकारचे असते. पौर्वात्य आणि भारतीय कुटुंबातील सामाजीकरण आणि सामाजीकरणाचे सांस्कृतिक वातावरण हे कल्पक व्यक्तित्व निर्माण करू शकत नाही.

हॅगेन म्हणतात की, अधिकारवादी समाजात जे दुय्यम किंवा दबलेले गत असतात त्यातून कल्पक व्यक्ती निर्माण होऊ शकतील परंपरानिष्ठ समाजातील सांस्कृतिक मूल्य कशी बदलतील याच्या उत्तरादाखल हॅगेन म्हणतात की, सर्व बदलाला एक विशिष्ट क्रम असतो. समाजसंबंधाचे सर्वंकष अधिकारवादी स्वरूप, त्यामुळे प्रतिष्ठा किंवा दर्जा यांना वंचित होणारा सीमेवरचा असंतुष्ट गट, त्यातून निर्माण होणारा त्यांचा काही काळचा पलायनवाद आणि शेवटी या प्रकारच्या गटातून उदयास येणारे सर्जनशील कल्पक व्यक्तिमत्व, अशाक्रमाने हे बदल होत जातील. थोडक्यात, व्यक्तिमत्व घडणीची सामाजीकरणाची प्रक्रिया आणि विकास प्रक्रिया यांच्यातील संबंध हॅगेन यांनी अधोरेखित केला आहे.

### १.३.३ हॉझेलिट्

एकोणीशे पन्नासच्या प्रारंभी हॉझेलिट् या अर्थशास्त्रज्ञाने आपल्या Society and Industrialization या पुस्तकात आर्थिकदृष्ट्या प्रगत आणि मागास देशातील सामाजिक संघटनामधील भिन्नतेवर प्रकाश टाकला. त्यांचे विचार हे शिकागो स्कूल प्रारुपाच्या विरोधी दिसतात. सामाजिक वृद्धींच्या निर्धारकांचे परिक्षण करण्यासाठी सामाजिकशास्त्राची

चौकट ते विकसित करू इच्छित होते. त्यांच्या विश्लेषणाची चौकट ही समाजशास्त्रज्ञ टॉलकॉट पार्सन यांच्या वर्तनबंध पर्याय सिद्धांतावर आधारलेली होती. विकसित आणि विकसनशील देशातील त्यांनी दाखविलेला फरक खालीलप्रमाणे सांगता येईल.

अ) विकसित देश शिक्षणासारख्या वस्तुनिष्ठ उपायांच्या आधारावर प्रगती अभिमुख असतात. गुणवत्तेच्या आधारावर तेथे दर्जा मिळतो. याउलट विकसनशील देश परंपरा अभिमुख असतात तेथे नातेसंबंध धर्म या आधारावर दर्जाची निश्चिती होते. थोडक्यात येथे अर्पित दर्जा उपयोगात आणला जातो.

ब) विकसित देशात कायद्यासारख्या सार्वत्रिक मानकावर आधारित वागण्याकडे कल असतो. याउलट विकसनशील देशात जातीव्यवस्था किंवा नातेसंबंध यासारख्या विशिष्ट मानकावर आधारित वर्तन करण्याची प्रवृत्ती दिसून येते.

क) विकसित अर्थव्यवस्था व्यापक श्रमविभाजनांनी युक्त आहेत तर विकसनशील अर्थव्यवस्था कमी विशेषीकृत श्रमशक्तीने युक्त आहेत.

## १.३.४ स्मेलसर

समाजशास्त्रज्ञ स्मेलसर हे विशेषत आर्थिक विकास आणि वाढीचे सामाजिक संरचानेतील परिणाम यांच्याशी संबंधित होते. त्यांनी चार महत्वाच्या प्रक्रिया विस्तृतपणे स्पष्ट केल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे,

१) साध्याकडून गुंतागुंतीच्या तंत्रज्ञानाकडे स्थित्यंतर

२) उदरनिर्वाही शेतीकडून रोख पिकांच्या शेतीकडे होणारा बदल

३) प्राणी आणि मानवीशक्तीकडून औद्योगिकीकरणाकडे होणारे स्थित्यंतरे

४) नगरआधारित लोकसंख्येची वाढ

स्मेलसर म्हणतात की, या सर्व प्रक्रिया एकाबरोबर घडणार नाहीत. परिवर्तन बदलसुद्धा एक दुसऱ्या समाजात वेगळे असतील परिवर्तनाची प्रक्रिया आणि घटक वेगळे असतील आणि ते प्रामुख्याने परंपरेने प्रभावित असतील. अशा प्रकारे आधुनिकीकरणाकडे जाणारे मार्ग विभिन्न आहेत.

स्मेलसर हे सुचवू इच्छितात की, राष्ट्रीय भिन्नता या नेहमी महत्वाच्या असतात. युद्ध आणि नैसर्गिक आपत्ती यासारख्या घटना विकासाच्या आकृतीबंधावर निर्णायक प्रभाव टाकू शकतात. आधुनिक होत असलेल्या समाजावर या चार परिवर्तन प्रक्रियांचे सारखे परिणाम होतात. कुटुंब आपले कार्य हरवून बसते. आर्थिक क्रिया घरापासून वेगळ्या होतात. धार्मिक अवकाश आणि सामाजिक स्थरीकरण गुंतागुंतीचे बनते. प्रगती आणि सामाजिक गतिशीलता यावर भर दिला जातो. सामाजिक सलोख आबादित राहतो. नव्या एकात्म यंत्रणेचा उदय होतो. ऐच्छिक संघटनांचा उदय होतो. नागरीकरणाने घडवून आणलेल्या प्रमाणशून्यतेच्या भावनेला कामगार संघटनेकडून पर्याय दिला जातो. वाढत्या अनेक हितसंबंधी समूहासाठी नव्या राजकीय संस्थांचा विस्तार होतो. वरील या सर्व गोष्टी संरचना प्रकार्यवादी दृष्टीकोन

समाजाच्या समायोजन क्षमता आणि सामाजिक संतुलनांच्या गरजा यावर भर देतात. त्या दिशेत येतात.

नवीन एकात्म यंत्रणेच्या जडणघडणीशिवाय स्मेलसर सामाजिक अडथळ्यांना अपरिहार्य मानतात. त्याची अनेक करणे आहेत. त्यापैकी महत्वाचे म्हणजे परंपरा आणि आधुनिकीकरण यांच्यातील संघर्ष, संरचनात्मक बदलाची असमानता आणि औद्योगिकीकरण शीघ्रगती हे होत.

याचा परिणाम आधुनिक होत असलेल्या समाजाची प्रतिमा युद्धभूमीसारखी झाली आहे. जिथे संरचनात्मक विभेदिकरणाच्या विरोधी म्हणून परंपरेची पिटाई होते. तिथे एकात्मयंत्रणा समतोल साधण्यासाठी प्रयत्न करतात. या यंत्रणांचे यश संरचनात्मक परिवर्तनाच्या तीव्रतेवर राजकीय सत्ता संपादन करण्याच्या बंडाच्या प्रमाणावर अवलंबून असते.

थोडक्यात, स्मेलसरसामाजिक परिवर्तनाच्या जास्त आणि कमी एकात्म स्वरूपास स्पष्ट करतात.

**मूल्यमापन :**

१) स्मेलसर नवदुर्खिमवाद, संरचना प्रकार्यवादी दृष्टीकोन दिसून येतो.

२) तिसऱ्या जगातील सामाजिक परिवर्तनाकडे आर्थिकवृद्धीतील आवश्यक घटक म्हणून पाहिले जाते.

३) जर केवळ सामाजिक अडथळे दूर होवू शकले तर कदाचित नव्या मजबूत राजकीय संस्था आणि नेतृत्व याद्वारे तिसरे जग पाश्चात्यमार्गाचा स्वीकार करण्यास पत्र ठरेल.

### १.३.५ रोस्टोच्या वृद्धीच्या अवस्था

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डब्ल्यू डब्ल्यू रोस्टो यांनी कार्ल मार्क्स यांच्या इतिहासाच्या भौतिकवादी मीमांसेला पर्याय दिला त्यांनी काही देशाच्या आर्थिक वाढीचा व विकासाचा अभ्यास केला. त्यांच्या मते, कार्ल मार्क्स यांनी केलेली भांडवलशाही च्या अंताची भविष्यवाणी खरी ठरू शकत नाही. याउलट भांडवलशाहीचा विकास न होता तिची वाटचाल आर्थिक भरभराटीकडे जाईल.

आपल्या Stages of Economics Growth या ग्रंथामध्ये मानवी समाजाच्या आर्थिक इतिहासाच्या पाच अवस्था सांगितल्या आहेत. त्याचे थोडक्यात विवेचन खालीलप्रमाणे,

**१) पहिली अवस्था किंवा परंपरानिष्ठ समाज**

अ) निर्वाहप्रदान शेती आणि शिकार आणि अन्न संकलन

ब) विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा अभाव

क) मर्यादित उत्पादन

ड) ताठर किंवा अलौचिक समाज

इ) केंद्रित राजकीय सत्ता

फ) प्रारब्धावर आधारित मूल्ये

**२) दुसरी अवस्था किंवा उड्डाणपूर्व अवस्था**

अ) कच्च्या सामग्रीची बाह्य मागणी आर्थिक बदलास पुढे नेते

ब) उत्पादित, वाणिज्यिक कृषी आणि रोख पिकांचे उत्पादन आणि त्यांची व्यापक निर्यात

क) उत्पादन विस्तारासाठी पैशाची गुंतवणूक

ड) तंत्रज्ञानाचा वाढता प्रसार आणि नव्या उद्योगाची सुरुवात

इ) पारंपारिक मुल्ये आणि संस्थांचा त्याग

फ) वैयक्तिक सामाजिक गतीशीलतेस सुरुवात

**३) तिसरी अवस्था किंवा उड्डाण अवस्था**

अ) अर्थव्यवस्थेचे प्राथमिक क्षेत्राकडून दुय्यम क्षेत्राकडे स्थित्यंतर

ब) दुय्यम क्षेत्राचा (वस्तूउत्पादन) विस्तार

क) काही प्रमुख उद्योग देशांतर्गत उपभोग आणि निर्यात यावर भर

ड) वस्त्रोद्योग आणि पोशाख या उड्डाण घेणारे पहिले उद्योग (म्हणून ब्रिटनमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली)

**४) चौथी अवस्था किंवा तंत्रज्ञानांनी सुसज्ज असलेली अवस्था**

अ) तंत्रज्ञान गुंतागुंतीचे बनते

ब) बहुपयोगी आणि अवजड उद्योगांचा विस्तार

क) उत्पादनाचे गुंतवणूक आधारित स्वरुपाकडून उपभोग आधारित स्वरूपाकडे स्थित्यंतर

ड) मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आधारित स्वरुपाकडून उपभोग आधारित स्वरूपाकडे स्थित्यंतर

इ) उच्च उत्पन्न असणाऱ्या देशांच्या मुल्ये आणि संस्थांचा स्विकार

**५) पाचवी अवस्था किंवा बहुजन समाजालाही उच्च पातळीवरील उपभोग देऊ शकणारा समाज**

अ) उद्योग आधारित अर्थ व्यवस्था

ब) अर्थव्यवस्था आणि समजातील प्राथमिक क्षेत्राचे महत्व मोठ्या प्रमाणावर घटणे

ब) उच्च जीवनमानाचे संपादन

ड) उच्च मूल्य असणाऱ्या उपभोग्य वस्तूंचा व्यापक उपभोग

इ) सर्व मुलभूत वस्तूंच्या पलिकडे अतिरिक्त वस्तूंसाठी उपभोक्ता उत्पन्न राखून ठेवतो.

रोस्टोच्या मते, प्रत्येक देश या प्रत्येक अवस्थेतून एकाच रेषेत पुढे जात असतात. असे असले तरी देशादेशातील आणि इतकेच काय प्रदेशाप्रदेशामध्ये सुद्धा अवस्था वेगळ्या असू शकतात. यातील उद्योगपूर्व शेतीप्रधान अवस्थेकडून उद्योगप्रधान समाजाकडे जाणाऱ्या अवस्थेला रोस्टोच्या सिद्धांतात फार महत्व आहे. या उड्डाणाच्या अवस्थेकडे जाण्यासाठी अविकसित देशातील समासाजवळ काही विशिष्ट सामाजिक आणि सांस्कृतिक शक्ती असल्याच पाहिजेत. हा त्यामागचा रॅस्टोचा आग्रह लक्षात घेण्याजोगा आहे. तिसऱ्या जगातील सर्व अविकसित राष्ट्रे या निकषानुसार पाहिल्या दोन अवस्थेत आहेत. याउलट अमेरिकेसारख्या राष्ट्राने चौथी अवस्था केव्हाच ओलांडून पाचव्या अवस्थेमध्ये प्रवेश केला आहे.

**आपली प्रगती तपासूया:**

१) आधुनिकीकरण सिद्धांताची विविध स्पष्टीकरणे कोणती आहेत?

२) आधुनिकीकरण सिद्धांतातील खालील योगदानाचे चिकित्सक मूल्यमापन करा?

अ) डॅनियल लर्नर ब) होझेलिट् क) मॅक्लेलॅण्ड ड)हॅगेन फ) स्मेसलर

## १.४ सारांश

१९६० मध्ये पाश्चात्य आणि तिसऱ्या जगातील सामाजिकशास्त्रज्ञ, नियोजनकार आणि राजकर्ते यांच्याकडून आधुनिकीकरणाचा स्वीकार केला गेला. त्यामध्ये राष्ट्रराज्य आणि तिसऱ्या जगातील विश्लेषण केले गेले. एकीकडे तिसऱ्या जगकडील राष्ट्रे उत्क्रांतीच्या पातळीवर तर पाश्चात्य समाज सर्वात वर होते. या आधुनिक पाश्चात्य समाजाने विकासाची प्रारूपे पुरविली ज्याचा स्वीकार तिसऱ्या जगातील राष्ट्रांनी विकासासाठी केला. यामध्ये आर्थिक वाढीसाठी भांडवल तज्ञ आणि तंत्रज्ञान यांचा समावेश होता.

## १.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

Social Change : सामाजिक परिवर्तन

Evolution : उत्क्रांती

Growth : वाढ

Development : विकास

Modernization : आधुनिकीकरण

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

१) सामाजिक परिवर्तन, उत्क्रांती, वृद्धी आणि विकास या संकल्पनांचे परिक्षण करा.

२) विकास आणि वाढ यांच्यातील आंतरसंबंधाचे परिक्षण करा.

३) विकास म्हणजे काय? विकासाच्या आकलनातील विविध आधुनिकीकरण सैद्धांतिक दृष्टिकोनाचे परिक्षण करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) पुंडलिक विद्याधर,“आर्थिक विकासाच्या सामाजिक बाजू”, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे.

२) धनागरे.द.ना.(२००५)“संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव”,प्रतिमा प्रकाशन, पुणे.

३) साळूंखे सर्जेराव (२०१०), “समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना”, प्रोफिशंट प्रकाशन, पुणे.


❖❖❖❖

# २

# अवलंबित्व सिद्धांत आणि नव उदारवादी सिद्धांतांचा दृष्टिकोन

**घटक रचना**

२.० अभ्यासाचा उद्देश

२.१ प्रस्तावना

२.२ अवलंबित्व पार्श्वभूमी

२.३ अवलंबित्व सिद्धांताचा इतिहास

२.४ अवलंबित्व सिद्धांतासाठी शास्त्रज्ञांचे योगदान

२.५ नव - उदारीकरणाची आर्थिक दृष्टिकोन

२.६ नव - उदारवादाची संकल्पना

२.७ नव - उदारवादाचा वर्तमान

२.८ सारांश

२.९ अभ्यासाचे प्रश्न

२.१० संदर्भ सूची

## २.० अभ्यासाचा उद्देश :

- अवलंबित्व सिद्धांताची पार्श्वभूमी व इतिहासाची माहिती करून देणे.
- अवलंबित्व सिद्धांतासाठी विविध समाजशास्त्रीय व अर्थशास्त्रीय विचारवंतांच्या योगदानाची ओळख करून देणे.
- नव उदारीकरण सिद्धांताचा आर्थिक दृष्टिकोन व संकल्पनात्मक मांडणीचा परिचय करणे.
- नव उदारीकरणाची वर्तमान काळातील परिस्थिती स्पष्ट करून देणे.

## २.१ प्रस्तावना :

औद्योगिकरणानंतर जगात प्रगती व विकासाचे वारे वाहत होते. यामधून भांडवलशाही उद्योगाचा विकास होऊ लागला. जागतिकीकरण, खानगीकरण व उदारीकरण ह्या आर्थिक विकासाची संकल्पना किंवा विचार प्रणाली प्रभावी झाल्या यामधुन विविध राष्ट्र विकसीत झाली. कारण ज्यांच्याकडे भांडवली गुंतवणूक आहे त्यांना आपला आर्थिक विकास करण्याची पूर्ण संधी होती. यामुळे विकसीत राष्ट्रांचा अधिक विकास झाला तर विकसनशील व अविकसीत राष्ट्रांची आर्थिक परिस्थिती मात्र जैसे थे झाली. यामधून विकासाच्या नावाखाली विकसीत राष्ट्रांनी इतर राष्ट्रातील बाजारपेठांवर कब्जा करून नव-वसाहती निर्माण करून आर्थिक शोषण करणे सुरू केली यामधून विकसनशील व अविकसीत देशात परावलंबी बनले आहेत. परीघ - केंद्र सिद्धांत

मांडला आहे. असे आर्थिक शोषण थांबवून सर्वात समान विकासाच्या संधी मिळाव्यात म्हणून नव-उदारवादी विचारांची मांडणी केली गेली आहे. नव-उदारवादाचे धोरण भांडवली संसाधन प्रक्रिया मुक्त करण्याचा पुरस्कार केला जातो. अशा अवलंबित्व सिद्धांत व नव-उदारवादी सिद्धांताची सविस्तर माहिती अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

## २.२ अवलंबित्व सिद्धान्त पार्श्वभूमी :-

अवलंबनाच्या सिद्धान्ताची कल्पना अशी आहे की, गरीब आणि कमी अविकसित राज्यांच्या परिघापासून संपत्ती विविध समृद्ध राज्यांच्या कानाकोपऱ्यापर्यंत पसरते आणि नंतरच्या खर्चासंदर्भातील बाबी समृद्ध करते. गरीब राज्यांना जगाच्या प्रणालीमध्ये एकत्रित केल्यामुळे गरीब राज्ये गरीब आणि समृद्ध असलेल्या अवलंबित्व सिद्धान्ताचा एक विवाद आहे.

आधुनिकीकरणाच्या सिद्धान्ताची प्रतिक्रिया म्हणून हा सिद्धान्त विकसित झाला ज्याच्या आधीच्या सर्व समाजाचे विकासाच्या समान टप्प्यांवर प्रगती केली होती, असे आजच्या अविकसित भागात त्यापूर्वीच्या काळात आणि म्हणूनच अविकसित भागात गरिबीतून मदत करणे हे त्यांना विकासाच्या या प्रचलित सामान्य मार्गावर जसे की गुंतवणूकी, तंत्रज्ञान स्थानांतरणे आणि जागतिक बाजारपेठेत अधिक एकत्रीकरण करून त्यांचे प्रमाण वाढविणे हे आहे. अवलंबित्व सिद्धान्ताने हे दृश्य नाकारले आणि असे भाकीत केले की, अविकसित देश केवळ विकसित देशांच्या मूळ आवृत्त्या नाहीत, परंतु त्यांच्या स्वतःच्या अद्वितीय वैशिष्ट्ये आणि संरचना आहेत; महत्त्वाचे म्हणजे जागतिक बाजार अर्थव्यवस्थांमध्ये कमकुवत सदस्यांची स्थिती आहे.

संपूर्ण सिद्धान्ताप्रमाणे अवलंबित्व सिद्धान्त यापुढे बहुसंख्य समर्थक नाहीत, परंतु काही लेखकांनी संपत्तीच्या जागतिक विभागात एक संकल्पनात्मक अभिमूखता म्हणून त्याच्या सतत संदर्भाप्रमाणे तर्क केला आहे.

अवलंबित्व सिद्धान्त १९५० च्या दशकात उदयास आला आणि त्यानुसार असा युक्तिवाद करण्यात येतो की, तिसऱ्या जगामधील गरीब देशांतील अविकसित आहेत, कारण साम्राज्यवादी आणि नव-वसाहतवादी शक्तींनी तेथील संसाधने आणि कच्चा माल स्वतःच्या फायद्यासाठी ओरबाडून त्या देशांचे पद्धतशीर शोषण केले आहे. त्यांचे समर्थक असा दावा करतात की संसाधने गरीब आणि अविकसित राज्यांच्या 'सीमेपासून; समृद्ध राज्यांच्या केंद्रस्थानी प्रवाहित होतात आणि गरिबांच्या जीवावर श्रीमंतांना अधिक समृद्ध करतात. आन्द्रे गूंदर फ्रॅंकसारख्या अवलंबित्व सिद्धान्तवाद्यांचे असे मुख्य मत आहे की, गरीब राज्यांना जागतिक व्यवस्थेत आणले जात असल्यामुळे गरीब राज्ये अधिकच गरिबीत रूतत आहेत आणि समृद्ध राज्ये अधिक समृद्ध होत आहेत.'

अवलंबित्वाचा साचा (डिपेन्डन्सी मॉडेल) दक्षिण गोलार्धातील राष्ट्रवाद्यांच्या (लॅटिन अमेरिका आणि आफ्रिका यांच्यापासून) आणि मार्क्सवाद्यांच्या वाढत्या संबंधांतून उदयास आला.

आधुनिकीकरण सिद्धान्तविरोधात त्यांची अशी प्रतिक्रिया झाली होती. आधुनिकीकरण सिद्धान्तात असे प्रतिपादन केले जाते की, सर्व समाजांचा विकास सारख्याच टप्प्यातून होतो. आजच्या अविकसित भागांची परिस्थिती जशी आहे तशाच परिस्थितीत आज विकसित असलेली राष्ट्रे काही काळापूर्वी होती. म्हणूनच अविकसित भागांना गरिबीतून बाहेर काढण्यासाठी त्यांना त्याच समान मार्गावरून न्यावे लागेल. त्यासाठी गुंतवणूक, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि जागतिक बाजारपेठेत त्याना समाविष्ट करून घेणे असे मार्ग स्वीकारावे लागतील.

अवलंबित्व सिद्धान्ताने हा दृष्टिकोन नाकारला आणि असा युक्तिवाद केली की, अविकसित देश केवळ विकसित देशांच्या मागास आवृत्त्या नाहीत, तर त्यांची स्वतःची अद्वितीय वैशिष्ट्ये आणि संरचना आहेत. त्याचबरोबर महत्त्वाचे म्हणजे जागतिक बाजार अर्थव्यवस्थेत ते अशक्त सदस्य म्हणून दाखल होण्याच्या परिस्थितीत आहेत.

## २.३ इतिहास :

अवलंबन सिद्धान्त सन १९४९ मध्ये प्रकाशित दोन प्रबंधांची उत्पत्ती झाली. एक हंस सिंगर यांच्या आणि एक राऊल प्रीबिशद्वारा - ज्यामध्ये लेखकास हे लक्षात येते की, विकसित देशांमधील आणि अविकसित देशांमधील व्यापाराच्या अटी वेळोवेळी अनिश्चित झाल्या होत्या. अविकसित देश खरेदी करण्यास सक्षम होतात. विकसित देशांमधून त्यांच्या कच्चा माल निर्यातीचा 'एक प्रमाणात दिलेल्या प्रमाणात कमी आणि कमी उत्पादित वस्तू' ही कल्पना 'प्रीबिश - सिगर थीसिस' म्हणून ओळखली जाते. युनायटेड नेशन्स आयोग फॉर लॅटिन अमेरिका (यूएनसीएलड) येथील अर्जेंटिनाचे अर्थशास्त्र प्रीबिश यांनी निष्कर्ष काढला की, अविकसित देशांना काही प्रमाणात आत्मविश्वास राखणे आवश्यक आहे. त्यांनी असा युक्तिवाद केला की, आयात - प्रतिसादात्मक औद्योगिकीकरण (आयएसआय) हा व्यापार आणि निर्यातीसाठी अनुकूल नाही हे अविकसित देशांसाठी सर्वोत्तम धोरण आहे. हा सिद्धान्त १९५७ साली पॉल अ. बारन यांच्या मार्क्सवादी दृष्टिकोनातून विकसित झाला होता. त्याच्या द पॉलिटिकल इकॉनॉमी ऑफ ग्रोथच्या प्रकाशनासह अवलंबितता सिद्धान्तापूर्वी मार्क्सवादी रोक्षा लक्झंबुर्ग आणि ब्लादिमिर लेनिन यांच्या साम्राज्यवादाच्या सिद्धान्तासह अनेक बाबी सामायिक करतो आणि मार्क्सवादयापासून सतत प्रेरणा मिळवितो आहे. काही लेखक अवलंबिता सिद्धान्ताचे दोन प्रमुख प्रवाह मानतात. एक लॅटिन अमेरिकन स्ट्रक्चरलिस्ट, प्रीबिशक, सेल्सी फर्टदो आणि ऑनिबिल पिंटो यांनी संयुक्त राष्ट्रांच्या लॅटिन अमेरिकेतील आर्थिक आयोगात (ईसा एलएसी किंवा स्पॅनिश, सीईपीएल) काम केले आहे; आणि अमेरिकेन मार्क्सवादी, पॉल ए बरान, पॉल स्वीजी आणि आंद्रे गंडर फ्रँक यांनी विकसित केले.

१९७२ साली लॅटिन अमेरिकेन डिपेंडन्सी मॉडेलचा वापर करून गुआनझी मार्क्सवादी इतिहासकार वॉल्टर रॉडनी यांनी आपल्या युरोपमधील साम्राज्यामार्फत जाणीवपूर्वक शोषले गेलेले आफ्रिकेचे वॉल्टर यांनी आपल्या युरोपमधील साम्राज्या वर्णन 'हाऊ युरोप अंडरडेव्हलप्ड आफ्रिका (HEUA)' या पुस्तकात बहुतांश खंडातील आधुनिक अवनतीशी शेट चालले आहे.

१९६० आणि १९७० च्या दशकात आधुनिकतेच्या सिद्धान्ताची टीका म्हणून हा सिद्धान्त लोकप्रिय होता, जो बहुतेक जगातील बऱ्याच प्रमाणात गरीबीमुळे वाढत गेला होता. उपविभागाचे कारण स्पष्ट करण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात आला. एक सिद्धान्त म्हणजे शहरीकरण दराने अनेक विकसनशील देशांतील औद्योगिक वाढ सोडली लॅटिन अमेरिकन स्ट्रक्चरलवादी आणि अमेरिकन मार्क्सवादी शाळांमध्ये बऱ्यापैकी फरक होता. परंतु काही मुलभूत मुद्द्यांशी सहमत होता. ओथ गट मान्य करतो की, केंद्र आणि परिघी यांच्यातील अवलंबनाच्या संबंधात तांत्रिक परिवर्तनाची एक स्वायत्तता आणि गतिशील प्रक्रिया विकसित करण्यासाठी परिघाची असमर्थता घालते. तंत्रज्ञानाच्या निर्मितीसाठी केंद्राच्या तंत्रज्ञानावर आणि तंत्रांवर नियंत्रण ठेवले. विदेशी भांडवलाची समस्या सोडवू शकले नाही. सर्व तंत्रज्ञान मर्यादीत असते. परंतु नावीन्यपूर्ण प्रक्रियेची नव्हे. इतर हे वारंवार कामगारांमध्ये कुशल कामगारांच्या आंतरराष्ट्रीय विभागणी बद्दल बोलले. परिघात अकुशल अवलंबून सिद्धांताचे प्रमुख वैशिष्ट्ये चर्चा करतांना म्हणतात की, त्यांच्या विश्लेषणाच्या केंद्रस्थानी अनावश्यक उतारा आणि भांडवल गोळा केले. लोकसंस्थेचा

उत्पादन निर्जन होण्याकरिता गरजापेक्षा उत्पादन अधिक अवलंबून आहे. भांडवल जमा करण्यासाठी काही अतिरिक्त उलाढालींचा वापर केला जावा. उत्पादन नविन साधनांचा खरेदी जर विकास घडत असेल तर चैनेच्या वापरांसारख्या वस्तूवर अलिखित खर्च केल्याने विकास घडत नाही. बरलेन यांच्या मते, "गरीब राष्ट्रात आर्थिक घडामोडींची दोन मुख्य कार्ये आहेत. वसाहतकालीन उत्पन्न देणारे वने ही कृषीक्षेत्रातील बहुतेक शिल्लक जमीन मालकांना दिली जाते. जे विकसित जगात श्रीमंत लोकांना उपभोगाच्या पद्धतीचे अनुकरण करण्यासाठी प्रयत्न केला जातो. त्यापैकी बहुतेक अशा प्रकारे विदेशी उत्पादित चैनीच्या वस्तू विकत घेतात. उदा. मोबाईल, कपडे इत्यादी विकासामध्ये गुंतवणुकीसाठी थोडी जमा होतात. परिघामध्ये अधिक अलीकडे आर्थिक उलाढालीचे उद्योग आहेत पण ती एका विशिष्ट प्रकारचीच हे परदेशाद्वारे सहसा स्थानिक रुचीच्या संयोगाने केला जाते. हा सहसा विशेष दर संरक्षण किंवा इतर सरकारी सवलतीतर्गंते असतो. या उत्पादनातील अधिकाधिक रक्कम दोन ठिकाणी जाते. त्यातील कांही भाग परकीय भागधारकांना नफा दिला जात असतो. शेअर्स, शेती, स्वागत समारंभ, फॅशन, खनिज यावर खर्च केला जातो. पुन्हा विकासासाठी वापरले जात नाही." विकासासाठी अनेक वस्तू पुन्हा वापरल्या जात नाहीत. बरलेन यांच्या मते, यामध्ये बदल करण्यासाठी राजकिय क्रांती आवश्यक आहे.

लॅटिन अमेरिकेत संरचनात्मक विचारांच्या सदस्यांनी असा युक्तिवाद केला की, मार्क्सवादांचा विश्वासार्हतेपेक्षा प्रणालीत अधिक आकांक्षा आहेत. त्यांनी असा युक्तिवाद केला की, आंशिक विकासासाठी किंवा अवलंबित विकासासाठी अनुमती देतो. परंतु तरीही बाहेर निर्णय निर्मात्यांच्या नियंत्रणाखाली असतो या अभिप्रायासाठी त्यांनी पुरातन काळातील लॅटिन अमेरिकेत औद्योगिकीकरणाचा अर्धवट प्रयत्न झाला होता पण अर्जेंटिना, ब्राझील, मेक्सिको यांनी सफलता मिळवली आहे. परदेशी निर्भरता, निर्यातदार आणि औद्योगिक देशांत संबंध नसून विविध राष्ट्रांच्या औद्योगिकीकरणाच्या दृष्टिकोनातून आर्थिक आणि राजकिय क्षेत्रांमधील एक फरक आहे. आर्थिकदृष्ट्या एक विकसित किंवा अविकसित होऊ शकतो. परंतु जरी आर्थिकदृष्ट्या प्रगत असले तरी कदाचित राजकीय स्वायत्तता किंवा आश्रित असू शकते. गिलर्मो ओडोनेल यांनी असा युक्तिवाद मांडला आहे की, नव-उदारमतवादी विचाराने निर्माण केलेल्या अडचणी लॅटिन अमेरिकेतील लष्करी युक्तीने उचलून धरले होते.

बहुराष्ट्रीय कंपन्यांचे महत्त्व व तंत्रज्ञानाचे राज्य प्रोत्साहन या बाबीवर लॅटिन अमेरिकन संरचनावादी विचारांनी भर दिला होता. उपभोगवादी व्यवस्था किंवा प्रामाणिक स्पर्धात्मकतेत फरक केला आहे. ज्यामध्ये उच्च उत्पादकतेवर आधारित प्रतिस्पर्धा करण्याची क्षमता आहे. आणि बनावट स्पर्धात्मकता आहे. जो कमी वेतनाच्या आधारावर आहे.

९०च्या दशकात तिसऱ्या विश्वाच्या कर्जाची समस्या निर्माण झाली होती. १९९० मध्ये आफ्रिकेत आणि लॅटिन अमेरिकेत स्थिरता आल्यामुळे अवलंबित विकासाची व्यवहारीक कांही शंका निर्माण झाल्या होत्या. पारंपारिक अवलंबन सिद्धांतकारांचा विश्वास आहे. परंतु केंद्र आणि परिघीय देशांमधील आर्थिक ताकदीतील फरक परीघीय राष्ट्रांच्या स्वतःच्या चलनात कर्जाची उणीव असावी म्हणून परस्परांसंबंधाचा कोणताही संबंध तांत्रिक सुविधात फरक नाही. संयुक्त राष्ट्रांची आर्थिक स्थिती त्यांच्या वित्तीय बाजारपेठेच्या महत्त्वाच्या दृष्टिने फार मजबूत आहे. कारण ती आंतरराष्ट्रीय राखीव चलन अमेरिकन डॉलर नियंत्रित करते. ७०च्या दशकांत ब्रेटन वुड्सच्या आंतरराष्ट्रीय वित्तीय करारनाम्याच्या अंत अमेरिकनच्या स्थितीवर बळकट झाला होता. कारण त्यांनी त्यांच्या आर्थिक कृत्यांवरील कांही अडचणी दूर केल्या आहेत.

## २.४ अवलंबित्त्व सिद्धांतासाठी शास्त्रज्ञांचे योगदान :

आंतरराष्ट्रीय स्तरावरील विरोध असूनही विकसनशील राष्ट्रात औद्योगिकीकरणाच्या मार्गाने प्रगतीची कोणतीही अपेक्षा आणि निर्णायक क्रांती म्हणून चर्चा करतांना मान्यताप्राप्त अवलंबन सिद्धांत मार्क्सवादापासून वेगळे आहेत. थेओटोनियो डॉस यांच्या समर्थनाने नवीन अवलंबन सिद्धांताचे वर्णन केले आहे. जे मार्क्सवादी विचारातील परिघावरील विकसनशील राष्ट्रांच्या अंतर्गत व बाह्यसंबंधांवर आधारीत असते.

### अ) <u>कार्डोसो यांचा परिघ केंद्र सिद्धांत :</u>

ब्राझीलचे भुतपुर्व राष्ट्राध्यक्ष फर्नांडो हेन्रीक कार्डोसो यांनी १९६०च्या दशकात राजकारणातून निवृत्ती घेत असतांना म्हटले होते हा केंद्र व परीघ यातील आर्थिक असमानता अभ्यास करण्याचा एक दृष्टिकोन होय. असे मत मांडून अवलंबित्व सिद्धांतावर विशेष भर दिला होता. कार्डोसो यांने अवलंबित्व सिद्धांताचे विचार पुढीलप्रमाणे मांडले आहेत.

१) परीघ आणि अर्ध - परिघांच्या देशांच्या विकसित भांडवलदार केंद्रामार्फत एक आर्थिक संरचना निर्माण होते.

२) या आर्थिक व्यवस्थेमुळे बाह्य समाज आणि त्यांच्यात आणि केंद्रादरम्यान असंतुलित आर्थिक संरचना निर्माण होते.ॉ

३) म्हणून परीघामध्ये आत्म निर्धारित वाढीवर मर्यादा येतात.

४) अशा वर्गसंबंधांच्या विशिष्ट वैचारिक स्वरूपात दर्शवितात.

५) अर्थव्यवस्थेचे व्यवहार आणि समाजाच्या राजकीय अभिव्यक्तीची हमी देण्यासाठी राज्याच्या भूमिकांत फेरबदल करण्याची गरज आहे. अनावश्यकता आणि संरचनात्मक असंतुलन यांचा समावेश आहे.

१९९० च्या दशकातील विकासाच्या प्रारूपांचे विश्लेषण हे प्रत्यक्षात गुंतागुंतीचे आहे. भांडवलशाही सहजासहजी विकसित होत नाही. परंतु संबंधित परिणाम जॉर्डन गोल्डस्टीम, व्हॉल्कोर बोर्नशियर आणि लुइगी स्कँडेला यांचा अभ्यासात दिला आहे. भारतासह कांही पूर्व आशियाई अर्थव्यवस्थांच्या आर्थिक विकासामुळे अवलंबित्व सिद्धांत आपले प्रभाव निर्माण करत आहेत. असंख्य स्वयंसेवी संस्थांवरही प्रभाव निर्माण होत आहे.

### ब) <u>अमीन यांची परीघ भांडवलशाहीची वैशिष्ट्ये :</u>

इस्लामिक राष्ट्रातील प्रमुख अर्थशास्त्रज्ञ समीर अमीन हे आहेत. या इजिप्शियन विचारवंतांनी अवलंबित्व सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अमीन यांनी परिघ भांडवलशाहीची कांही महत्त्वाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

१) परकीय वर्चस्व आणि वसाहतीचे हल्ला झाल्यामुळे या काळातील वर्णन कृषी आणि लघुउद्योग या दोन्हींमध्ये आहे.

२) परिघ असमान आंतरराष्ट्रीय विशेषीकरण निर्याताधारित शेती आणि खाण उद्योगावर लक्ष केंद्रित करतो. कमी मजुरीच्या स्थितीत परिघ औद्योगिकीकरण होणे शक्य आहे. वाढती उत्पादन क्षमतेसह असमान विनिमय संघ दुहेरी व्यापार करतात.

३) परिघ संरचना दिर्घकाळामध्ये झपाटलेल्या बेरोजगारीसह एक वेगाने वाढणारी तृतीय क्षेत्र आणि संपूर्ण सामाजिक आणि आर्थिक प्रणालीत भाड्यांचे महत्त्व निर्धारित करते.

४) सध्याच्या चालू खात्यातील शिल्लक, तूट, परकिय गुंतवणूकीचे नुतनीकरण आणि जागतिक आर्थिक चढ-उतारांत केंद्राकरीता महत्त्वाच्या बाजारपेठा उपलब्ध करणारी परिघांमध्ये कमी व्यावसायिक क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण ठरते.

## क) बॉलेस्टनचा सिद्धांत :

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ इमॅन्युएल वॉलेस्टनने अवलंबित्व सिद्धांतातील मार्क्सवादी स्वरूपांत मांडणी केली आहे. हा सिद्धांत जागतिक पद्धतीचा निर्माण केला आहे. जगात अर्ध गरीब राष्ट्रांची तिसरी श्रेणी ही केंद्र आणि परिघ यांच्यातील मध्यवर्ती भाग दाखवला जातो. वॉलेस्ट्रिन यांनी द्वि-प्रतिमान प्रणाली ऐवजी त्रि-प्रतिमानावर विश्वास ठेवत असे. कारण त्यांनी केंद्र - परीघ राष्ट्रे म्हणून सरल आकृती वर्गीकरणातील जागाची व्यवस्था आणि गुंतागुंतीची मानली जाते. अनेक राष्ट्रात यापैकी श्रेणीत एकत्रीत होत नाही. म्हणून त्यांनी आपल्या प्रतिमान अवस्थेत एक अर्ध-परिघ कल्पना म्हणून केला आहे. प्रतिमानात अर्ध-परिघी औद्योगिक आहेत. केंद्रापेक्षा तंत्रज्ञान कमी सहभाग आणि वित्त नियंत्रित करत नाही. अर्ध-परिघीय एक गट उदय दुसऱ्या समुहाच्या किंमतीवर होतो. पण असमान विनिमय आधारित जागतिक अर्थव्यवस्थेच्या असमान मांडण्या स्थिर राहतात. पहिल्या महायुद्धानंतर ऑस्ट्रो-हंगेरीतील समाजवादी कार्ल पोलायमी यांच्या लिखाणास जागतिक प्रणालीतील सिद्धांताची सुरुवात होते. परंतु सध्याचे स्वरूप सहसा वॉलेस्ट्रिन यांच्या विचाराशी संबंधीत आहे. अवलंबन सिद्धांताची जोहान गलटुंगच्या स्ट्रक्चरल थिअरी ऑफ साम्राज्यशाहीशी पण संबंधीत आहे.

अवलंबन सिद्धांताच्यानुसार अल्प कालावधीत विकास वाढ असले तरीही परिघात दिर्घकालीन असंतुलित विकास होतो. उच्च नकारात्मक चालू व्यवहारातील शिल्लक राहील. चढ-उतार चक्रीय आर्थिक वाढ मध्यमकालीन व दिर्घकालीन सामाजिक विकासाच्या विरुद्ध राष्ट्रीय तुलनेवर व्यापक प्रभाव पडतो. जागतिक स्तरांवर सांचयित होण्याचा तर्क वेळेनुसार बदलतो. १९८०च्या दशकात जागतिक भांडवलशाहीची तार्किकता निदर्शनास आली. पुर्वीच्या नियमन मंडळाच्या तुलनेच आर्थिक संबंधातील असमान देवाण-घेवाणीची भूमिका दुर्लक्षित करणे शक्य नाही. स्पष्टीकरण संबंधीत देश दुहेरी कारणीभूत दृष्टीने असल्यास असमान विनिमय केले जातात.

## ड) बॉलेस्टनच्या सिद्धांतावरील टिका :

### १) स्पर्धांचा अभाव :

देशातील उद्योगांना अनुदान अर्थसाहाय्य देऊन बाहेरच्या देशाकडील आयातीस प्रतिबंध करणे, कंपन्यांना त्यांच्या उत्पादनांत सुधारणा करण्यास, त्यांच्या प्रतिक्रियांत अधिक कार्यक्षण होण्यासाठी प्रयत्न करणे ग्राहकांना संतुष्ट करण्यासाठी किंवा नवीन संकल्पना शोधण्यास कमी प्रोत्साहन मिळू शकते.

### २) आर्थिक स्थिरता :

सरकारच्या समर्थनावर अवलंबून असलेले उद्योग फार काळ टिकण्यात नाहीत. विशेषतः गरीब राष्ट्र म्हणजे असे राष्ट्र की जे अधिक प्रमाणात विकसित देशांकडून परदेशी मदतीवर अवलंबून असतात.

### ३) घरगुती संधीचा खर्च :

घरगुती उद्योगांवर अनुदान खर्च सरकारकडून होतो. म्हणून इतर मार्गांनी खर्च केलेले पैसे दर्शवतात. घरगुती पायाभूत सुविधा, बियाणे भांडवल किंवा गरजेनुसार सामाजिक कल्याण कार्यक्रम राबवणे. वाढत्या किंमतीमुळे आणि आयात निर्बंधामुळे लोकांना आपल्या गरजा पूर्ण करणे कठिण जाते किंवा पर्यायी वस्तूंचा वापर करावा लागतो. अन्यथा महाग किंमतीला अशा वस्तू खरेदी करणे आवश्यक असते.

### ४) बाजारातील अर्थतज्ञ :

अवलंबित्व सिद्धांताविरुद्ध आपल्या विवादात अनेक आहेत. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या सुधारणेनंतर सरकार नियंत्रित व्यवसायातून व्यापार करता यावा म्हणून तुलनात्मक फायदा आणि उपक्रम संबंधी अवलंबित्व सिद्धांत दावा करत आहे. आउटसोर्सिंग सारख्या चळवळीपासून उत्पन्न होणारी आर्थिक प्रगती मोठे भांडवल गुंतवणूकीपैकी एक प्रकार दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरिया हे व्यापाराधारित विकासाचे एक उदाहरण आहेत. निरपेक्ष स्वावलंबनमुळे कोरियन युद्ध होऊन दोन राष्ट्रात विभाजन झाले. त्यांच्याकडे साधारण समान लोकसंख्या, संसाधने व पायाभूत सुविधा होत्या. ज्यामुळे दोघांनाही विकासाची समान संधी होती. अवलंबित्व सिद्धांतानुसार उ. कोरियाने आयात प्रतिस्थापन औद्योगिकरणाचे धोरण अंमलात आणले होते. तर द. कोरियाने तुलनात्मक फायदा सिद्धांतामार्फत सुचविलेल्या निर्यात धोरणानुसार औद्योगिकीकरणाचा धोरणाचा पाठपुरावा केला. २०१३ मध्ये द. कोरियाचे दरडोई उत्पन्न उ. कोरियाच्या १८ पटीने अधिक होते. आफ्रिकेत ज्या राष्ट्रांत आयात प्रतिस्थापन विकासावर जोर देण्यात आला आहे. झिम्बाब्वे हे विशेषतः खराब काम करणाऱ्यां लोकांत आहेत. तर महाद्वीप म्हणजे तेल उत्पादीत अर्थव्यवस्था असणाऱ्या राष्ट्रात इजिप्त, दक्षिण आफ्रिका व ट्यूनीशिया यांनी व्यापार आधारित विकास केला आहे.

### इ) <u>गंडर फ्रँकचा अवलंबित्व सिद्धांत :</u>

फ्रँक यांच्या मते भांडवलवादाच्या इतिहासात विकसनशील राष्ट्रांसाठी जे वसाहतवादाचे व साम्राज्यवादाचे अनिर्बंध लालूच, लूट व शोषणच नव्हे तर त्या राष्ट्रांत भांडवलशाहीची एक प्रक्रिया सुरु होती. ज्यामुळे विकसनशील राष्ट्रांच्या सातत्यपूर्ण आणि अनिर्बंध शोषणाकरीता संरचना निर्माण केली होती. फ्रँक भांडवलशाहीला जागतिक व्यवस्था मानतात. ज्यामध्ये विकास व विकास कमतरता यांच्या विनिमय व्यवस्था किंवा संबंधाची प्रकार म्हणून स्पष्ट करतात. फ्रँक हे महानगर व उपनगर य क्षेत्रांची निवड विकासाच्या प्रक्रियेच्या अभ्यासात करतो. फ्रँक म्हणतो की, विकासाच्या अभावाचा सिद्धांताचा अभ्यास करताना विकसनशील राष्ट्रांच्या अभ्यास करावा त्या आधारे स्पष्ट होईल की राष्ट्रांची विकासाच्या अभावांची स्थितीमुळे त्यांच्या भांडवलशाही राष्ट्रासोबतच्या साम्राज्यवादी संबंधामुळे होय.

### ई) <u>वॉलरस्टाईनचा जागतिक व्यवस्था सिद्धांत :</u>

वॉलरस्टाईन यांनी जगाला भौगोलिक सीमा व स्वातंत्र्य राष्ट्रांच्या पलीकडे अस्तित्व असते. मोठ्या प्रमाणात आर्थिक प्रक्रियांवर आधारित एक घटक व्यवस्था म्हणून पाहिले आहे. वॉलरस्टाईन १५ व्या शतकातील भांडवलशाही अस्तित्वात असलेल्या सांगतात. भांडवलशाही मुख्य तत्त्व जास्तीत जास्त नफा कमावणे हाच आहे.

वॉलरस्टाईन यांनी मांडलेल्या जागतिक व्यवस्थेचे सिद्धांत जागतिक श्रम विभाजन आहे ज्यामुळे विविध सांस्कृतिक व्यवस्था एका अर्थव्यवस्थेत एकत्र झाल्या आहेत. जागतिक व्यवस्था ही एक परस्पर अवलंबून असलेली राष्ट्रांची व्यवस्था आहे. असे राष्ट्र जागतिक व्यवस्था ही राजकीय व आर्थिक संबंधानी एकमेकांशी जोडलेले आहेत. सुधारित दळणवळण व संचार साधनांमुळे जागतिक व्यवस्था विस्तारित होत आहे.

विकासाच्या आभाच्या सिद्धांताला अवलंबित्व व जागतिक व्यवस्था सिद्धांत एकमेकांशी संबंधीत शाखा मानल्य जातात. भांडवलशाही विकसनशीलता अविकसित अशा घटकांवर या सिद्धांतात रचना करण्यात आली आहे. विकसित भांडवलशाही राष्ट्र नवसाम्राज्यवादी आहेत असे अवलंबित्व सिद्धांतमधून स्पष्ट होते. जागतिक व्यवस्था सिद्धांत भांडवली व्यवस्था परिवर्तनावर विशेष भर देतो. तर विकसनशील राष्ट्र हे विकसीत राष्ट्रांवर अवलंबून असल्याने अवलंबित्व सिद्धांत स्पष्ट करतो.

## २.५ नव - उदारमतवादी आर्थिक दृष्टिकोन :

दुसऱ्या जागतिक महायुद्ध १९३९-१९४५ मुळे अमेरिकेसह इतर पाश्चिमात्य राष्ट्रांची खूप आर्थिक हानी झाली होती. जपान, इटली यांच्यासारख्या राष्ट्रांनी तर ऱ्हासाची मर्यादा अधिकच ओलांडली होती. जगातील भौतिक राष्ट्रांची अर्थव्यवस्था पूर्णपणे मोडकळीस आली होती. या काळात अर्थव्यवस्थेला स्थिरता प्राप्त करण्यासाठी सामुहीक सहकार्याची आवश्यकता होती. यामुळेच १९४६ मध्ये जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अशा जागतिक पातळीवरील आर्थिक संस्था स्थापन झाल्या होत्या. पुढे १९४८ मध्ये जागतिक व्यापारी व जकात विषय करारमान्य करण्यात आले होते. आर्थिक स्थैर्य निर्माणाच्या दृष्टिकोनातून जागतिकीकरणोची भूमिका महत्त्वाची होती.

१९८० च्या दशकात पाश्चिमात्य राष्ट्रांतील अर्थव्यवस्थेला चांगली भरभराट झाली होती. आशिया, दक्षिण अमेरिका या खंडातील विकसित हे विकसनशील राष्ट्रामध्ये अतिरिक्त भांडवल नैसर्गिक साधनसंपत्ती वापरण्यास व बाजारपेठांवर कब्जा मिळवून जास्तीत जास्त नफा कमवण्यासाठी विविध कंपन्या दावा करू लागल्या आहेत. पश्चिम राष्ट्रांचा हितसंबंध जोपासण्याच्या दृष्टिकोनातून तेथील प्रशासकांनी जागतिकीकरण, उदारीकरण, व्यापारासाठी खुले क्षेत्र धोरणांचा पुरस्कार केला. या विचारांच्या पुर्ततेसाठी विकसित राष्ट्रांनी पुढाकार घेतला त्याशिवाय दबाव तंत्राचे वापर करून अनेक राष्ट्रांशी करार करून घेतले. भारताने १९९१ साली या करारावर सह्या करून नविन उदारीकरणांचे धोरण स्विकारले आहे.

आर्थिक तत्त्वज्ञानाच्या रूपात १९३०च्या दशकात युरोपीय उदारवादी विचारवंतानी नव-, उदारवादी विचार निर्माण केली. त्यांनी शास्त्रीय उदारवाद आणि समाजवादी विचाराला विरोधी भाषाचे तत्त्वज्ञान मानले. विकसनशील किंवा मध्यम प्रकाराचा शोधला होता. १९३०च्या आर्थिक अपयशांची पुनरावृत्ती टाळणेसाठी विकासाची प्रेरणा घेऊन नव-अभ्यासकांना शास्त्रीय उदारीकरणाच्या आर्थिक धोरणास दोष दिला जातो. पुढे नव-उदारवाद असा शब्दप्रयोग शास्त्रीय उदारवाद सिद्धांताकडे लक्ष केंद्रीत कले. बाजारातील अर्थव्यवस्थेच्या विचारानुसार एक मजबूत राष्ट्र निर्माणाला प्रोत्साहित करते. ज्या प्रारूपांना सामाजिक बाजार अर्थव्यवस्था म्हणून ओळखले जात आहे.

१९६०च्या दशकात नव-उदारवाद याचा उपयोग खूप अधिक आकारला गेला. चिलीमधील ऑगस्टी पिनोशेत यांच्या आर्थिक सुधारणांच्या बाबतीत १९८०च्या दशकात पुन्हा नव-उदारवाद हा शब्द प्रचलित झाला. बाजार सुधारणावादी **समीक्षाने नियोनपणे** नकारात्मक शब्द उपयोगात आणला होता. उदारवादी विचारापेक्षा क्रांतीकारी आणि आर्थिक भांडवलशाही व्यवस्थेत रूपांतर झाले. अर्थतज्ञ फ्रेडरिक हायेक, मिल्टन फ्रिडमन आणि जेम्स एम बुकानान, मार्गारेट थॅचर, रोनाल्ड रेगन आणि ॲलन ग्रीनस्पेन यांच्यासारख्या धोरणात्मक तज्ञांच्या मदतीने एकत्रीत विचाराने नव-उदारमतवादांचा नवा अर्थ विद्वानांच्या वापरातून मांडला गेला.

## २.६ नव - उदारमतवादाचा अर्थ / संकल्पना :

फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ चार्ल्स गडी यांनी इंग्रजी भाषेतील शब्दांचा प्रारंभिक प्रयोग १८९८ साली फ्रेंच भाषेतील नेओ-लिबेरलिसिस या शब्दाच्या मुळेच अस्तित्वात होता. १९५१ मध्ये निबंधातील अर्थशास्त्रज्ञ मिल्टन फ्रिडमन यांच्यासह अनेकांनी नेओ-लिबेरलिसिस या शब्दाचा वापर केला होता. १९३८मध्य कॉलोक वॉस्टर लिपमन यांनी निओ-लिबेरलिसीम हा शब्द इतर आरीसह मांडला होता. अखेरीस आर्थिक विश्वाच्या विशिष्ट संघाचे वर्णन करण्यासाठी त्यावर उपयोग करण्यात आला. संवादात नव-उदारीकरण संकल्पना किंमतयंत्रणा मुक्त उद्योग स्पर्धेचे पद्धती एक मजबूत व निष्पक्षपाती स्थिती यांचा प्राधान्यांसह परिभाषित होती. नव-उदारवाद म्हणजे राजव्यवस्थेने हस्तक्षेप करून आधुनिक आर्थिक धोरणाचा सल्ला घेत होते. नव-उदारवाद राजव्यवस्थेचा हस्तक्षेप शास्त्रीय उदारवादी विरोधकांच्या सोबत संपूर्ण होता. १९५०-६० मध्ये बहुतेक विद्वान सामाजिक बाजार अर्थव्यवस्थेचा प्रमुख आर्थिक सिद्धांतांचा संदर्भ घेऊन नव-उदारवाद समजेल. जर्मन शास्त्रज्ञ व नव-उदारवादी विचारवंता बरोबरीचे वैचारिक संबंध निर्माण केले. याच काळात नव-उदारवादी हयक यांचे नाव ही प्रसिद्धीस आले.

ऑगस्टी पिनोशेतच्या चिलीतील लष्करी राजवटीच्या विरोधी विचारवंत होते. त्यांच्या समर्थकांनी आर्थिक सुधारणेचे वर्णन हे नवीन अर्थ स्पॅनिश बोलणाऱ्या विद्वानात झाले. राजकिय अर्थव्यवस्था इंग्रजी भाषेमुळे प्रसिद्धीत येत नव्हते. परंतु नव - उदारवादी विचारधारा आर्थिक सिद्धांत विकास सिद्धांत वगैरेमुळे प्रसिद्धी आली.

### उदारीकरणाची वैशिष्ट्ये :-

#### १) परस्पर संपर्कात वृद्धी :

जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण (L.P.G.) या धोरणामुळे जागतिक राष्ट्रा राष्ट्रातील देवाण-घेवाणीचा विकास झाला आहे. राष्ट्रा - राष्ट्रातील परस्परांतील विविध क्षेत्रातील संपर्क सुलभ व सहज करणे शक्य झाले आहे. संपर्क माध्यमांच्या क्रांतीमुळे माहिती तंत्रज्ञानाचे जाळे संपूर्ण विश्वात पसरले आहे. व्यापारी संबंधा बरोबरच सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक व शैक्षणिक देवाण-घेवाण वाढली आहे. संपूर्ण विश्व अतिशय जलद गतीने एकमेकांच्या जवळ आले आहे. जगातील प्रत्येक राष्ट्र विकसित राष्ट्रांच्या संपर्कामुळे विकासांच्या दिशेने वाटचाल करत आहे.

#### २) माहिती तंत्रज्ञानाचा भरपूर उपयोग :

जागतिकीकरण प्रक्रियेमुळे संपर्क साधनात वाढ व उदारीकरण प्रक्रियेच्या विचारामुळे विज्ञान व तंत्रज्ञानांची देवाण-घेवाण वाढली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रमाण दिवसें दिवस वाढत आहे.

अर्थव्यवस्थेतील मुक्त धोरणामुळे राष्ट्रांच्या सीमा कमी पडून जगातील इतर राष्ट्रातील गरजूपर्यंत प्रत्येक तंत्रज्ञान सहज पोहचू लागले आहे.

**३) व्यापक व्यापारी संबंध :**

जागतिकीकरण प्रक्रियेमुळे जगातील सर्व बाजारपेठा प्रत्येक देशाला व्यापार करण्यासाठी मुक्त झाल्या आहेत. राष्ट्रा - राष्ट्रातील व्यापारी संबंध अधिक मजबूत होऊ लागले आहेत. व्यापारासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे व्यापार जलद गतीत होत आहे. आधुनिक काळात ऑनलाईन खरेदी-विक्रीच्या विविध साईड उपलब्ध आहे. तसेच आर्थिक देवाण-घेवाण पण ऑनलाईन होत आहे.

**४) विकासाच्या अनेक संधी :**

जागतिकीकरणामुळे विकसनशील आणि अविकसित देशांना विकासाच्या समान संधीची व्यवस्था निर्माण झाली आहे. छोटे देश देखील आंतरराष्ट्रीय व्यापारात आपले स्थान निर्माण करतांना दिसू लागले आहेत. अनेक देशांनी आपला विकास करण्यासाठी जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण प्रक्रियेने यश मिळवून स्वावलंबी राष्ट्र म्हणून जगात आपली ओळख निर्माण केली आहे.

**५) नव - वसाहतवादाचा उदय :**

जागतिकीकरणामुळे मोठ्या राष्ट्रातील मोठ्या कंपन्यांनी बाजारपेठा काबीज केल्यामुळे देशा देशातील दरी वाढत असल्याचे दिसते. विकसित राष्ट्र अधिक श्रीमंत होऊन आर्थिक सत्ता केंद्र बनत आहेत. (उदा. अमेरिका, चीन) म्हणून विकसनशील व अविकसीत राष्ट्रे अधिक गरीब बनत आहेत. थोडक्यात अनेक राष्ट्रांनी गरीब राष्ट्रांबरोबर व्यापारी करार करून नव वसाहती निर्माण केल्या आहेत. हा परिणाम उदारीकरणाचा आहे.

**६) नव - उदारीकरणाचा उदय :**

उदारीकरण प्रक्रियेतील दोषामुळे विकसनशील व अविकसीत राष्ट्रात आर्थिक समस्या निर्माण होत आहेत तर विकसीत राष्ट्र अधिक श्रीमंत होत आहेत. अशा परस्परविरोध विचारात नव-उदारीकरणवाद उदयास आला आहे. नव-उदारीकरणवादाची प्रक्रिया १९८० च्या दशकात प्रारंभ झाली आहे. यामुळे जगात नविन विचार परंपरा मिळेल. ज्यामुळे सर्वांचा विकास करणे शक्य होईल अशी अपेक्षा नव-उदारीकरणाकडे आहे.

## २.७ नव - उदारवादी विचाराचे वर्तमान :

रोमेर यांच्या मते १९७०च्या दशकात नीतिशास्त्रकार थिंक टँकयोंनी सामाजिक - लोकशाही सुधारणावादी निषेध केला. उद्योगपतींनी मुक्त बाजार अपरिहार्यपणे लागू करण्यासाठी प्रयत्नकला असे विसाव्या शतकाचे वर्णन केले. या मुक्त व्यापारी धोरणाचे निराकरण करण्यासाठी १९७०च्या सुमारासे डाव्या विचाराच्या संघटनांने प्रयत्न केले. उदारीकरण सिद्धांत एक मुक्त बाजाराची कार्यक्षमता, आर्थिक वाढ उत्पन्न वितरण आणि तंत्रज्ञान प्रगतीला परवानगी देतो. उदारीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या थांबविण्यासाठी कोणतेही राष्ट्र आपली आर्थिक नुकसान करण्यास तयार नाही. यासाठी आपण नव-उदारवादाचा पर्याय देऊ शकतो. ज्यामुळे देशात सामान्यतः समाजात नविन राजकीय, आर्थिक व सामाजिक व्यवस्थेचा पर्याय असतो.

ज्यामुळे नविन बाजार संबंधावर भर देईल आणि राज्यव्यवस्थेच्या भूमिकेचे पुनर्रचना करता येते. बहुतेक विद्वान वैचारिक जबाबदारीने सांगत आहेत की नव-उदारीकरण हे अर्थव्यवस्था, राजकारण आणि सामाजिक जीवनांच्या सर्व क्षेत्रात स्पर्धात्मक बाजारपेठांत विस्तार म्हणून व्यापकपणे परिभाषा केली आहे.

कांही विचारवंताच्या मते नव-उदारवाद हे सामान्यतः मॅटरॅरिझम, न्योकॉन्सर्वेटिझम वॉशिंग्टन या विचारानुसार बाजार भाव सुधारसारख्या शब्दाने निराशाजनक शब्दाचा वापर केला जातो. नव-उदारवादी म्हणून वर्गीकरण धोरणाची वकिली केली जाते, अशी टिका केली जाते. डॅनियल स्टॅडर्मेन जोन्स यांच्या मते, जागतिकीकरण आणि पुर्नआर्थिक संघटनांशी संबंधीचे लहान स्वरूप होय. नव-उदारीकरण संबंधी 'हँडबील' या हस्तपुस्तिकेत मार्केट ओरिएंटेड पॉलिसीच्या उद्रेक म्हणून ओळखले जाते. व्यापक, सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय आणि आर्थिक समस्येसंबंधी संज्ञा असतांना हस्तपुस्तिका हे तिरस्करणीय होय. नव-उदारवाद गेल्या काही दशकांपासून सामाजिक परिवर्तन समजण्याची एक मार्ग म्हणून कार्य करत आहे. सध्या नव-उदारीकरण हे बाजारपेठेतील सुधारीत धोरणांच्या संदर्भातील म्हणून ओळखले जात आहे. मुल्य नियंत्रण नष्ट करणे, भांडवली बाजाराची मर्यादा कमी करणे, व्यापारी - अडथळे कमी करणे, अर्थव्यवस्थेतील राज्य प्रभाव कमी करणे आणि खानगीकरणावर विशेष मर्यादा या महत्त्वाच्या भुमिका.

**उदारीकरणाचे बाजारपेठेतील सुधारीत धोरणे :**

**१) मुल्य नियंत्रण :**

जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणांतून विविध कंपन्या, उद्योग केवळ नफा कमवण्यासाठी निर्माण झाल्या होत्या म्हणून वस्तूच्या भरमसाठ किंमती वाढवून अधिकात अधिक नफा कमवत होते. पण नव-उदारीकरणाचे मुख्य धोरण म्हणून वस्तू किंवा उत्पादनाच्या किंमती निर्धारीत करणे ज्यामुळे सर्वसामान्य समाजात अधिक नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाते.

**२) भांडवलीबाजाराची मर्यादा कमी करणे :**

आर्थिक देवाण-घेवाणीसाठी विविध स्वरूपाच्या भांडवली संस्था असतात. त्यांना राज्याने विविध स्वरूपाच्या मर्यादा घातलेल्या असतात त्यांना मुक्त आर्थिक उलाढाल करण्यासाठी अधिकार देणे.

**३) व्यापारी अडथळे कमी करणे :**

राज्य व्यवस्थेत विविध कायदे व नियम तयार करून विविध बंधने परवाने वगैरे अडथळे व्यापार करण्यास अडसर आहेत त्यांना कमी करणे.

**४) अर्थव्यवस्थेतील सरकारी प्रभाव कमी :**

अर्थव्यवस्थेच्या संदर्भातील सर्वाधिकार सरकारकडे असतात. विविध स्वरूपाचे बंधने आर्थिक देवाण-घेवाणीत असतात म्हणून सरकारी प्रभाव कमी करणे.

### ५) खाजगीकरणावर विशेष भार :

देशातील विविध उद्योग व सेवा क्षेत्रांचे खाजगीकरण करणे तसे तोट्यात चालणारे उद्योग बंद करणे.

अशा प्रकारे भूमिका उदारीकरणाची होती. यावर उपाय म्हणून अमेरिकन मार्गारेट थॅचर आणि रोनाल्ड रेगन यांनी सुरू केलेली आर्थिक सुधारणेशी संबंधीत आहे.

### १) विकास प्रतिकृती :

विकासाची नवीन प्रतिकृती म्हणजे संरचनावादी अर्थशास्त्राचा विरोध होय.

### २) आर्थिक खर्च कमी :

एक स्वतंत्र संकल्पना म्हणून राज्यातील कारभारावरील खर्च कमी करणे. याची व्यापक मुल्य अशी होती. स्वतःच्या राज्यापासून सुधारणेला प्रारंभ करणे.

### ३) शैक्षणिक प्रारूप :

सुधारणे महत्त्वाचा भाग म्हणून शैक्षणिक प्रारूपात आर्थिक सिद्धांतातील नव-विचाराच्या संबंधीत समावेश करणे.

यावर भर देऊन केले होते.

समाजवादी विचाराच्या सॉमर यांचा दावा आहे की गेल्या कांही वर्षात न्यु डील प्रोग्राम्स आणि पॉलिसीचा छेद या मध्ये मुक्त बाजार कल्पनांचा प्रभाव काय आहे याविषयी वाद आहे. नव-उदारवादी लॉईसेस - फेअर म्हणजे मुक्त बाजार विचारधारा व्यापक व प्रगतीची आहे. नव-उदारवाद हा राजकीय तत्त्वज्ञान आहे जे भांडवली सं-स्वयंत्रांची प्रक्रिया मुक्त करण्याचा प्रयत्न करते आहे. रॉबर्ट मॅकरोन्नी यांनी "ग्लोव्हज ऑफ द कॉपिटीलिझम इन द मॉज ऑफ" अशी व्याख्या मांडली आहे. सामान्य जनता खास करून अमेरिकेत हे शब्द बहुधा अज्ञात आहेत. शब्दांची प्रयोग शाळा राजकारणीय टीका नव-उदारीकरणवादाला परिभाषित करतात.

## २.८ सारांश :

जागतिक नियोजनाच्या मध्यवर्ती व्यवस्था किंवा धोरणाचा प्रभाव करणारी काही विचार किंवा मार्ग असतात. समाजाचा गौरवास्पद म्हणून विचार म्हणून उदारवादाचे अलिप्त विचाराने एकत्र आणणारी एक व्यवस्था होय. म्हणून मिल्टन फ्रिडमनने नव-उदारवादी हा शब्द प्रयोग केला आहे. उदारवादी विचाराप्रमाणेच नव-उदारवादी विचारांनाही आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य केले आहे. कारण उदारवादाप्रमाणे नव-उदारवाद ही बुद्धिवादी आहे. १९४७ मध्ये अमेरिकेत पहिली नव-उदारवादी परिषद भरली होती. १९५१ मध्ये अनेक युरोपीय लोकांचा सहभाग या विचारधारेने झाला. आज संपूर्ण जगाने नव-उदारवादी विचाराला स्विकार केले आहे.

दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या प्रक्रिया व्यापारी व आर्थिक विकासाच्या दृष्टिने जगासमोर निर्माण झाल्या. जागतिकीकरण ही प्रणाली जगातील प्रत्येक राष्ट्रांनी स्विकार केली आहे. या प्रणालीमुळे जागतिकीकरण, उदारीकरण व

खाजगीकरण (L.P.G.) ही विकास धोरण निर्माण होऊन विकास प्रक्रियेला गती प्राप्त झाली. सर्व राष्ट्रांना विकासाची संधी समान प्राप्त झाली. कांही विकसनशील देश विकसीत पण झाले.

परंतु भांडवलशाही विकसीत राष्ट्राने विकसनशील व अविकसीत राष्ट्रांचे आर्थिक शोषण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे विकसीत राष्ट्रे अधिक विकसीत होऊ लागली व गरीब राष्ट्रे गरीबच राहिली. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या नव-वसाहतवाद छोट्या मार्गाने सुरू करून गरीब राष्ट्रांना आर्थिक गुलामगीरी स्विकारण्यास भाग पाडू लागली आहेत. अशा छोट्या वसाहतवादाला विरोध करून समस्त जगात आर्थिक, सामाजिक समता निर्माण करून विश्वातील समस्त मानव जातीच्या कल्याणाचा नवीन मार्ग म्हणजे नव-उदारीकरण मार्ग होय. म्हणून हा नव-उदारीकरण संबंधी विचाराचा व्यापक अभ्यास होणे महत्त्वाचे आहे.

## २.९ अभ्यासाचे प्रश्न :

१) नव-उदारीकरण म्हणजे काय? उदारीकरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) अवलंबित्व सिद्धांताचा अर्थ सांगून ऐतिहासिक आढावा घ्या.

३) अवलंबित्व सिद्धांतासंबंधी विविध विचारवंतांनी दिलेले योगदान सांगा.

४) नव-उदारीकरण सिद्धांत या नवीन आर्थिक दृष्टिकोनाबद्दल चर्चा करा.

५) टिपा लिहा.

  अ) कार्डोसोचा परिघ - केंद्र सिद्धांत

  ब) वालिस्टनच

  क) उदारीकरणाची धोरणे

## २.१० संदर्भ सूची :

१) डॉ. प्रदिप आगलावे, समाजशास्त्रीय सिद्धांत साईनाथ प्रकाशन - नागपूर

२) सर्जेराव बोराडे, डॉ. प्रदिप गांगुर्डे, शिल्पा जाधव, विकासाचे समाजशास्त्र, निराली प्रकाशन, पुणे - २०१८

३) ए. वाय. कोंडेवार, समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४) प्रसाद गोपीकृष्ण, विकास का समाजशास्त्र, रावत पब्लिकेशन - जयपूर - १९९९.

५) Harrisan David, Sociology of Modernisation and Development, Heritage Publishers, New Delhi.

❖❖❖❖

# ३

# मानवी विकास निर्देशांक

**घटक रचना**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ संकल्पना

३.३ मानव विकास निर्देशांकांची तत्त्वे

३.४ मानव विकास निर्देशांकांचे प्रमुख घटक

३.४.१ शाश्वतता

३.४.२ उत्पादकता

३.४.३ सक्षमीकरण

३.५ कमी मानव विकास निर्देशांकांची कारणे

३.६ निष्कर्ष

३.७ सारांश

३.८ प्रश्न

३.९ संदर्भ

## ३.० उद्दिष्ट्ये

- मानव विकास निर्देशांक या संकल्पनेची ओळख करून देणे.
- मानव विकास निर्देशांकांच्या निर्देशकाविषयीचे आकलन विकसित करणे.
- ज्या परिस्थितीचा परिणाम मानब विकास निर्देशांक कमी होण्यात होतो त्या परिस्थितीचे विश्लेषण करणे.
- एखाद्या राष्ट्राचे मानव विकास निर्देशांकाचा क्रमांक सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

## ३.१ प्रस्तावना

कोणत्याही देशाचा विकास होण्यासाठी त्याचे मानव संसाधन विकसित करणे महत्वाचे असते. जर मानवी संसाधने मागासलेली राहिली किंवा संरक्षित केली गेली नाहीत, तर देश विकासाच्या अपेक्षित पातळीवर पोहोचू शकत नाही. त्यामुळे अलीकडच्या वर्षांत आर्थिक विकासाचे चिंतन हे आर्थिक वाढीपासून मानवी विकासाकडे वळले आहे. या बदलाचे मुख्य

कारण म्हणजे शिक्षण आणि साक्षरता, आरोग्य, भौतिक पर्यावरण, सर्व लोकांसाठी त्यांच्या पार्श्वभूमीची पर्वा न करता संधीची समानता, उत्पन्नाइतकेच महत्वाचे असू शकते ही वाढती मान्यता.

## ३.२ संकल्पना

मानवी विकासाची विविध परिमाणे संपादित करू शकणाऱ्या सर्वसमावेशक उपायाच्या शोधात, संयुक्त राष्ट्रांनी, विकास कार्यक्रम (UNDP) ने १९९० मध्ये प्रकशित केलेल्या मानव विकास अहवालात मानव विकास निर्देशांक (HDI) ची व्याख्या आणि निर्मिती केली.

मानव विकास निर्देशांक हे एक सांख्यिकीय साधन आहे, ज्याचा वापर देशाच्या सामाजिक आणि आर्थिक परिमाणांमध्ये एकूण उपलब्धी मोकाण्यासाठी केला जातो, जे यावर आधारित आहेत :

१) दीर्घ आणि निरोगी आयुष्य, जे आयुर्मानानुसार मोजले जाते.

२) शिक्षणाचा प्रवेश, अपेक्षित शालेय शिक्षणाच्या वर्षांनी मोजला जातो.

३) दरडोई सकल राष्ट्रीय उत्पन्नाद्वारे मोजलेले जीवनमान पाकिस्तानी अर्थशास्त्रज्ञ, महबूब उल हक यांनी १९९० मध्ये मानव विकास निर्देशांक निर्मिती केली जी पुढे संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे देशाच्या विकासाचे मोजमाप करण्यासाठी वापरली गेली.

निर्देशांकांची गणना चार प्रमुख निर्देशकांना एकत्रित करते: आरोग्यासाठी आयुर्मान शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे, शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे आणि राहणीमानासाठी दरडोई सकल राष्ट्रीय उत्पन्न.

दरवर्षी संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम त्यांच्या वार्षिक अहवालाच्या आधारे देशांची क्रमवारी लावते. मानव विकास निर्देशांक हे देशाच्या विकासाच्या पातळीचा मागोवा घेण्यासाठी सर्वोत्तम साधनांपैकी एक आहे, कारण ते आर्थिक विकासासाठी जबाबदार असलेल्या चारही प्रमुख सामाजिक आणि आर्थिक निर्देशकांना एकत्र करते. या निर्देशकांकडे अधिक मजबूत आकर्षण असते आणि निर्देशकांच्या लांबलचक यादीपेक्षा अधिक प्रभावीपणे लोकांचे लक्ष वेधले जाते.

मानव विकास निर्देशांक जीएनपी ची जागा घेत नाही, परंतु अनेक बाबतीत समाजाची खरी स्थिती समजून घेण्यात लक्षणीय भर घालते. उत्पन्नाव्यतिरिक्त, मानव विकास निर्देशांक शिक्षण आणि आरोग्य देखील मोजते, ज्यामुळे ते बहुआयामी बनते. हे धोरण निर्मात्यांचे लक्ष केवळ साधनांवरच नव्हे तर विकासाच्या अंतिम उद्दिष्टांवर केंद्रित करते. आरोग्य सेवा सुधारणे, योग्य शिक्षण सुविधांसह लोकांचे जीवनमान उंचावते.

मानव विकास निर्देशांकामधील कोणत्याही वरच्या हालचालीचा सुधारणा म्हणून ओळखले जाऊ शकते. काहींसाठी उच्च उत्पन्न इतरांसाठी सापेक्ष वंचितांना कारणीभूत ठरू शकते, हे मानवी विकासासाठी खरे नाही.

## ३.३ मानव विकास निर्देशांकाची तत्त्वे

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या अहवालानुसार डिसेंबर २०१९ मध्ये भारत १२९ व्या स्थानावर आहे. मानव विकास निर्देशांकाच्या शोधासाठी मार्गदर्शक तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत :

१) मानवी विकासाच्या मूलभूत संकल्पनेचे मोजमाप करणे, अशा प्रकारे लोकांची निवड वाढवणे ज्यमध्ये दीर्घकाळ जगण्याची, ज्ञान मिळवण्याची आणि नोकरी मिळवण्याची, स्वच्छ हवेत श्वास घेण्याची, मुक्त राहण्याची आणि समाजात राहण्याची इच्छा समाविष्ट आहे. पद्धतीशास्त्रीय रीतीने केवळ उत्पन्न मोजण्याव्यतिरिक्त इतर परिमाणे ही मूळ कल्पना होती.

२) निर्देशांकाची साधेपणा राखण्यासाठी, त्यात समाविष्ट असलेल्या चलांची संख्या मर्यादित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

३) निर्देशांकांची अधिकता तयार करण्यापेक्षा संमिश्र निर्देशांक तयार करणे. प्रत्येक चलासाठी कमाल आणि किमान मुल्ये ० आणि १ मधील स्केलवर कमी केली गेली आणि सर्व निवडी महत्वाच्या आहेत, या सध्या आधारावर समान भार प्रदान केला.

४) मानव विकास निर्देशांकाने सामाजिक आणि आर्थिक दोन्ही परिमाणे समाविष्ट केले पाहिजेत, कारण आर्थिक वाढीमुळे संसाधने वाढते आणि सामाजिक प्रगती यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करते.

**तुमची प्रगती तपासा :**

१) मानव विकास निर्देशांक म्हणजे काय?

२) मानव विकास निर्देशांकांच्या किमान २ तत्वांचा उल्लेख करा.

## ३.४ मानव विकास निर्देशांकाचे प्रमुख घटक

आयुर्मान, शिक्षणात प्रवेश आणि राहणीमानाचा समावेश असलेल्या मुख्य निर्देशकांसह मानव विकास निर्देशांकाचे खालील प्रमुख घटक आहेत.

### ३.४.१ शाश्वतता

मानवी विकास निर्देशांकाचा एक अत्यावश्यक घटक, शाश्वतता म्हणजे पुढच्या पिढ्यांचा आपण ज्या कल्याणाचा आनंद घेतो त्याचा आनंद घेण्याचा अधिकार, महबूब उल हक यांनी ठळकपणे सांगितल्याप्रमाणे, मानवी संधीची शास्वतता ही आपल्या चिंतनाच्या केंद्रस्थानी असली पाहिजे ज्यासाठी सर्व प्रकारचे भांडवल-भौतिक,आर्थिक,मानवी आणि पर्यावरणीय टिकून राहणे आवश्यक आहे. थोडक्यात शाश्वतता आहे. थोडक्यात शाश्वतता म्हणजे वर्तमान आणि भविष्यातील पिढ्यांमधील संधी सामायिक करणे होय.

हक यांच्या मते, शाश्वततेचा अर्थ मानवी वंचितता,दारिद्र्य इ. ची सध्याची पातळी टिकवून ठेवणे असा होत नाही. जर गरिबी आणि वंचितता कायम राहिली तर ती बदलण्यासाठी

प्रयत्न केले पाहिजेत. काय टिकवायचे आहे ही संधी आहे मानवी वचन नव्हे. जीवनशैलीतील विषमता ओळखून ती कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

थोडक्यात शाश्वतता, संसाधनांचा आर्थिक आणि तर्कशुद्ध वापर करणे म्हणजे त्याचे सर्व फायदे भावी पिढ्यांना घेता येतील.

### ३.४.२ उत्पादकता

उत्पादकता हा आणखी महत्वाचा घटक आहे. ज्यासाठी लोकांमध्ये गुंतवणूक आणि त्यांनी जास्तीत जास्त क्षमता साध्य करण्यासाठी त्यांना सक्षम करणरे स्थूल-आर्थिक वातावरण आवश्यक आहे. विकासाची अनेक अलीकडील प्रारूपे प्रामुख्याने मानवी भांडवलावर आधारित आहेत. असे असले तरी, हक यांनी नमूद केल्याप्रमाणे, हा दृष्टीकोन लोकांना केवळ विकासाचे साधन मानतो.

त्यामुळे उत्पादकतेला मानवी विकासाच्या उदाहरणाचा एक भाग मानणे चांगले.

### ३.४.३ सक्षमीकरण

मानवी विकास प्रतिमान लोकांच्या पूर्ण सक्षमीकरणास समर्थन देते. याचा अर्थ लोक त्यांच्या स्वत:च्या इच्छेचा वापर करण्याच्या स्थितीत आहेत. याचा अर्थ एक राजकीय लोकशाही आहे, ज्यामध्ये लोक त्यांच्या जीवनाबद्दलच्या निर्णयांवर प्रभाव टाकू शकतात. याचा अर्थ सत्तेचे विकेंद्रीकरण असा आहे, जेणेकरून वास्तविक शासन प्रत्येक नागरिकाच्या दारापर्यंत पोहोचेल. याचा अर्थ नागरी समाजातील सर्व सदस्य निर्णय प्रक्रियेत सहभागी होतात. लोकांच्या सक्षमीकरणासाठी विविध आघाड्यांवर कृती आवश्यक आहे. लोकांच्या शिक्षण आणि आरोग्यामध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे जेणेकरून ते बाजारातील संधीचा फायदा घेऊ शकतील. प्रत्येकाला पत आणि उत्पादका मालमत्तेविरुद्ध प्रवेश देणारे सक्षम वातावरण सुनिश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी तिन्ही लिंगांना सक्षम बनवणे आवश्यक आहे. जेणेकरून ते समान पातळीवर स्पर्धा करू शकतील.

## ३.५ कमी मानव विकास निर्देशांकाची कारणे

जातिव्यवस्थेच्या अस्तित्वापासून ते श्रीमंत आणि गरीब यांच्यातील वाढत्या आर्थिक दरीपर्यंतच्या अनेक कारणांमुळे भारतात मानव विकास निर्देशांकाची पातळी कमी झाली आहे. बहुसंख्य लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहते तर काही उंच टॉवरमध्ये राहतात. त्याचप्रमाणे एका टोकाला आपण उच्चवर्गीयांसाठी उपलब्ध असलेल्या खाजगी रुग्णालयांचा उदय पाहतो. तर दुसऱ्या टोकाला असे लोक आहेत ज्यांना अशा रुग्णालयांमध्ये पूल ठेवता येत नाही आणि ते मुलभूत आरोग्य सुविधांपासून वंचित आहेत. वरील परिणाम लक्षात घेऊन, कमी मानवी विकास निर्देशांकासाठी प्रत्येक परिमाणातील काही घटक कसे जबाबदार आहेत यावर चर्चा करूया.

### ३.५.१ आरोग्य

भारतात डॉक्टरांची कमी संख्या ही एक मोठी समस्या आहे. इतर प्रमुख समस्यांमध्ये अस्वच्छता, झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या बहुसंख्य लोकासंठी निकृष्ट सुविधा, ग्रामीण भागात स्वच्छतागृहांचा अभाव, पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा अभाव, डेंग्यू, मलेरिया, न्युमोनिया

इत्यादी आजारांमध्ये वाढ. लोकांच्या खाण्याच्या सवयी, वाढत्या खाण्यापिण्याच्या सवयी. लठ्ठपणाचे देखील नागरिकांच्या खराब आरोग्यास कारणीभूत ठरले आहे. शिवाय लोक आरोग्य आणि आरोग्यसेवेच्या महात्वाकडे दुर्लक्ष करतात. तसेच, सरकार आरोग्य सेवेसाठी जास्त संसाधने देखील देत नाही. धोरणे बनवली जातात पण त्याची अंमलबजावणी होत नाही. खालच्या वर्गाला वंचित ठेवून उच्च वर्गाला सेवा देणाऱ्या खाजगी रुग्णालयांना चालना दिली जाते.

### ३.५.२ शिक्षण

मानवी संसाधनाच्या विकासात शिक्षणाची मोठी भूमिका आहे. आज आपण भारतात अनेक खाजगी शाळा, आंतरराष्ट्रीय शाळा पाहतो, परंतु सरकारी शाळांची कमी होत चाललेली संख्या आणि शैक्षणिक सुविधा नसणे किंवा योग्य पायाभूत सुविधांचा अभाव याबद्दल आपण कधी विचार केला आहे का? ग्रामीण भागात शाळा? भारताने मुलींच्या शिक्षणाचे सक्षमीकरण केले आहे, परंतु तरीही, बहुसंख्य मुले मुलभूत शिक्षण सुविधांपासून वंचित आहेत. भारताने साक्षरतेचा स्तर सुधारण्यासाठी, शिक्षकांची नोंदणी वाढवण्यासाठी, लोकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यासाठी शिक्षणावर खर्च करणे आवश्यक आहे. दूरस्थ शिक्षण सेवांना चालना देणे, ऑनलाईन शिक्षण प्रणाली सुधारणे इ.

### ३.५.३ राहणीमानाचा दर्जा

भारतातील लोकांच्या राहणीमानात तीव्र तफावत दिसून येते. एका टोकाला आपल्याला टॉवर दिसतात. तर दुसऱ्या टोकाला झोपडपट्टी भागात राहण्रे लोक आहेत, जिथे त्यांना मुलभूत स्वच्छता सुविधांचा अभाव आहे. उत्पादने उपलब्ध आहेत परंतु नागरिक ती खरेदी करू शकत नाहीत. गरिबी, बेरोजगारी आणि अनारोग्यदायी वातावरणामुळे अनेकांना भयंकर परिस्थितीचा सामना करावा लागतो.

मानव विकास निर्देशांक स्केलमध्ये भारताचा क्रमांक खाली येण्याची अनेक करणे आहेत. निरोगी वातावरण देण्यासाठी आणि शैक्षणिक स्तर तसेच लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सातत्याने उपाययोजना केल्या पाहिजेत.

**तुमची प्रगती तपासा:**

१) मानव विकास निर्देशांकाचे प्रमुख घटक कोणते आहेत?

२) कमी मानव विकास निर्देशांकामुळे भारतासमोरील आव्हानांचा तुम्ही विचार करूशकता का?

३) एखाद्या राष्ट्राच्या मानव विकास निर्देशांक सुधारण्यासाठी कोणती पावले उचलली जाऊ शकतात?

## ३.६ निष्कर्ष

निष्कर्ष काढण्यासाठी असे म्हणता येईल की एखाद्या राष्ट्राच्या विकासाचे विश्लेषण करण्यासाठी केवळ आर्थिक परीणामच म्हत्वाचे नाही तर आरोग्य, शिक्षण, लैगिक संवेदना,

लैगिक समानता, पर्यावरण संतुलन यासारखे इतर सामाजिक घटक देखील महत्वपूर्ण भूमिका बजावतात. उपलब्ध असलेल्या संधी टिकवून ठेवणे महत्वाचे आहे आणि वंचित आणि नकारात्मक पैलू नाही. प्रत्येक देशाच्या संधी आणि उत्पादकता सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, एक सशक्त मानव संसाधन, उच्च राहणीमानासह, विशिष्ट राष्ट्राचा मानवी विकास निर्देशांक सुधारतो.

## ३.७ सारांश

मानव विकास निर्देशांक (HDI) हे एक सांख्यिकीय साधन आहे ज्याचा उपयोग सामाजिक आणि आर्थिक परिणाम लक्षात घेऊन देशाची एकूण उपलब्धी मोजण्यासाठी केला जातो. हे केवळ आर्थिक परिणामांना महत्त्व देत नाही, परंतु आरोग्य, शिक्षण, राहणीमानाचा दर्जा आणि त्यानुसार क्रमवारीत समाविष्ट करून विशिष्ट देशाच्या विकासाविषयीचे दृश्य सादर करते. त्यांच्या विकासाचे मोजमाप करण्यासाठी ते सामाजिक आणि आर्थिक परिणामांवर विचार करते. शाश्वतता, उत्पादकता आणि सक्षमीकरण हे मानव विकास निर्देशांकचे प्रमुख घटक आहेत. शाश्वतता म्हणजे सकारात्मक पैलू टिकवून ठेवण्याची क्षमता आणि गरिबी आणि वंचिततेच्या नकारात्मक गोष्टींचा नाही. उत्पादकता वाढत्या गुंतवणुकीचा संदर्भ देते, तर सशक्तीकरण म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण करून आणि धोरण तयार करताना त्यांचे निर्णय विचारात घेऊन नागरिकांचा सक्षम करणे. भारतात मानव विकास निर्देशांक कमी असण्याची कारणे म्हणजे जातिव्यवस्था, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी, योग्य आरोग्यसेवा आणि शैक्षणिक सुविधांचा अभाव ज्यामुळे राहणीमान खालावते. आपल्या देशाच्या विकासाला चालना देण्यासाठी या आव्हानांवर मात करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत.

## ३.८ प्रश्न

१) मानव विकास निर्देशांक स्पष्ट करा. मानव विकास निर्देशांकचे निर्देशांक काय आहेत?

२) मानव निर्देशांक स्पष्ट करा आणि त्याची तत्त्वे स्पष्ट करा.

३) विकासाचे निर्देशक थोडक्यात स्पष्ट करा.

४) मानव विकास निर्देशांक म्हणजे काय? त्याची तत्त्वे आणि त्याचे प्रमुख घटक विस्तृतपणे स्पष्ट करा.

५) मानव विकास निर्देशांक म्हणजे काय? कमी मानव विकास निर्देशांक क्रमवारीची कारणे सांगा आणि त्यात सुधारणा करण्यासाठी जे उपाय केले जाऊ शकतात ते सुचवा.

## ३.९ संदर्भ

1) http://hdr.undp.org/en/content/human-development-index-hdi

2) https://en.wikipedia.org/wiki/Human_Development_Index

❖❖❖❖

# ४अ

## सामग्री संकलनाच्या पद्धती सर्वेक्षण

**घटक रचना :**


४.अ.० उद्दिष्टे

४.अ.१ प्रस्तावना

४.अ.२ सामग्री संकलन पद्धती सर्वेक्षण

४.अ.३ विषयप्रवेश

४.अ.४ सर्वेक्षण पद्धतीची गुणवैशिष्टये

४.अ.५ सर्वेक्षणाचे उद्देश

४.अ.६ सर्वेक्षणाचे प्रकार

४.अ.७ सर्वेक्षणाचे गुण व मर्यादा

४.अ.८ सामाजिक संशोधनासाठी सर्वेक्षणाची भूमिका आणि महत्व

४.अ.९ सारांश

४.अ.१० अभ्यासाचे प्रश्न

४.अ.११ अधिक अध्ययनासाठी सदंर्भ सूची


### ४.अ.० उददेश

- सामग्री संकलनाची पद्धती म्हणून सर्वेक्षणपद्धती समजून घेणे.
- सामग्री संकलनाची पद्धती म्हणून व्यष्टी अध्ययन पद्धत समजून घेणे.

### ४.अ.१ प्रस्तावना

सर्वेक्षण या सामग्री पद्धतीचा अवलंब हजारो वर्षापूर्वीपासून केला जातो आहे. अगदी अश्मयुग कालखंडातही पाण्याच्या जागा किंवा अन्न उपलब्धीच्या जागा शोधण्यासाठी याचा वापर केला गेला असावा असा अंदाज बांधता येईल मात्र हे शास्त्रीय ठरणार नाही. सर्वेक्षण पद्धतीची शास्त्रीय नोंद हिरोडोट्स या इतिहास अभ्यासकाच्या ग्रंथात मिळते. कौटील्याच्या अर्थशास्त्रात इ.स. पूर्व तिसऱ्या शतकातील शासकीय पातळीवर आर्थिक आकडेवारी गोळा करण्याच्या नोंदी दिसून येतात. या नोंदीना शास्त्रीय मानले जात नाही. कारण पद्धतीच्या वापरात शास्त्रीयतेचा अभाव होता. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात सर्वेक्षण पद्धती विकसित झाल्याचे दिसते. सामाजिक घटनेचे वैज्ञानिक अध्ययन करून

संबंधित तथ्यांना एकत्रित करून निष्कर्षाच्या प्रस्तुती करता याचा उपयोग होतो. सामाजिक समस्या संबधित घटकांचे संख्यात्मक तसेच गुणात्मक अध्ययन करण्याकामी सर्वेक्षण पद्धती सहाय्यक ठरते. सामाजिक परिवर्तन, विकास प्रक्रिया, तुलनात्मक अध्ययन, वास्तवदर्शी अध्ययन, लोकसंख्यात्मक घटक आणि अन्य बाबींचा सहसंबंध अभ्यासण्याकरिता सर्वेक्षण संशोधन पद्धती महत्त्वाची ठरते. सामाजिक सर्वेक्षण पद्धतीच्या सर्वप्रथम वापराची नोंद जॉन हॉवर्ड यांनी इंग्लंड व वेल्समधील तुरूंग विषयक अभ्यासण्यासाठी केला होता.

## ४.अ.२ सामग्री संकलन पद्धती सर्वेक्षण

प्रत्यक्ष माहिती संकलनाची पद्धती म्हणून सर्वेक्षणाकडे पाहिले जाते. वस्तुनिष्ठ स्वरूपाची माहिती प्राप्त करण्याची ही पद्धती असून प्राप्त सामग्री द्वार संख्यात्मक आणि गुणात्मक असे दुहेरी विश्लेषण या पद्धतीच्या आधारे करता येते.

## ४.अ.३ विषयप्रवेश

तथ्यांचे संकलन होणे कोणत्याही प्रकारच्या निष्कर्षाप्रत पोहचण्याची पहिली पायरी आहे. तथ्ये सामाजिक घटकांशी संबंधित असतील तर प्रत्यक्ष सर्वेक्षणाला पर्याय नाही. लोकांपर्यंत प्रत्यक्ष पोहचणे आणि विविध तंत्रा आधारे माहितीचे संकलन करमे हे केवळ सर्वेक्षणातून शक्य होते. विशिष्ट भूभाग आणि तेथील जनजीवनाच्या अध्ययनासाठी सर्वेक्षण माहिती संकलन पद्धतीचा वापर अनेक सामाजिकशास्त्र संशोधक आणि मानवशास्त्रज्ञांनी केल्याचे आढळून येते.

**सर्वेक्षण अर्थ आणि व्याख्याः**

**सीन पाओ युंग**

सामाजिक सर्वेक्षण साधारण विशिष्ट समूहाची रचना, आचार विचार आणि क्रियांच्या विविध बाबींचा शोध होय.

**मार्क अब्रम्स**

सामाजिक सर्वेक्षण ही अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारा विशिष्ट समूहाची संरचना तसेच क्रियांच्या सामाजिक संबंधाबाबत परिणामात्मक तथ्यांना संकलित केले जाते.

**डेनिस चॅपमन**

सामाजिक सर्वेक्षण ही एक विशिष्ट भौगोलिक तसेच प्रशासकीय क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींच्या संबंधित तथ्यांना एका व्यवस्थित रूपाने संकलित केली जाणारी एक पद्धती आहे.

सामाजिक सर्वेक्षण ही एक वैज्ञानिक पद्धती असून अभ्यासक्रम निश्चित भौगोलिक क्षेत्रातील व्यक्तींच्या सामाजिक जीवन व सामाजिक समस्या आणि सामाजिक क्रियांच्या संबंधित तथ्यांचे संकलन करता येते. संकलित माहितीचे विश्लेषण, सांख्यकिय किंवा गुणात्मक अर्थनिर्वचन करून चलांमधील सहसंबंधांचा शोध लावून अभ्यासक निष्कर्षाची मांडणी

करतो. या पद्धतीने विशिष्ट समस्येवर उपाययोजना केल्या जाऊ शकतात. कारलिंगर या अभ्यासकाच्या मते सामाजिक सर्वेक्षण ही सामाजिक, वैज्ञानिक अन्वेषणाची अशी एक शाखा आहे की ज्या अंतर्गत व्यापक आणि लघु आकाराच्या लोकसंख्येचे अध्ययन त्यातील निवड केलेल्या नमुन्याच्या आधारावर या आशयाने केले जाते की ज्यात व्याप्त सामाजिक तसेच मानसशास्त्रीय चलांचे घटनाक्रम, वितरण किंवा संबंधांच्या ज्ञानाची उपलब्धी होऊ शकेल.

कोणत्याही सामाजिक समस्येच्या मुळापर्यंत जाण्यासाठी सर्वेक्षण पद्धती उपयुक्त ठरते. प्रशासनास विविध प्रकारच्या नियोजनकामी जी लोकसंख्यात्मक सामग्री लागते त्याचा मूळ आधारस्तंभ म्हणून सर्वेक्षण पद्धती कार्य करते. भारतात दर दहा वर्षांनी होणारी जनगणना हे सामाजिक सर्वेक्षणाचे सर्वोर्त्तम उदाहरण म्हणून सांगता येईल. विविध प्रकारच्या शासकीय उपाययोजनांच्या अंमलबजावणीकरिता सर्वेक्षण पद्धतीला पर्याय नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१. सर्वेक्षण पद्धतीची कोणतीही एक व्याख्या सांगून तिचे स्पष्टीकरण द्या.

## ४.अ.४ सर्वेक्षण पद्धतीची गुणवैशिष्टये

सर्वेक्षणाला या सामग्री संकलन पद्धतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### विशिष्ट भौगोलिक क्षेत्र

सामाजिक सर्वेक्षणाचा वापर या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील घटना आणि सामाजिक तथ्यांच्या अध्ययनासाठी केला जातो. संपूर्ण समाजाचे सर्वेक्षण एकटा संशोधक करू शकत नाही. वैज्ञानिक संशोधन करण्यासाठी आणि परिपूर्ण स्वरूपातील संशोधनासाठी विशिष्ट भौगोलिक क्षेत्राची निवड केली जाते. वस्तुनिष्ठ निष्कर्षप्राप्तीसाठी अध्ययन क्षेत्र मर्यादित असणे गरजेचे असते.

### वैज्ञानिक पद्धती

सर्वेक्षण पद्धती पूर्णपणे वैज्ञानिक असून या पद्धती तथ्यांचे संकलन करण्यासाठी सामाजिक संशोधन पद्धतीच्या सर्व टप्प्यांचा वापर केला जातो. वैज्ञानिक पद्धतीच्या माध्यमातून निष्कर्षाचे सामान्यीकरण केले जाते.

### सामाजिक घटकांचे अध्ययन

सामाजिक सर्वेक्षण पद्धतीने सामाजिक घटकांचे अध्ययन केले जाते. लोकांचा सामाजिक, आर्थिक किंवा शैक्षणिक दर्जाचा अभ्यास करायचा असेल तर संबंधित विषयानुसार सामान्य घटकांचेही अध्ययन यात केले जाते यामुळे येणारे निष्कर्ष वास्तववादी स्वरूपाचे असतात.

### संख्यात्मक अध्ययन

सामाजिक घटना किंवा सामाजिक समस्येशी निगडीत संख्यात्मक घटकांचे अध्ययन यात केले जाते. माहितीचे संकलन करणे, वर्गीकरण आणि सांख्यकिय आकडेमोड करणे व

त्याआधारे निष्कर्ष मांडणे यासाठी सर्वेक्षण आधारभूत ठरते. सद्यकाळात तुलनात्मक अध्ययनासाठी सामाजिक सर्वेक्षण केले जाते. संसाधनांची उपलब्धी आणि लोकसंख्या यांचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. याचसोबत लोकांची अभिरूची, अभिवृत्ती आणि त्याचा विविध घटकांवरील प्रभाव अभ्यासण्यासाठी संख्यात्मक आधाराची पद्धती म्हणून सर्वेक्षण पद्धती ओळखली जाते.

**सामाजिक रचनांचा आधार**

समाजामधील आवश्यक बदलांसाठी आणि चुकीच्या बदलांना थांबविण्यासाठी सर्वेक्षण महत्त्वाची भूमिका वठविते. सर्वेक्षणाच्या माध्यमातून सैद्धांतिक आणि उद्देशांची पूर्तता होते. विविध स्वरूपातील सामाजिक समस्या सोडविण्यासाठी सर्वेक्षण उपयुक्त ठरते. यामुळे सामाजिक रचनांचा आधार म्हणून सर्वेक्षण पद्धतीकडे पाहता येते.

**जनजागृती**

सामाजिक समस्यांसाठी कारणीभूत ठरणार्या घटकांची मिमांसा करण्यासाठी सर्वेक्षण समस्यांचे संदर्भाने घटकांचे अध्ययन करते. मानवाच्या गरजांपूर्तीची साधने वाढल्यास किंवा कमी झाल्यास गुन्हेगारीत वाढ होण्याची शक्यता असते यासाठी सामाजिक संतुलनासाठी संसाधनांवर नियंत्रण ठेवण्याकामी सर्वेक्षण उपयुक्त आहे. जनतेला विविध प्रकारच्या तथ्यांपर्यंत पोहचविण्याकरिता सर्वेक्षण कामगिरी करते. अनेकवेळा संशोधन हे पूर्वग्रह दूषित असू शकते. मात्र सर्व प्रकारचे पूर्वग्रह दूर करण्याकामी संशोधक सर्वेक्षण पद्धतीद्वारे स्वतः अभ्यासक्षेत्रात प्रवेश करतो. त्यामुळे तो वास्तवाच्या जास्त जवळ जातो. विविध सामाजिक प्रतिमानांच्या प्रभावी जनजागृतीसाठी सर्वेक्षण पद्धती प्रभावी साधन ठरते. अतिजलसिंचन, अनियोजित मर्यादित जलसिंचन आणि नियोजनबद्ध ठिबक सिंचन यांचा तुलनात्मक अभ्यास करून सर्वेक्षण पद्धतीद्वारे कोणती कृषी जलसिंचनपद्धती उपयोगी आहे हे लोकांना पटवून दिले गेले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१. सर्वेक्षण पद्धतीची गुणवैशिष्ट्ये सांगा.

## ४.अ.५ सर्वेक्षणाचे उद्देश

सर्वेक्षणाच्या माध्यमातून सामाजिक घटकांसंदर्भातील सामग्री लक्षात घेऊन तथ्यांच्या विश्लेषणातून सामाजिक समस्यांवर उपाययोजना सुचविता येतात. परिणामकारक आणि कायमस्वरूपी नियोजनासाठी सर्वेक्षणाआधारे अध्ययन केले जाते.

**१) आंतरसंबंधांचे अध्ययन**

सामान्यपणे घडणाऱ्या प्रत्येक घटनेमागे विशिष्ट स्वरूपाचे कारण असते. घटना आणि कारण यांच्यातील आंतरसंबंधांचे अध्ययन करण्यासाठी, दोन तथ्यांमधील आंतरसंबंध समजून घेण्यासाठी सर्वेक्षण केले जाते. उदा. एखाद्या गावातून शहराकडे स्थलांतरीत

होणार्या युवकांची संख्या अधिक असल्यास हे स्थलांतर कोणत्या कारणासाठी होते आहे हे शोधून काढता येते.

### २) सामाजिक समस्यांचे अध्ययन

समाजात असणाऱ्या समस्या आणि त्या समस्यांमागचे वास्तव समजून घेण्यासाठी सर्वेक्षण पद्धती उपयुक्त ठरते. सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करून व्यक्तीव्यवहारांचे अध्ययन करता येते. सामाजिक समस्यांची चिकित्सा करण्याकरीता आवश्यक प्राथमिक सामग्री सर्वेक्षण माध्यमातून मिळविली जाते.

### ३) सामग्री संकलन

संशोधकास अध्ययनासाठी आवश्यक असणारी सामग्री संकलित करण्यासाठी सर्वेक्षण महत्त्वपूर्ण पद्धती ठरते. लोकसंख्या, लोकसंख्येचे स्वरूप, लोकसंस्कृती, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक घटक आदींसंदर्भात सामग्री संकलनासाठी सर्वेक्षण केले जाते.

### ४) समाजपरिवर्तनाची दिशा लक्षात घेणे

समाजव्यवस्थेत होत असलेले परिवर्तन कोणत्या दिशेने होत आहे याचे अध्ययन करण्यासाठी सर्वेक्षण केले जाते. परिवर्तन उर्ध्वगामी, अधोगामी अथवा समांतर पद्धतीने होत असते. कोणत्या दिशेने परिवर्तन होत आहे हे सर्वेक्षणातून लक्षात येते. समाजव्यवस्थांमधील बदल लक्षात आणून देण्याचे काम सर्वेक्षणाच्या माध्यमातून होते.

### ५) चलांमधील सहसंबंधांचे अध्ययन करणे

चलांमधील पारस्परिक संबंध लक्षात घेणे आणि त्या आधारे सैद्धांतिक निष्कर्षाप्रत पोहचणे यासाठी सर्वेक्षण गरजेचे ठरते. एखाद्या शहरात झोपडपट्टीचे वाढते प्रमाण यामागे नेमके कोणते कारण आहे हे समजून घेण्याकामी सर्वेक्षण मदत करते.

### ६) व्यावहारिक उपयोजन

समाजामध्ये निर्माण होणाऱ्या गंभीर स्वरूपाच्या समस्या उद्भविण्यापूर्वीच त्यावर नियंत्रण मिळविण्याकरिता आणि निर्माण झालेल्या समस्यांवर उपाययोजना करण्याकरिता सर्वेक्षण पद्धती उपयुक्त ठरते. समाजामध्ये असणार्या अनिष्ट चालीरिती, सामाजिक ताणतणावाच्या बाबी इत्यादींचे पूर्वअनुमान काढण्यासाठी सर्वेक्षण उपयुक्त आणि प्रभावी पद्धती आहे. समस्यांच्या संदर्भातील कारणांचा शोध घेणे व समस्या सोडविण्यासाठी उपाययोजनांची मांडणी करण्यासाठी सर्वेक्षण पद्धती उपयुक्त ठरते.

### ७) घटनांचे पूर्वानुमान करण्यासाठी

समाजातील व्यवस्थांमध्ये होणारे बदल आणि या बदलांच्या पार्श्वभूमीवर होणारे परिणाम लक्षात घेऊन योग्य पद्धतीने अनुमान मांडण्यासाठी सर्वेक्षण उपयुक्त ठरते. एखाद्या नदीवर पूल बांधला गेल्यामुळे आजूबाजूच्या किती लोकसंख्येस त्याचा फायदा होईल तसेच वाहतूक व्यवस्थेवर कोणता परिणाम होईल याचे पूर्वानुमान सर्वेक्षणामुळे शक्य होते.

वरील स्वरूपाच्या विविधांगी उद्देशाने प्रेरित होऊन सर्वेक्षण पद्धती राबविली जाते.

**आपली प्रगती तपासा**

१. सर्वेक्षण पद्धतीची कोणतीही पाच उद्देश मांडा.

## ४.अ.६ सर्वेक्षणाचे प्रकार

विविध स्वरूपाच्या स्थितीवरून सर्वेक्षणाचे प्रकार सांगता येतात यातील काही प्रकार पुढीलप्रमाणे.

### १) संख्या आधारित सर्वेक्षण

या सर्वेक्षणात संख्यात्मक नोंदी ठेवण्यासाठी त्यांचे विश्लेषण करण्यासाठी व परिस्थितीबाबतचे चिंतन करण्यासाठी संख्यात्मक पद्धतीचा वापर केला जातो. गणितिय तंत्राच्या आधाराने उपलब्ध सामग्रीचे वर्गीकरण, विवरण आणि विश्लेषण केले जाते. सामाजिक संरचनांसंबंधित घटक, लोकसंख्यात्मक घटक प्रामुख्याने अभ्यासण्यासाठी सर्वेक्षण केले जाते.

### २) गुणात्मक सर्वेक्षण

सामाजिक परिवेशाचे अध्ययन करून परिस्थितीचे योग्य वर्णन करण्याकरिता असांख्यिकीय पद्धतीचा वापर केला जातो. समाजातील व्यक्तींच्या मनोवृत्ती, अभिवृत्ती, त्यांचे विचार, विशिष्ट कृतींमागील भावना समजून घेण्याकरिता गुणात्मक सर्वेक्षण महत्त्वपूर्ण ठरते.

### ३) सातत्यपूर्ण सर्वेक्षण

विशिष्ट घटकांची माहिती वेळोवेळी घेण्याकरिता सर्वेक्षणात सातत्य असणे गरजेचे असते. अध्ययनासंबंधित घटक आणि समग्र जेव्हा परिवर्तनशील असतात अशावेळी संबंधित तथ्यांचे सातत्यपूर्ण सर्वेक्षण गरजेचे ठरते. केवळ एका वेळेस सर्वेक्षण करून निश्चित निष्कर्षापर्यंत पोहचता येत नाही.

### ४) अंतिम सर्वेक्षण

ज्या सर्वेक्षणात एका वेळेस केलेल्या अध्ययनाच्या आधारे अंतिम निष्कर्षापर्यंत पोहचता येते अशा सर्वेक्षणाला अंतिम सर्वेक्षण संबोधले जाते. ज्या अध्ययन घटकांसंदर्भात दीर्घकालावधीपर्यंत कोणतेही परिवर्तन होऊ शकत नाही. अध्ययन क्षेत्र मर्यादित स्वरूपाचे असते अशा सामग्रीसंबंधी केलेले सर्वेक्षण अंतिम सर्वेक्षण म्हणून संबोधले जाते.

### ५) नियमित सर्वेक्षण

व्यापक अध्ययन विषयासाठी नियमित सर्वेक्षण गरजेचे असते. संशोधन समस्या मोठ्या भौगोलिक क्षेत्राशी किंवा मोठ्या जनसमूहाशी संबंधित असते अशावेळी तथ्यांचे सर्वेक्षण पूर्ण होईपर्यंत नवीन बदल समोर येतात. अशा वेळी सर्वसमावेशक सर्वेक्षण होण्यासाठी

सर्वेक्षणात नियमतता असणे आवश्यक असते. युनिसेफ, जागतिक आरोग्य संघटना, रिझर्व्ह बँक, केंद्रशासनाचे विभाग इ. द्वारा संबंधित विषयांसंदर्भात नियमित सर्वेक्षण हाती घेण्यात येते. शासनाचे कायमस्वरूपी विभाग यासाठी सामग्री संकलनाचे कार्य करीत असतात.

### ६) तत्कालिक सर्वेक्षण

एखाद्या तत्कालिक समस्येचे अध्ययन करण्याकरिता संशोधक तत्कालिक सर्वेक्षण पद्धती वापरतो. विशिष्ट परिस्थितीतील लीकान्ह्या भावना जाणून घेण्यासाठी या प्रकारचे सर्वेक्षण हाती घेण्यात येते.

### ७) प्रासंगिक सर्वेक्षण

विशिष्ट प्रकारचे सामाजिक सांस्कृतिक, राजकीय किंवा आपत्तीजनक प्रसंग उद्भवतात. अशा सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी प्रासंगिक सर्वेक्षण केले जाते. अनेक वृत्तवाहिन्या अशा प्रकारचे सर्वेक्षण करून संबंधित माहितीचे विश्लेषण बातमीद्वारे आपल्यासमोर मांडत असतात.

### ८) जनगणना सर्वेक्षण

समाजातील व्यक्तीसंबंधित घटकांचे अध्ययन करून तथ्य सामग्रीचे संकलन केले जाते. हे सर्वेक्षण अतिविस्तृत असल्याने शासकीय पातळीवरील संस्थांची मदत घेतली जाते. सामाजिक दर्जा, लोकसंख्या यांच्यासंबंधित घटकांचे अध्ययन यात केल जाते. आपल्या देशात दहा वर्षांनी जनगणना केली जाते. विशिष्ट अध्ययन क्षेत्रासाठी संशोधक जनगणना सर्वेक्षणाचा आधार घेतो.

### ९) नमुना सर्वेक्षण

प्रत्येक वेळेस मोठ्या प्रमाणावरील समग्राचे अध्ययन करणे शक्य नसते. अशा वेळी समग्रातील काही एककांचे अध्ययन केले जाते. यात नमुना म्हणून निवडण्यात आलेल्या घटकांची माहिती समग्राचे प्रतिनिधित्व करते. नमुना जर वैज्ञानिक पद्धतीने निवडला गेला तर सर्वेक्षण वैज्ञानिक सर्वेक्षण ठरते. येणारे येणारे निष्कर्ष हे समग्राच्या अध्यायानासारखेच वास्तववादी व विश्वसनीय येतात.

### १०) सार्वजनिक सर्वेक्षण

लोकांच्या एकसमान समस्येसाठी किंवा एकसमान परिणाम अभ्यासण्यासाठी या प्रकारचे सर्वेक्षण फलदायी ठरते. अनेकवेळा विविध प्रकारच्या शासकीय योजनांची अंमलबजावणी होते व त्याचे लाभार्थ्यावर नेमके कोणते परिणाम झाले हे अभ्यासण्यासाठी सार्वजनिक सर्वेक्षण उपयुक्त ठरते. अशा विषयाशी संबंधित माहिती अनेकवेळा शासकीय दस्तऐवाजामधून प्रकाशित केली जाते.

### ११) पुर्वअनुमान सर्वेक्षण

विस्तृत सर्वेक्षण करण्यापूर्वी विषय घटकांच्या अनुषंगाने प्राथमिक माहिती संकलित करणे, भविष्यात येणाऱ्या संशोधनात्मक समस्येचे पुर्वनुमान काढणे, संभाव्य अडचणी लक्षात घेणे

या करिता सर्वेक्षण केले जाते. याला पायलट स्टडी असेही म्हणतात. अध्ययन विषयाला सुरुवात करण्यापूर्वी त्याच्या संदर्भाने सर्व घटकांचा अंदाज बांधता यावा यासाठी सर्वेक्षण केले जाते. यातून संभाव्य धोके टाळून योग्य वेळी योग्य पर्यायाची निवड करता येते.

### १२) गुप्त सर्वेक्षण

काही संशोधन राष्ट्रीय स्तरावरील विषय समाविष्ट असतात. प्रशासकीय माध्यमातून हे सर्वेक्षण केले जाते. गुप्त सर्वेक्षानता प्रामुख्याने अशा विषयांचा समावेश असतो, ज्यातील संशोधित सामग्री सर्वसामान्य जनतेसाठी खुली केली जात नाही. शासनाचा गुप्तचर विभाग, संरक्षण यंत्रणा, गुन्हेगारी विश्वसंबंधातील विषय या सर्वेक्षण अंतर्गत अभ्यासिले जातात.

### १३) वर्णनात्मक सर्वेक्षण

कोणत्याही घटकाच्या अनुषंगाने कारण परिणामांचे विश्लेषण करून त्याचे वर्णन करण्यासाठी अध्ययन केले जाते. सामाजिक घटकांच्या संदर्भाने अध्ययन करून त्यांचे वर्णन केले जाते. विकासप्रक्रिया अंतर्गत कोणते परिणाम झाले आहेत, सामाजिक तसेच आर्थिक बदलांचे कोणते परिणाम झाले आहेत अशा विविधांगी स्पष्टीकरणात्मक वर्णन या सर्वेक्षणातून केले जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१. सर्वेक्षण पद्धतीचे प्रकार सांगा. योग्य उदाहरणांच्या आधारे स्पष्ट करा.

## ४.अ.७ सर्वेक्षणाचे गुण व मर्यादा

मानवी जीवनासंदर्भातील विविध बदलांविषयी अध्ययनाच्या दृष्टीने सर्वेक्षण एक उपयुक्त पद्धती ठरते. महत्वाचे फायदे अधोरेखित करताना आपल्याला निष्कर्षाच्या संदर्भातील विश्वसनीयता लक्षात घेतली पाहिजे. प्राथमिक स्वरूपातील सामग्रीचे संकलन आणि विश्लेषणामुळे येणारे निष्कर्ष अधिक विश्वसनीय ठरतात. सर्वेक्षणाच्या आधाराने जी सामग्री संकलित केली जाते त्या सामग्रीच्या आधारे प्राप्त सांख्यिकी आणि निष्कर्ष यातून गृहीतकृत्यांची मांडणी करता येते. प्राथमिक प्राथमिक संकलनामुळे संशोधनात वस्तुनिष्ठता राखता येते यातून गृहीतकृत्यांची मांडणी करता येते. प्राथमिक माहिती संकलनामुळे संशोधनात वस्तुनिष्ठता राखता येते. सर्वेक्षण पद्धती संशोधनासाठी प्रभावी पद्धती मानली जाते. काही वेळेस समस्यांवरती तात्काळ उपाययोजनांची गरज असते अशा वेळेस सर्वेक्षणाद्वारे समस्येची कारणमीमांसा करून उपाययोजना सुचविल्या जातात. आपत्तीव्यवस्थापनासाठी सर्वेक्षण गरजेचे ठरते. एकूणच सर्वेक्षण ही व्यावहारिक उपयोगाची पद्धती म्हणून पुढे येते. सामाजिक सर्वेक्षणातून वैज्ञानिक संशोधन शक्य होते. विविध प्रकारच्या शासकीय सेवा सुविधांच्या प्रदेशनिहाय अंमलबजावणीत जनअभिवृत्ती, जनमत, लोकमानसिकता तपासण्यासाठी व योग्य सामाजिक नियाण सुधारणांची अंमलबजावणीसाठी सर्वेक्षण पद्धती मूलाधार ठरते.

सर्वेक्षण पद्धतीचे गुण लक्षात घेताना काही मर्यादा लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. या पद्धतीत लोकसमुदायाशी संबंधित घटकांचा अभयस करता येते. अमूर्त आणि भावनात्मक

घटकांचा अभयस शक्य होत नाही. वेळ, पैसा, श्रमशक्ती जास्त लागत असल्याने सिमित क्षेत्राचा अभ्यास करणे शक्य आहे. संशोधन कर्ता हा प्रशिक्षित असणे गरजेचे असते अन्यथा संशोधन वैज्ञानिक दृष्टीकोनातून चुकण्याची शक्यता असते. अध्ययनासंदर्भातील घटकांचा आंतरसंबंध लक्षात घेऊन संशोधन क्षेत्रात प्रवेश करणे योग्य असते. तत्कालिक समस्यांचा अभ्यासात उपयुक्त पद्धती असली तरी व्यापक स्वरूपाच्या समस्येच्या अभ्यासासाठी अन्य पद्धतींचा आधार घ्यावा लागतो. अनेक वेळा संशोधकाच्या पूर्वग्रहांचा आणि अपुऱ्या ज्ञानाचा प्रभावही संशोधनावर पडू शकतो. अशा विविध मर्यादांचा विचार करून संशोधकाने अध्ययनासाठी आपल्या घटकांच्या व संशोधन उद्देशांची व्याप्ती लक्षात घेऊन सर्वेक्षण पद्धती वापरणे उचित ठरते.

**आपली प्रगती तपासा :**

१. सर्वेक्षण पद्धतीचे गुण आणि मर्यादा यावर भाष्य करा.

## ४.अ.८ सामाजिक संशोधनासाठी सर्वेक्षणाची भूमिका आणि महत्व

संशोधनासाठी विविध पद्धतींचा वापर सामग्री संकलनासाठी केला जातो. यातील प्राथमिक माहिती संकलनासाठी अत्यावश्यक असणारी पद्धती म्हणून सर्वेक्षणाकडे पाहता येते. प्रत्यक्ष निरीक्षण, अनुसूची, प्रश्नावली अशा तंत्रांसाठी सर्वेक्षण उपयुक्त ठरते. अध्ययन घटकासंदर्भात प्राथमिक सानागरी संकलनासाठी सर्वेक्षण गरजेचे ठरते. सामग्री संकलन, सामग्रीचे वर्गीकरण , विश्लेषण, गणितीय प्रक्रिया, निष्कर्ष व निष्कर्षांचे सांख्यिकीय व गुणात्मक निर्वचन यासाठी सर्वेक्षण बहुआयामी स्वरुपाची पद्धती ठरते.

**आपली प्रगती तपासा :**

१. सर्वेक्षण पद्धतीचे महत्व आपल्या शब्दात मांडा.

## ४.अ.९ सारांश

सामग्री संकलित करून त्याआधारे तत्काळ निष्कर्षाप्रत जाण्यासाठी सर्वेक्षण पद्धती अत्यंत मोलाची ठरते. प्राप्त ज्ञानाच्या आधारावर अहवाल निर्मितीकरता हे एक प्रभावी मध्यम ठरते. संशोधन ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये सामाजिक अध्ययनाच्या दृष्टीने प्रभावी आणि वस्तुनिष्ठ पद्धती म्हणून सर्वेक्षण पद्धतीकडे पाहता येते. अध्ययनाच्या उद्दिष्टानुसार संशोधन करताना सर्बेक्षानाचे विविध प्रकार वापरता येतात. एकूनच संख्यातम्क आणि गुणात्मक विश्लेषणासाठी आवश्यक सामग्री उपलब्ध करून देण्याचे कार्य सर्व्बेक्षानाच्या माध्यमातून केले जाते.

## ४.अ.१० अभ्यासाचे प्रश्न

१) सर्वेक्षण पद्धती स्पष्ट करून सर्वेक्षण पद्धतीची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सर्वेक्षण पद्धतीची उद्दिष्ट्ये सांगा.

३) सामग्री संकलन पद्धती म्हणून सर्वेक्षणाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

४) सामाजिक संशोधनासाठी सर्वेक्षणाची आवश्यकत यावर निबंध लिहा.

## ४.अ.११ अधिक अध्ययनासाठी सदंर्भ सूची

१) संशोधन पद्धती व संख्याशास्त्र कुंभोजकर ग.वी. फडके बुक्स.

२) प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी प्रा. डॉ. दिलीप खैरनार.

३) गुणात्मक संशोधन डेव्हिड सिल्वरम सेज भाषा प्रकाशन.

४) संशोधन संरचना जॉन डब्ल्यू क्रेसवेल.

❖❖❖❖

# ४ब

## सामग्री संकलनाच्या पद्धती आणि व्यष्टी अध्ययन

**घटक रचना :**

४.ब.० प्रस्तावना

४.ब.१ सामग्री संकलनाच्या पद्धती व्यक्ती अध्ययन

४.ब.२ विषयप्रवेश

४.ब.३ व्यष्टी अध्ययनाची वैशिष्ट्ये

४.ब.४ व्यष्टी अध्ययनाचे प्रकार

४.ब.५. व्यष्टी अध्ययनाचे महत्त्व

४.ब.६ व्यष्टी अध्ययनाची साधने

४.ब.७ व्यष्टी अध्ययन पद्धतीच्या मर्यादा

४.ब.८ व्यष्टी अध्ययनाचे सामग्री संकलनावरील महत्त्व

४.ब.९ विकास प्रक्रिया मापनाचे साधन : सर्वेक्षण आणि व्यष्टी अध्ययन पद्धती

४.ब.१० सारांश

४.ब.११ अभ्यासाचे प्रश्न

४.ब.१२ अधिक अध्ययनासाठी संदर्भ सूची

### ४.ब.० प्रस्तावना

व्यष्टी अध्ययन याला आपण इंग्रजीत case Study असे म्हणतो. याचा अर्थ एका घटकाचे अध्ययन होय. हर्बट स्पेन्सर यांच्या अध्ययन शैलीत व्यष्टी अध्ययनाचा वापर आहे. संस्कृतीच्या तुलनात्मक अध्ययनात त्यांनी या पद्धतीचा व्यवस्थित उपयोग करून जगासमोर मांडल्यामुळे सामाजिक शास्त्रातील अध्ययनासाठी व्यष्टी अध्ययन आणण्याचे श्रेय लेप्ले यांना जाते. आदिवासी व संस्कृतीच्या अध्ययनास मानवशास्त्रज्ञांनी व्यष्टी पद्धतीचा सर्वाधिक वापर केळ्याचे दिसते. थॉमस व झनैकी यांनी दी पिलीश पिझंट या

अध्ययनात व्यष्टी अध्ययन पद्धतीचा उपयोग केला यामुळे एक व्यवस्थित क्षेत्र संशोधन यंत्र म्हणून व्यष्टी अध्ययन पद्धतीस लोकप्रियता मिळाली.

## ४.ब.१ सामग्री संकलनाच्या पद्धती व्यक्ती अध्ययन

एका घटकाचे परिपूर्ण अध्ययन करण्याच्या पद्धतीला व्यष्टी अध्ययन म्हणतात. सदर अध्ययन घटक हा एक व्यक्ती, विशिष्ट समूह, एखादी संस्था किंवा एखादी संस्कृती सुद्धा असू शकतो. एककाच्या संदर्भात विविध पैलू लक्षात घेऊन अध्ययन केले जाते. चालच प्रत्यक्ष अभ्यास ही व्यष्टी अध्ययनातील एक महत्वपूर्ण बाजू आहे.

## ४.ब.२ विषयप्रवेश

संशोधनकर्ता आपले संपूर्ण कौशल्य एककाचा अभ्यास करतो. ज्या अभ्यासघटकाचे अध्ययन करावयाचे आहे, त्या घटकासंदर्भात सर्ब बाजू विचारात घेतल्या जातात. एखाद्या व्यक्ती संदर्भात अध्ययन करताना त्याचा जीवनइतिहास, जडणघडण, भौगोलिक वास्तव्य, संपर्कातील व्यक्ती, मनोवृत्ती, आर्थिक आणि सामाजिक स्थिती, कौटुंबिक नातेसंबंध अशा विविधांगी पैलूंचा विचार केला जातो. हीच बाब विकास प्रक्रियासंदर्भात असल्यास विकास प्रक्रियासंदर्भातील विशिष्ट भौगोलिक प्रदेशाची पार्श्वभूमी, विकास्पूर्व आणि विकासोत्तर कालखंडातील जीवनपद्धती, स्थलांतर, परिवर्तन, सामाजिक मूल्य व व्यवहारांतील बदल असा बहूआयामी स्वरुपातील अभ्यास यात केला जातो.

**व्याख्या**

**पी.व्ही.युंग**

व्यष्टी अध्ययन एखाद्या सामाजिक एककाचे संपूर्ण विश्लेषण करण्याची पद्धती आहे मग तो एकक व्यक्ती, कुटुंब, संस्था, सांस्कृतिक समूह किंवा समुदाय असो.

**सीन पाओ युंग**

एखादा व्यक्तीच्या सूक्ष्म, गहन तसेच संपूर्ण अध्ययनाच्या रुपामध्ये परिभाषित केले जाऊ शकते. ज्यात संशोधक आपल्या क्षमता आणि पद्धतीचा प्रयोग करतो.

**वॉटसन**

एखाद्या एककाला त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या स्वरुपात परिपूर्ण रूपाने त्याचे अध्ययन करतो, तेव्हा अशा अध्ययनास व्यष्टी अध्ययन असे म्हणतात. असे एकक एखादा व्यक्ती, कुटुंब, सामाजिक समूह, सामाजिक संस्था किंवा समुदाय असू शकतो.

व्यष्टी अध्ययन बहुतकरून गुणात्मक स्वरुपात केले जाते. सामाजिक शास्त्रासोबत वैद्यकीय क्षेत्रातही याचा साकल्याने वापर केला जातो. एखाद्या पेशंट संदर्भात परिपूर्ण

अध्ययन करून त्या संदर्भातील सामग्री जतन करून ठेवली जाते. वैद्यकीय ज्ञानाचा भाग म्हणून पेशंटची माहिती अन्य व्यक्तीच्या उपचारादरम्यान उपयुक्त ठरते.

**आपली प्रगती तपासा.**

१. व्यष्टी अध्ययन पद्धतीची कोणतीही एक व्याख्या सांगून तिचे स्पष्टीकरण द्या.

## ४.ब.३ व्यष्टी अध्ययनाची वैशिष्ट्ये

व्यष्टी अध्ययन पद्धतीची वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर या पद्धतीची अधिक स्पष्टता आपल्यास येते. याची गुणवैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१) **विशिष्ट घटक अभ्यास** एका विशिष्ट घटकाचे संदर्भाने परिपूर्ण अध्ययन केले जाते. तथ्यांसंदर्भातील सर्व उपघटकांचे अध्ययन करून संशोधन केले जाते. व्यक्ती संदर्भातील अध्ययन वैद्यकशास्त्र या प्रभावी वापर आपल्या उपचार पद्धतीसाठी करतात.

२) **सूक्ष्म अध्ययन** घटकाचा परिपूर्ण अभ्यास केल्याशिवाय निश्चित निष्कर्षाप्रत पोहचता येत नाही. संशोधक आपल्या अभ्यास विषयासंदर्भात लहानात लहान पैलूही अभ्यासासाठी घेतो. यामुळे घटकासंबंधातील प्रत्येक संदर्भाचा सखोल अभ्यास करता येतो.

३) **भूतकाळ व वर्तमानाचे अध्ययन** संशोधक तात्याच्या संदर्भातील भूतकालीन बाजू लक्षात घेतो. याचसोबत वर्तमानकाळातील घटना आणि घटकांचेही अध्ययन करतो. एखाद्या तथ्याचे अध्ययनासाठी त्याचे संदर्भ लक्षात घेणे फार गरजेचे असते. हे कार्य व्यष्टी अध्ययनात पूर्ण होते.

४) **कार्यकारण संबंधाचे अध्ययन** एककाच्या संदर्भात विशिष्ट कायदा किंवा योजना अंमलबजावणीनंतर व्यक्ती वा समूहावर कोणता परिणाम झाला याचे अध्ययन व्यष्टीअध्ययनामुळे शक्य होते. शासकीय योजनांचा अभ्यास करताना योजना राबविण्यापूर्वीची स्थिती आणि योजनेच्या अंमलबजावणीनंतरची स्थिती असा अभ्यास करण्याकामी व्यष्टी अध्ययन पद्धती उपयुक्त ठरते.

५) **सखोल अध्ययन** एककाचे संदर्भात अधिक सखोल अध्ययनामुळे अभ्यासविषयाचे अदृश्य पैलू पुढे येतात. समस्येच्या व्यापक अभ्यासाकरिता असे अध्ययन गरजेचे असते. व्यष्टी अध्ययनाच्या माध्यमातून एककाच्या संदर्भात अतिशय सखोल अध्ययन आणि विस्तृत अध्ययन केले जाते.

६) **गुणात्मक अध्ययन** व्यष्टी अध्ययनातून मिळणारे निष्कर्ष बहुतांशी गुणात्मक स्वरूपाचे असतात. सांख्यिकीय आधार या पद्धतीत उपयुक्त नसतात यामुळे गुणात्मक अध्ययन करून तथ्यांचे आशय विश्लेषण केले जाते. वर्णनात्मक स्वरूपाचे निष्कर्ष संशोधित केले जातात.

७) **ऐतिहासिक संदर्भ अध्ययन** व्यापक स्वरूपाच्या अध्ययनातून घटकांसंदर्भात ऐतिहासिक अध्ययन केले जातात. प्रथा, परंपरा, संस्कृती संबंधित विविध घटक, विशिष्ट रितीरिवाज यांचे अध्ययन करावयाचे असल्यास त्याच्या वर्तमानकालीन अध्ययनासोबत त्याचे ऐतिहासिक संदर्भ अध्ययन करणे जरुरी असते. व्यक्ती संदर्भातील अध्ययनावेळीही घटना वा घटकांचे ऐतिहासिक संदर्भ अभ्यासणे गरजेचे असते.

**आपली प्रगती तपासा :**

१. व्यष्टी अध्ययन पद्धतीची गुणवैशिष्ट्ये सांगा.

## ४.ब.४ व्यष्टी अध्ययनाचे प्रकार

अध्ययनाच्या विषय आणि अध्ययनाचे घटक जसे बदलतात त्या स्वरुपात व्यष्टी अध्ययनाचे प्रकार आहेत. ते पुढीलप्रमाणे लक्षात घेता येतात.

१) व्यक्तीचे व्यष्टी अध्ययन एका व्यक्तीच्या जीवनासंदर्भात सर्व घटकांचे अध्ययन केले जाते. विशिष्ट व्यक्तीमत्वाचा अभ्यास करताना ही पद्धती वापरली जाते. यात त्या व्यक्तीचे कुटुंब, मित्रपरिवार, शेजारी, स्नेही, परिचित अशा व्यक्ती सोबत व्यक्तीसंदर्भातील दस्तऐवज जसे की वैद्यकीय दाखला, पत्र, दैनंदिनी, लेखन अशा स्त्रोतांचा वापर केला जातो.

२) समुदायाचे व्यष्टी अध्ययन समूहाचे अध्ययन एक एकक घटक म्हणून करताना त्या समूदायाचे विशिष्ट वर्गीकरण केले जाते. जात, धर्म, वंश, पंथ, विशिष्ट भौगोलिक स्थानबद्धता या आधारावर समुदायाचे व्यष्टी केले जाते. असे अध्ययन करण्यापूर्वीची संशोधकास समुदायासंदर्भातील सर्व उपघटकांचा विचार करणे गरजेचे असते. संशोधक अनुभवी असणे आवश्यक असते.

३) निरीक्षण व्यष्टी अध्ययन रॉबर्ट बर्न्स यांनी सदर प्रकार विश्लेषित केला आहे. या स्वरूपाच्या व्यष्टी अध्ययनात संशोधक सहभागी होऊन निरीक्षणाचा वापर करतो. काही वेळेस अर्धसहभागी किंवा असहभागी निरीक्षण तंत्राचा वापर करतो. निरीक्षण तंत्राच्या आधारे विशिष्ट व्यक्ती, गट, घटना यांचे अध्ययन केले जाते.

४) ऐतिहासिक व्यष्टी अध्ययन या अध्ययन प्रकारात संशोधक अभ्यासविषयाच्या दीर्घकालीन वाटचालीचा मागोवा घेतो. विशिष्ट प्रकारची व्यवस्था किंवा सामाजिक रचना कोणत्या कारणांमुळे अस्तित्वात आली. एखादी संघटना कशी विस्तारित झाली अशा विषयांचे अध्ययन केले जाते. ऐतिहासिक दस्तऐवाजांचा वापर अध्ययनासाठी केला जातो.

५) चिकित्सक व्यष्टी अध्ययन व्यक्ती किंवा अभ्यास घटकाला अभ्यासण्यासाठी वापरले जाते. गुन्हेगारी शास्त्रात याचा प्रामुख्याने वापर केला जातो. मुलाखत, निरीक्षण, पूर्व

नोंदी, दस्तऐवज अशा साधनांचा वापर करतात. युध्दशास्त्रातील अभ्यासासाठीही या प्रकारच्या अभ्यासाची नोंद घेतली जाते.

६) घटनांचे व्यष्टी अध्ययन या व्यष्टी अध्ययनात विशिष्ट घटनांचे व्यवस्थाबद्ध अध्ययन केले जाते. घटनेशी संबंधित घटकांचे परिपूर्ण अध्ययन केले जाते. क्रांतिकारक घटना, दंगली, आंदोलने यांचे यात अध्ययन केले जाते.

७) बहुप्रयोगी व्यष्टी अध्ययन या प्रकारात काटेकोर निष्कर्ष प्राप्तीसाठी व्यष्टी अध्ययनाची पुनरावृत्ती केली जाते. एखाद्या योजनेच अंमलबजावणी विशिष्ट प्रदेशात होत नसल्यास त्याची कारणमीमांसा करण्याहेतूने वारंवार व्यष्टी अध्ययन करून निश्चित मीमांसा करून उपाययोजना सुचाविया जातात.

**आपली प्रगती तपासा :**

१. व्यष्टी अध्ययन पद्धतीचे विविध प्रकार सांगा.

## ४.ब.५. व्यष्टी अध्ययनाचे महत्त्व

संशोधन समस्येचे अत्यंत सूक्ष्म अध्ययन या पद्धतीद्वारा केले जात असल्यामुळे सामाजिक संशोधनात ही पद्धती अत्यंत उपयुक्त ठरते. मानसशास्त्र, वैद्यकशास्त्र, गुन्हेगारीशास्त्र, युद्धशास्त्र, ऐतिहासिक अभ्यास अशा अनेक ठिकाणी व्यष्टी अध्ययन पद्धती महत्वपूर्ण ठरते. व्यक्तीच्या सर्वांगीण अभ्यासापासून ते एखाद्या देशाच्या सर्वांगीण इतिहासाचा अभ्यास या पद्धतीद्वारा करता येणे शक्य आहे. मानवशास्त्रज्ञांनी इतिहासाचा अभ्यास या पद्धतीद्वारा करता येणे शक्य आहे. मानवशास्त्रज्ञांनी या पद्धतीचा वापर करून व्यष्टी अध्ययन पद्धती सामाजिक शास्त्रांमध्ये लोकप्रिय करण्याचे कार्य केळे.

भूगर्भातील पाण्याचा विनियोग जमीन हक्कांशी जोडला गेला. परिणामी जे जमिनीचे मालक होते त्यांनाच केवळ त्या पाण्याचा विनियोग करता येऊ लागला. व्यावसायिक व शेती विषयक उद्दिष्ट समोर ठेऊन भूजल पाण्याचा नलिका व वीज पंपाद्वारे पाणी उपसा केला तर पाण्याची पातळी खाली जाईल असा धोका निर्माण झाला. भारतातील बहुतांशी भागात तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. महाराष्ट्रातील परिस्थिती तर अत्यंत वाईट आहे. आर्थिक सहाय्य आणि सिंचन सुविधांच्या अभावामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. राज्याच्या पाण्यावरील नियंत्रणामुळे जल संपत्तीचा ऱ्हास झाला असून संघर्ष वाढला आहे. उदाहरणार्थ, आंध्र प्रदेशातील प्लाचीडामा व तामिळनाडू मधील आठूर गाव येथे शहर केंद्रित विकास प्रतिमान व पाण्याचा अतिरेकी वापर या विरोधात चळवळी सुरु आहेत.

**स्थानिक प्रतिकार चळवळ:**

दक्षिण महाराष्ट्रातील जल हक्क संदर्भात सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर जिल्ह्यातील पाणी संघर्ष ही स्थानिक प्रतिकार चळवळ आहे. गेल्या काही दशकांत अशा चळवळीची भौतिक आणि वैचारिक व्याप्ती वाढत आहे. जल हक्क चळवळीचा इतिहास दोन टप्प्यात विभागला जाऊ शकतो. पहिल्या टप्प्यात आंदोलन मुक्ती संघर्ष चळवळ म्हणून ओळखली जाते ह्याची व्याप्ती केवळ सांगली जिल्ह्यातील खानापूर पुरतीच मर्यादित राहिली. दुसऱ्या टप्प्यात शेतमजूर, कष्टकरी शेतकरी संघटना आणि महाराष्ट्र राज्य धोरण व प्रकाल्पग्रस्त परिषद ही चळवळ कृष्णा खोऱ्यात अधिक बळकट होण्यासाठी महत्वाची ठरली. पाण्याचे न्याय वितरण आणि भूमिहीन शेत मजुरांवर लक्ष केंद्रित करणे हा यामागील प्रमुख हेतू होता.

**प्रभाव:**

न्यायप्रविष्ठ बाबींना मुख्य प्रवाहात आणले.

प्रत्येक कुटुंबाला अर्धा एकर जमीन व सिंचनासाठी पुरेसे पाणी मिळेल व ते जमिनीचे क्षेत्र त्याचा मालकीचे असेल.

चरितार्थाचा हक्क म्हणून पाण्याचा हक्क:

पाणी हे महत्वाचे उपजीविकेचे साधन मानले जाते म्हणूनच ते भूमिहीन वर्गासह सर्वांना मिळावे.

**धरणग्रास्तांचा समावेश आणि पाण्याचा विनियोग:**

हि चळवळ प्रामुख्याने धरणग्रस्तांच्या पाणी हक्कावर प्रकाश टाकते.

पुनर्वसन, धरण बांधणी आणि पाण्याची सोय:

आंदोलनाद्वारे जल हक्क चळवळीत सहभागी लोकांच्या पुनर्वसनासाठी सहाय्य करणे.

मोठ्या प्रमाणावर निधी संकलन करून धरण बांधकामास सुलभ करणे व पुनर्वसन करणे.

**रोजगाराभिमुख कार्यनीती**:

हि दुष्काळ आणि धरणग्रस्तांची संयुक्त कृती आहे. विकसनशील नाविन्यपूर्ण राजकीय आणि एकत्रित रणनीती आहे. चळवळींची सर्वात महत्वाची बाजू म्हणजे ती पर्यायाभिमुख असते. समान्यत: चळवळ निषेधाचा विचार न करता त्याचा पर्याय शोधण्याची जबाबदारी प्रदान करणे ही पर्यायी जबाबदारी मानली जाते.

**सहभागी:**

आंदोलन, संघर्ष आणि विभिन्न कार्यक्रम यामध्ये विविध स्तरांवर लोकांचा सहभाग वाढला व ग्रामीण आणि ग्रामीण समुदायांकडे विशेष लक्ष देण्यात आले.

**नेतृत्व आणि निर्णय:**

बहुतांशी नेते सुशिक्षित होते व ते ग्रामीण भागाशी संबंधित असून त्यांची पार्श्वभूमी शेती व शेतमजूरशी निगडीत आहे.

**स्त्रोत गतिशीलता:**

आर्थिक स्त्रोतांच्या दृष्टीने निधी संकलन व्यापारी, संघटना आणि चळवळीशी संबंधीत जन संघटना यांच्या मार्फत करण्यात आला.

**यशोगाथा:**

बालाजी मेमोरिअल धरण सर्वाधिक महत्वाचा रचनात्मक प्रभाव होता. येरला ही कृष्णाची उपनदी आहे. १९७० च्या दशकात साखर कारखाने, वाळू उत्खनन, लहान व मध्यम बांधकामे इत्यादी चा परिणाम पृष्ठभागावर झाला. भूगर्भातील पाण्याच्या प्रवाहावर झाला. वाळू उत्खनन हे पाण्याचे प्रवाह कोरडे होण्याचे प्रमुख कारण मानले जाते प्रामुख्याने येरला नदीच्या काठावर वसलेली बलवाडी व तांदूळवाडी ही जुळी गावे या विषयावर चर्चेचे व वादविवादाचे केंद्र बनले व त्यांनी ह्या लढ्याचे नेतृत्व केले. आंदोलनकर्त्यांनी जनहितयाचिका दाखल केली आणि वाळू उत्खनना विरोधात विजय मिळविला. साखर कारखान्यासाठी देखील आता पाणी वापरले जात नाही.

टेंभू उपसा सिंचन योजना १९९५ साली सुरु करण्यात आली होती. ती अंशत: दुष्काळग्रस्त भागातील पाणी प्रश्नावर लक्ष केंद्रित करते व कृष्ण नदीच्या खोऱ्यातील पाणी वापरले जात होते. पाणी हक्क चळवळीसाठी आटपाडी तालुका गड समजला जातो. ८४

गावांपैकी ६३ गावांची १६००० हेक्टर जमीन वापरून त्या माध्यमातून ४.४ टी.एम.सी. पाणी मिळणार होते. त्यासाठी संघर्ष ही सुरु करण्यात आला. पाण्याच्या न्याय वितरणाच्या आधारे ह्या योजनेची पुनर्रचना करून सर्व तालुक्यातील सर्व भूमिहीन लोकांसह ८४ गावांना पाणी पुरवठा करण्यात आला. २००१ मध्ये लोकांच्या तीव्र निषेधामुळे सरकार त्यांच्याशी सहमत झाले व सर्वांना समान पाणी वाटपाच्या योजनेचे काम सुरु झाले.

**आपली प्रगती पहा:**

१. 'गोराई' चा विशेष संदर्भ देऊन महाराष्ट्रातील सेझ स्पष्ट करा.

२. 'जल हक्क' यावर संविस्तर टीप लिहा.

## ६.६ सारांश:

वरील विवेचनाद्वारे असे दिसून येते की, नव-उदार राज्यातील विकास प्रतिमाने शहर केंद्रित, उत्पादन आणि शक्तीचे असमान वितरण यावर आधारित आहेत. समाजातील बहुतांशी घटक सांस्कृतिकदृष्ट्या दुरावलेला, भावनिकदृष्ट्या निराश आणि गरीब अशा प्रकारचा आहे. प्रतिकार व संघर्ष करणे हा त्यांच्या उपजीविका आणि संस्कृतीच्या संरक्षणासाठी आहे.

## ६.७ सरावासाठीचे प्रश्न:

१. कोणत्याही एका विशिष्ट अभ्यासावर प्रतिकार चळवळीचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा.

२. प्रतिकार चळवळीच्या संदर्भात दिल्ली मुंबई औद्योगिक क्षेत्राबद्दल थोडक्यात चर्चा करा.

३. रायगड आणि गोराई सेझ संदर्भात संविस्तर चर्चा करा.

४. जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या परिणामांवर भाष्य करा.

## ६.८ संदर्भ:

1. Admiral Ramdas and Lalita Ramdas., 2007, 'Land Grab in Raigad', EPW, Vol.42, Issue 2.

2. Roy Choudhury A., 2000, 'Amusement Parks Versus People's Livelihood', EPW.

3. Bholane K.P, 2019, 'Prospects Delhi-Mumbai Industrial Corridor Introduction', Conference Paper, DMIC opportunities and challenges.

4. Bidwai P., 2011, 'People vs Nuclear Power in Jaitapur, Maharashtra, EPW, Vol.XLVI N0. 8

5. Devale K., and Paranjape S., 'Pani Snagharsh Chalwal: A case study from South Maharashtra, India, waterconflictforum.org. EPW March 10, 2012 vol XLVII, Issue 10

6. Hakami M.S., 2016, 'A study of SEZ: Problems and Prospects with special reference to Raigad and Pune District, India, International Journal of Advanced Research.

7. Herbert M., 2008, 'Resistance Movement an Overview', Oxford Encyclopedia of the Modern World, Oxford University Press.

8. India Today, 2011, 'Maharashtra Government Scrap Mumbai SEZ', www.indiatoday.in

9. Joy K.J and Paranjape S.,2002, 'Energy Management Opportunities and Challenges in the Tembu Lift Irrigation Scheme, Atpadi Taluka, Maharashtra', SOPPECOM, Energy-Water Co-Management Options and Challenges in TLIS

10. Kale S., 2010, 'The Anti SEZ movement in India', NCAS

11. Khosla R., and Soni V., 'Delhi Mumbai Corridor a water Diaster in the Making?

12. Kumar M and Furlong M., 2012, 'Securing the right to water in India: Perspectives and Challenges', Blue Planet Project Organizers.

13. Mohammed Nuruzzman, 2009, 'Globalization and Resistance Movements in the Periphery: An Alternative Theoretical Approach.

14. Ojah O, 2007, 'The National Rehabilitation and Resettlement Policy, New Delhi, MORD.

15. Rout S., 2009, 'Revisiting Baliraja Dam Struggle: A study of an Environmental Movement in Maharashtra, Sociological Bulletin, Vol.58, Issue 3

16. SEZs and Land Acquisition, Factsheet for an unconstitutional Economy Policy.

❖❖❖❖

# ७

# विकासाचा पर्यायी दृष्टिकोन

## (ALTERNATIVE APPROCHES TO DEVELOPMENT)

**प्रकरणाची रचना :**


७.१ प्रस्तावना

७.२ पर्यायी विकासाची व्याख्या

७.३ पर्यायी विकासाची वैशिष्ट्ये

७.४ पर्यायी विकासाचे महत्त्व

७.५ चिरंजीवी विकास

७.६ चिरंजीवी विकासाची व्याख्या

७.७ चिरंजीवी विकासाची वैशिष्ट्ये

७.८ चिरंजीवी विकासाचे महत्त्व

७.९ पर्यावरणपूरक शेती

७.१० पर्यावरणपूरक शेती व्याख्या

७.११ पर्यावरणपूरक शेतीची वैशिष्ट्ये

७.१२ पर्यावरण पूरक शेतीचे महत्त्व

७.१३ सेंद्रिय शेती

७.१४ सेंद्रिय शेतीची व्याख्या

७.१५ सेंद्रिय शेतीची वैशिष्ट्ये

७.१६ सेंद्रिय शेतीचे महत्त्व

७.१७ अनकोली प्रकल्प सोलापूर

७.१८ अनकोली प्रकल्पाची पार्श्वभूमी

७.१९ अनकोली प्रकल्पाचे निष्कष

७.२० सारांश

७.२१ अभ्यासाचे प्रश्न

७.२२ संदर्भ पुस्तके

## ७.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

जागतिक स्तरावरती विकासाच्या मार्गाविषयीची महाचर्चा निर्माण झाली आहे. त्यानुसार विकासाच्या स्वरुपाचे विश्लेषण, विविध भागामध्ये होत असल्याचे दिसुन येते. त्यानुसार संपूर्ण जगताची विभागणी विकसित, विकसनशील आणि मागासलेल्या स्वरूपामध्ये पाहण्यास मिळते. हा विकास सर्वार्थाने समजून घेणे आवश्यक आहे. हा विकास मानवी समाजातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शिक्षण, आरोग्य जीवनमानाचा दर्जा आणि पर्यावरणाची समृद्धता इत्यादींच्या स्तरावरती पाहण्यात येते. सूक्ष्म अर्थशास्त्राच्या स्तरावरती विकासाचे मोजमापन केले जाते. याचे वैचारिक आणि व्यावहारिक विश्लेषणात्मक चिकित्सक पद्धतीने अभ्यासणे आवश्यक आहे. तेव्हा समाजातील संपूर्ण घटकांना मुख्य विकासाच्या प्रवाहात आणण्याचे धोरण स्पष्ट होईल. यातून विकासात्मक प्रक्रिया घडवून आणता येईल.

दुसऱ्या महायुद्धा नंतरच्या काळात विकासासंबंधी चर्चाना सुरुवात झाली. या काळात अभिजात अभ्यासक हे भांडवली व्यापारी आर्थिक मॉडेलच्या माध्यमातून विकासाचा विचार आणि व्यवहारावरती अधिकचा प्रभाव पाहण्यास मिळत होता. हे मॉडेल राजकीय उदारमतवाद आणि सामाजिक सांस्कृतिक आधुनिकतेचा स्वीकार करणारे होते. या काळात आर्थिक विकासाची संकल्पना ही प्राथमिक स्तरावरती विकासाच्या व्यवहाराचे उद्दिष्ट म्हणून पाहिले जात होते. याचे गृहितक हे आर्थिक विकास आणि उच्च उत्पादन निर्मिती करणे हे आर्थिक दृष्टिकोनातून होते ज्याचा सामाजिक प्रगतिशिलतेशी घटकाशी संबंध जोडण्यात येतो.

पर्यायी विकास हे विकासाचे मॉडेल आर्थिकतेचे सोविएत युनियन यांच्या कडून निर्माण करण्यात आले. त्यांनी विकासाच्या अपेक्षित धोरणास भांडवल आणि सोविएट सांयनरीफीक मॉडेल म्हणून वेगळे केले आहे. त्यांनी राज्याची भूमिका महत्त्वाची मानली आहे. नव्याने स्वातंत्र्य झालेल्या देशांनी आर्थिक आणि राजकीय विकासाचे समिश्र मॉडेल स्विकारण्यात आले. मिश्र अर्थव्यवस्था म्हणून स्विकारण्यात आले यातून खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्राची विभागणी करण्यात आली. याचबरोबर या देशांचे उद्दिष्ट हे सुक्ष्म अर्थव्यवस्थेच्या आधारे औद्योगिक विकास करण्यास सुरुवात करण्यात आली.

सन १९६० आणि १९७० च्या दशकामध्ये समकालीन विकास मॉडेल वरती चिकित्सात्मक चर्चा करण्यात येऊ लागली. त्यामध्ये विकासाचा मुळ उद्देश समानता असला पाहिजे याची चर्चा होऊ लागली. समाजातील लहान घटकापर्यंत संपत्तीचा उपभोग घेता आला पाहिजे. विकास आधारित जीवन पद्धती निर्मिती करता येईल असा विस्तृत भूमिका व्यवहारात आणणे आवश्यक आहे.

सन १९७० नंतरच्या काळात पर्यावरणाच्या संबंधी समकालीन विकाराचे मॉडेल निर्माण करण्यात आले. यांनी आधुनिक विकास प्रकल्पाची पर्यावरणीय किंमत काय असा प्रश्न उपस्थित केला हे समकालीन विकासाच्या संदर्भात चिकित्सक पद्धतीने विश्लेषण करु लागले त्यांना आव्हान देण्याचे कार्य करु लागले. जे नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करुन मानवाच्या विकासाविषयी चर्चा करु लागले. औद्योगिक समाजामध्ये समकालीन विकासाच्यासाठी नैसर्गिक साधन वापर करुन मानवाने फायदा घेतला आहे. यासंबंधी पर्याय विकासाचे धोरण आधुनिक पाश्चिमात्य विज्ञान आणि तंत्रज्ञान भूमिका स्पष्ट करण्यास सुरुवात केली.

सन १९८० नंतरच्या काळात पर्यावरणाच्या प्रश्ना संबंधी स्थानिक आणि जागतिक स्तरावरती राजकीय दबाव निर्माण करण्यात आले केंद्रीय स्तरावरती चर्चे विषयी तयार करण्यात आला. यामध्ये दारिद्र्य आणि पर्यावरणाच्या प्रश्नाचे विश्लेषण करण्यात आले. यातून पर्यावरण आणि

विकास या संबंधीचे प्रश्न समजून घेण्यात आले. यामध्ये World Commission on Environment and Development (WCED) or Bruetelland Commission यांनी सन १९७२ मध्ये Rio Conference घेण्यात आली त्याचा मुख्य भाग हा चिरंजीवी विकास संबंधीत होता. सन १९९० नंतर जागतिकीकरण खाजगीकरण उदारिकरणाचे धोरण स्विकारण्यात आले. त्यामध्ये चिरंजीवी विकास धोरणाची अंमलबजावणी करण्यात आली. त्याबरोबर चिरंजीवी जीवनावश्यक विषयी चर्चाविश्व निर्माण करण्यात आले.

जागतिकीकरण प्रक्रियेसंबंधी सोविएट ब्लँक देशांमधील भौगोलिक राजकीय परिस्थितीच्या संबंधी सध्यकालीन भांडवली परिस्थिती विषयी पर्यावरण प्रश्नाचे विश्लेषण करण्यात आले. याविषयी टिकात्मक विश्लेषण समोर येऊ लागले. बहुत अर्थव्यवस्थेचा दृष्टिकोन समोर ठेवून त्याचे विश्लेषण केले आहे. उत्तर आणि दक्षिण जगतामधील आर्थिक आणि राजकीय धोरणाच्या मध्ये परिणामकारक बदल होऊ लागले. त्यामुळे समाजातील आर्थिक आणि राजकीय वंचित समुहाना न्यायाच्या प्रतिक्षेत रहावे लागत असते.

या संदर्भात विकासाच्या प्रक्रियेसंबंधी अनेक विचार प्रवाहानी आपली मते स्पष्ट केली आहेत. पण मुद्दा आहे चिंरजीवी जीवनावश्यक पद्धतीच्या संदर्भात पर्यायी विकास निती निर्मितीबाबत भूमिका समजून घेणे महत्त्वाचे आहे. यानुसार पर्यावरण आणि मानव यामधील संबंध समजून विकासात्मक धोरण निर्मिती केली जाते. नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरिक्त वापर न करता त्याला पर्यायी साधनसंपत्ती विकसित करण्याच्या अनुषंगाने नवीन व्यवस्था म्हणून उभारणे आवश्यक आहे. त्यामुळे विकासात्मक परिणामात्मक परिवर्तन निर्माण करता येईल.

## ७.२ पर्याय विकासाची व्याख्या (DEFINITIONS OF ALTERNATIVE DEVELOPMENT)

१) **युनायटेड नेशन ऑफिस ऑन ड्रग्स ॲन्ड क्राईम (UNODC)** यांच्या मते "पर्यायी विकास हा दृष्टिकोन आहे. ज्याचे उद्दिष्ट हे औषधाची परिणामकारकता कमी करुन बेकायदेशीर पिक कसण्याची पद्धती आणि मुलभूत मशागतीच्या काही नाकारण मध्ये पुढाकार घेतला जातो. पर्यायी विकास हा बेकायदेशीर औषध निर्मिती याबबतीत कायदे नियमाची दुर्बलता मनुष्य प्राणी संबंधी कमी करणे, दीर्घकालीन बेकायदेशीर अर्थव्यवस्था वाढ कमी करणे, बेकायदेशीर क्षेत्रातील गुंतवणूक कमी करणे, तसेच गुन्हेगारी आणि अत्याचार प्रमाण कमी करणे, दीर्घकाळ पायाभूत सुविधामध्ये गुंतवणूक करणे त्याद्वारे ग्रामीण समुदायाचे चिरंजीवी आणि परिवर्तनीय उपजिविका निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे पर्यायी विकास होय."

२) **UNGASS (2003)** यांच्या मते पर्याय विकास कार्यक्रमाचे मुख्य उद्देश हा शेतकऱ्यांना वाढत्या बेकायदेशीर औषधांशी संबंधित पिके न घेण्याचे प्रोत्साहित करणे. औषध वापराच्या नियंत्रणाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. याचे यशस्वी नोंद ठेवली जाते. असे असले तरी एका देशातून दुसऱ्या देशात जागतिक औषध पुरवठा विकास आणि दडपणाचा अर्थ हा उत्पादनाचे व्यवस्थापन प्रयत्न संबंधी प्रश्न निश्चित उपस्थित केला जाईल.

वरील सर्व व्याख्या मधून पर्याय विकास ही सार्वत्रिक व्यापक संकल्पना आहे. त्याचा जागतिक स्तरावरती पर्यावरण आणि मानव विकास संबंधीचे नियोजन करण्यात येते. या संकल्पनेत शेती उत्पादन निर्मिती मध्ये औषध किटक नाशकाचा वापर करण्यावरती नियंत्रण करण्यात येते. तसेच औषध पद्धतीचे बेकायदेशीर वापर करण्यावरती नियंत्रण करणे. तसेच ग्रामीण समुदायाचा

विकास करत असताना दीर्घकाळ चिरंजीवी विकासाचे उद्दिष्ट ठेवून नियोजन आणि नियंत्रणात्मक भूमिका घेऊन व्यवस्थापन केले जाते. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यात येते.

## ७.३ पर्यायी विकासाची वैशिष्ट्ये (CHARACTERISTICS OF ALTERNATIVE DEVELOPMENT)

पर्याय विकास हा विकास आधारित भूमिका आहे. ज्याचा मुख्य केंद्र ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे आहे. नवीन विकासाच्या धोरणाला पर्यायी विकासाच्या माध्यमातून आव्हान निर्माण करण्यात येते. ज्यामुळे पर्यावरण आणि मानव यांच्यातील सहसंबंध व्यवस्था निर्माण करता येईल. तसेच सामाजिक आर्थिक विकास आधारित जीवन मानाचा दर्जा समानतेच्या पातळीवरती स्थानिक लोकांना सहभाग करुन स्वयंपूर्णता निर्माण केली जाते. यातून स्वावलंबन, आत्मविकास, स्वाभिमान जीवन पद्धती निर्माण करण्यात येते. पर्याय विकासाची वैशिष्ट्ये पुढील मुद्याच्या आधारे समजून घेता येते.

### १) जीवन मानाच्या दर्जात समानता (Equality in Living Standard) :

पर्याय विकासाचा केंद्रबिंदू हा मानवी समाज आहे. या समाजाचा सर्वांगीण विकास करणे महत्त्वाचे मानले आहे. त्याच्या सामाजिक आर्थिक जीवन मानाचा दर्जा उंचावणे आवश्यक आहे. हा पर्याय विकासाच्या माध्यमातून केला जातो. तो करत असताना समानता हे मुलतत्व केंद्र स्थानी ठेऊन विकास करणे आवश्यक आहे. समाजातील सर्व घटकांना विकासाच्या प्रवाहात येण्याची समान संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. हा पर्याय विकासाच्या माध्यमातून समानतेच्या आधारे विकास साध्य केला जातो.

### २) विकेंद्रीत अर्थव्यवस्था (Decentralization of Economic System) :

पर्याय विकासाचा मुख्य उद्देश हा विकेंद्रित अर्थव्यवस्थेची निर्मिती करणे आहे. म्हणजे आर्थिक विकासात विशिष्ट घटकांची मक्तेदारी न ठेवता सर्वकष विकास करणारी अर्थव्यवस्था निर्माण केलीजाते. समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या प्रवाहात आणण्ययासाठी अर्थव्यवस्थेत बदल करणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन उत्पादन व्यवस्था ही आर्थिक परिस्थितीत बदलाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे समाजातील वंचित घटकांना विकासाचा मुळ प्रवाहात आणण्यासाठी विकेंद्रित अर्थव्यवस्था महत्त्वाची आहे.

### ३) पर्यावरणाचे संवर्धन (Conservation of Environment) :

पर्यावरणाचे संवर्धन करणे हे पर्याय विकासाचे मुख्य लक्ष आहे. आपल्या सभोवतालचे वनस्पती प्राणी, पक्षी, कीटक, जीवजंतू यापासून पर्यावरणाची निर्मिती होते. या पर्यावरणाचे संवर्धन करणे आवश्यक आहे. या पर्यावरणाचा उपयोग करुन मानवाने आपला विकास केला आहे. पण पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यात आले नाही. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. परिणामी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी पर्यायी विकासाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. पर्यावरण संबंधीत विकासाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येते. यामध्ये पर्यावरण संतुलित प्रदूषण विरहित समृद्ध विकास केला जातो.

**४) शेती उत्पादनात वाढ (Inreased Agricultural Production) :**

पर्याय विकास हा शेती उत्पादनाच्या वाढीवरती लक्ष केंद्रित करण्यात येते. मानवी जीवनात शेती उत्पादन हे जीवन आवश्यक उत्पादन मानले जाते. यामध्ये अन्न, धान्य, फळे, भाजीपाला यांचे उत्पादन केले जाते. हे उत्पादन करत असताना पिक पद्धती जमीन व पाणी व्यवस्थापन माध्यमातून शेती व्यवस्थापन केले जाते. यामध्ये कमी पाण्याची पिक पद्धती, सिंचन पद्धती, कीटकनाशक औषधे पद्धती रासायनिक खताचा कमी वापर पिक फेरपालट आणि बाजार व्यवस्थापन इत्यादी बाबी लक्षात घेऊन शेती उत्पादन वाढ केली जाते. पर्यावरणास घात असणाऱ्या शेती पध्दती नाकारुन सेंद्रिय शेती चिंरजीवी विकास आणि पर्यावरण पूरक शेती तंत्राचा वापर करण्यात येतो त्याचा परिणाम शेती उत्पादन वाढ होते.

**५) रासायनिक औषध वापर नकार (Regecting Chemical Furtilizerles)** :

पर्याय विकासा मध्ये रासायनिक औषधे यांचा वापर केला जात नाही. पर्यावरणास घातक असणाऱ्या रासायनिक औषधाचा अतिरिक्त वापरावरती नियंत्रण केले जाते. पर्यावरण पूरक शेती हे उद्दिष्ट ठेवले जाते. त्यामुळे शेतीचे आणि पर्यावरणाचे संरक्षण करता येईल. केवळ रासायनिक खताचा वापर केल्यानेच शेती उत्पादनात वाढ होते. हा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. त्यासाठी सेंद्रिय खते यांचा वापर करुन शेती केल्यास अधिक उत्पादन निर्माण करता येते असे अनेक शेती उत्पादनातील यशस्वी प्रयोग पाहण्यास मिळते.

**६) जमीन, पाणी आणि पिक व्यवस्थापन (Land, Water and Crop Management) :**

पर्याय विकास हा शेती संबंधित अधिक महत्त्वाचा मानला जातो. यामध्ये जमीन, पाणी आणि पिक पद्धतीचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. या तिन्ही गोष्टीचे योग्य शास्त्रीय संशोधन करणे आवश्यक आहे. शेती करत असताना जमीनीची उत्पादकता वाढण्यास जमीनीचा पोत त्याचा कस टिकणे आवश्यक आहे. तसेच पाण्याचा शेतीसाठीचा उपयोग किती प्रमाणात करावा हे महत्त्वाचे आहे. तसेच कोणत्या पिकांना किती पाणी कशाप्रकारे द्यावे यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे योग्य जमीन, पाणी आणि विकासपद्धतीमुळे शेती उत्पादनात वाढ होईल त्यासोबत पर्यावरणाचे संवर्धन करता येईल.

**७) जैव विविधतेचे संरक्षण (Biodiversity Security) :**

पर्याय विकासा मध्ये जैव विविधतेच्या संरक्षणाला महत्त्व आहे. कारण जैव विविधता हे पर्यावरणाच्या संवर्धनाचा भाग आहे. नैसर्गिक स्वरूपातील वनस्पती प्राणी कीटक, पक्षी, जीव जंतू, जमीन, पाणी, हवा यांचा समावेश त्यामध्ये करण्यात येतो. याचे संरक्षण करण्यासाठी पर्याय विकासाचा वापर करणे आवश्यक आहे. याचे संरक्षण कसे करता येईल यासाठी पर्याय व्यवस्था निर्माण करण्यात येते. ज्यामुळे या जैव विविधतेचे संरक्षण करता येईल.

**८) लघु उद्योग निर्मिती (Small Scale Industries)** :

पर्याय विकास हा शेती बरोबर लघु उद्योगाची निर्मिती केली जाते. पर्याय विकास हा उद्योगाच्या विकासास महत्त्व देतात. मोठ्या उद्योगाच्या निर्मिती बरोबर लघू उद्योगाची उबारणी करण्यात येते. यामध्ये पशुपालन, मासेमारी, फळ उत्पादन, कच्चा माल निर्मिती प्रक्रिया, शेतीस पूरक व्यवसाय इत्यादींच्या माध्यमातून लघु उद्योगाची निर्मिती करण्यात येते. त्यामुळे जीवनावश्यक

उत्पादनाची निर्मिती ही पर्यावरण, संवर्धन आणि सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने लघु उद्योगाची निर्मिती केली जाते.

### ९) स्वयं रोजगार निर्मिती (Self Employment Making) :

पर्याय विकास हा स्वयं रोजगार निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करते. विशेषतः नव युवकांना रोजगाराच्या संधी स्वतःहून निर्माण करता आले पाहिजे. त्यांचे तंत्रज्ञान व्यवसाय आणि व्यवस्थापनालाच केंद्रित केले जाते. त्यांना शेती सोबत लघू उस्त्रोग व बाजार व्यवस्थापनाचे प्रशिक्षण कौशल्य विकास कार्यक्रमातून दिले जाते. त्यामुळे रोजगारासाठी मोठ्या शहरात स्थंलतरण करण्याची आवश्यकता भासत नाही त्यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतरण प्रमाण कमी होईल. त्याच्यामध्ये स्वयंरोजगार जाणीव निर्माण करुन आवश्यक ते सहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. परिणामी नव युवकांना स्वावलंबी आणि स्वाभिमान जीवन जगण्यास स्वयं रोजगार निर्मिती मधून करता येते.

### १०) नवीन शिक्षण धोरण (New Education Policies) :

पर्याय विकास हा नवीन शिक्षण धोरणामधून विकसित करता येतात त्यासाठी पारंपारिक शिक्षण पद्धतीला पर्याय नवीन शिक्षणपद्धत विकसित करणे महत्त्वाचे आहे. हे नव शिक्षण धोरण कौशल्य प्रशिक्षण माध्यमातून करण्यात येते निर्माण करता येईल. ग्रामीण भागातील युवकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करण्यात येते. त्यासाठी पर्याय विकासाचे शिक्षण युवक युवती महिला वंचित घटक यांना विकासाच्या मुळ प्रवाहात आणण्यासाठी पर्यायी शिक्षण व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. ही पद्धती जीवन कौशल्य शिक्षण तंत्रज्ञान बाजार व्यवस्थापन आधारित निर्माण केली जाते. त्यामुळे विकासाच्या संधी सर्व साधारण घटकापर्यंत पोहचवत येणे शक्य होईल.

### ११) ग्रामीण विकास (Rural Development) :

पर्याय विकास हा ग्रामीण भागाचा विकासास केंद्री बिंदू मानून केला जातो. भारतात अधिक जनता ही ग्रामीण भागात राहते त्याची उपजीविका शेती आणि संबंधीत लघु व्यवसायाशी संबंधीत आहे. या संबंधीत घटकाचा विकासात्मक नियोजन करण्यात येते. ग्रामीण भागातील मुलभूत ज्ञान कौशल्य, गुण वैशिष्ट्ये यांचा विकास आणि पुढील पिढ्यांना हे प्रसारित करता येईल. या दृष्टीने प्रयत्न केले जातात. ग्रामीण भागाच्या विकासात जनता केंद्र बिंदू मानून विकास केला जातो. या विकास कार्यक्रमात लोक सहभागातून निर्माण करतात. तेव्हा या परिस्थितीत अनेक बदल होताना लोकांना अपेक्षित विकास काय आहे याविषयीचे सामुहिक निर्णायक चर्चेतील सहभाग महत्त्वाचा आहे. त्या दृष्टीने ग्रामीण विकासाचा कार्यक्रम केला जातो.

वरील सर्व मुद्यामधून पर्याय विकासा विषयीची संकल्पनात्मक आणि विश्लेषणात्मक मांडणी करण्यात येते. पर्याय विकास ही व्यापक व सार्वत्रिक संकल्पना आहे. त्याचा संबंध हा पर्यावरण आणि मानवी समाजाच्या विकासासंबंधी व्यापक चर्चा निर्माण केली जाते. आपल्या विकासास शेती उत्पादनाची निर्मिती महत्त्वाची मानली आहे. ती करत असताना जमीन पाणी आणि पिक पद्धती व्यवस्थापन केली जाते. त्यासाठी योग्य तंत्रज्ञान आणि मनुष्य बळाचा वापर केला जातो. रासायनिक खते, कीटक नाशकाचा वापर न करता सेंद्रिय खताचा वापर करुन शेती केली जाते. तसेच त्यास पूरक असणाऱ्या व्यवसायाची निर्मिती करण्यात येते. त्यामुळे सामाजिक आर्थिक स्तरावरील जीवनमानाचा दर्जा सुधारणा करण्यात येते. त्यामुळे पर्याय विकासाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) पर्याय विकासाची व्याख्या सांगा.

२) पर्यायी विकासाची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

## ७.४ पर्यायी विकासाचे महत्त्व (IMPORTANCY OF ALTERNATIVE DEVELOPMENT)

पर्याय विकासाचे मुख्य उद्देश हा सर्वांगीण विकासामध्ये पर्यावरण आणि मानव यांच्यातील संबंधामध्ये समतोल निर्माण करता येतो. या माध्यमातून नैसर्गिक पर्यावरण सुरक्षित ठेऊन मानवी विकास साध्य करण्यात येतो. आपल्या मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरिक्त वापर करण्यात येतो. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीना सामोरे जावे लागते आहे. पर्यावरणावरती अतिक्रम प्रदूषण आणि शोषण केल्यामुळे महापूर, अतिवृष्टी दुष्काळ, भूकंप, ज्वालामुखी, हवामानातील बदलाच्या परिणामाला मानवाला सामारे जावे लागते. अशा नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षण, संवर्धन आणि समतोल राखण्यासाठी पर्याय विकासाच्या संकल्पनेचा वापर करणे आवश्यक आहे त्यामुळे पर्यावरणाचा विकास करता येईल. यातून मानवी समाजातील दारिद्र, उपासमारी आणि जीवन जगण्याचा दर्जासाठी सुधारणासाठी आवश्यक असणारी उपजिविकेची साधने पर्याय विकासाच्या माध्यमातून निर्माण करणे ़आवश्यक आहे. पर्याय विकासाचे महत्त्व पुढील मुद्यामधून स्पष्ट करता येईल.

### १) पर्यावरणाचा समतोल (Equilibrium of Environment) :

पर्याय विकास मुख्य उद्देश पर्यावरणाचा समतोल राखणे होय. मानवी विकास करत असताना पर्यावरणाला कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होऊ नये याची दक्षता घेतली जाते. यासाठी पर्याय जीवन आवश्यक साधनाची निर्मिती केली जाते. त्या साधनाचा वापर करुन आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केला जातो. आपल्या गरजा या पर्यावरणाशी समतोल राखूनच पूर्ण केल्या पाहिजेत. या दृष्टीने विकासाचा वापर केला जातो.

### २) चिरंजीवी विकास (Sustainable Development) :

पर्याय विकासाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी चिरंजीवी विकासाकडे वाटचाल करणे आवश्यक आहे. आपल्या गरजा पूर्ण करुन भविष्यातील पिढ्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी चिरंजीवी विकास केला जातो हे करत असताना नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरिक्त वापर टाळणे आवश्यक आहे. तसा पर्यावरणाचा समतोल टिकवता येईल यासाठी चिरंजीवी विकासाच्या माध्यमातून व्यापक प्रकल्पाची निर्मिती करणे आवश्यक आहे. यासाठी पर्याय विकासाचा उपयोग करणे आवश्यक आहे.

### ३) शेती उत्पादन वाढ (Incrising Agricultural Production) :

पर्याय विकास हा शेती उत्पादनाच्या वाढीसाठी प्रयत्न करतो. आपल्या गरजा शेतीच्या उत्पादनाच्या माध्यमातून पूर्ण कराव्या लागतात. यासाठी शेतीच्या मशागती पद्धत, पीक पद्धती, पाणी व्यवस्थापन, जमीन कस सुधारणा आणि योग्य बाजारपेठ निर्माण करण्याच्या स्तरावरती पर्याय विकास उपयोगात आणला जातो. त्यामुळे शेती क्षेत्रामध्ये विकासात्मक परिवर्तन निर्माण करता येतो.

### ४) रासायनिक औषध नियंत्रण (Control on Chemical Fartilizer) :

पर्याय विकास हा शेती उत्पादन करताना रासायनिक औषधाच्या वापरा वरती नियंत्रण निर्माण करतात, शेतीसाठी केवळ रासायनिक खताचा अतिरिक्त वापर केल्याने शेतीत ना पिकता निर्माण होण्याची शक्यता अधिक असते. तेव्हा याला पर्याय म्हणून सेंद्रिय खते आणि औषधाचा वापर करणे आवश्यक आहे. तसेच रासायनिक द्रव्याचा आणि कीटक नाशकाचा वापर करणे आवश्यक तेवढ्याच प्रमाणात करणे आवश्यक आहे यासाठी पर्याय विकासाच्या पद्धतीचा वापर महत्त्वपूर्ण राहतो.

### ५) दारिद्र्य निर्मूलन (Poverty Reduction):

पर्याय विकासाच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलनाचा कार्यक्रमास मदत होते. या माध्यमातून प्रत्येक व्यक्तिला आपला आर्थिक विकास करण्याची संधी आणि साधने उपलब्ध करुन दिली जातात. त्यामुळे मानवी उपजीविकेसाठी उपलब्ध असणारी संसाधने निर्माण केल्या जातात. नव्या उत्पादन पद्धतीच्या माध्यमातून उत्पादन निर्माण केली जातात त्यामुळे आर्थिक गरजा पूर्ण करता येतात आणि समृद्ध जीवन दारिद्र मुक्ती मधून जगता येते.

### ६) पर्यायी उर्जा निर्मिती (Alternative Power Making) :

पर्यावरणास पूर अशी ऊर्जा निर्मितीचे साधनाची निर्मिती केली जाते. या दृष्टीने पर्यावरणाचे संतुलित टिकवण्यासाठी सुर्य ऊर्जा, पवनचक्की, जल ऊर्जा या माध्यमातून पारंपरिक ऊर्जा निर्मिती केली जाते. त्याचा वापर करता येईल ही ऊर्जा सर्वकाळ टिकून ठेवणारी आहे. आधुनिक आण्विक ऊर्जा ही मानवी समाजाच्या आरोग्याला घातक आहे. तसेच पर्यावरणातील सर्व घटकावरती दुर्गामी परिणाम करणारी आहे. त्यासाठी आण्विक ऊर्जा निर्मितीस विरोध करते त्याठिकाणी पारंपारिक ऊर्जा साधने वापरण्यात येतात. त्यामुळे जंगलतोड प्रमाण कमी होते. कोळसा खाण काम कमी होते. हवा, पाणी वायू प्रदूषणावरती नियंत्रण ठेवण्यात येते. परिणामी पर्यावरण संतुलित विकास केला जातो.

### ७) जमीन पाणी आणि जंगलाचे संवर्धन (Conservation of Land Water) :

पर्यावरणाच्या संरक्षणामध्ये जमीन पाणी आणि जंगलाचे संवर्धन करणे आवश्यक आहे. पर्याय विकासाच्या माध्यमातून पर्यावरण घटकाचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येते. त्यांच्या वापराच्या विषयाचे सुरक्षित व्यवस्था करण्यात येते. जमीन पाणी आणि जंगलाचे सुरक्षित ठेवण्यासाठी पर्याय साधनाचा वापर करुन जमीनीचा कस सुधारणे प्रदूर्षण रोखणे घन कचरा व्यवस्थापन त्याचा पूर्णप्रक्रिया करणे पाणी प्रदूर्षण विरोध सुरक्षित पिण्याचे पाणी निर्माण करणे. प्रदूषित पाण्याचे पुर्नवापर करणे जंगल तोड निर्बंध आणणे वृक्ष लागवड करणे त्यांचे संवर्धन करणे इत्यादी स्वरूपात पर्याय विकास भूमिका निर्माण करते.

### ८) परिस्थिती की समानता (Ecological Equality):

पर्याय विकासामध्ये परिस्थिती की समानता निर्माण केले जातात. पर्यावरणातील घटकांचा वापर अतिरिक्त प्रमाणात केले जातो. परिणामी असमानता निर्माण होते, समाजात विशिष्ट घटकाचे पर्यावरण घटकांवरती नियंत्रण असते ते घटक यांचा अधिक वापर करतात तर दुसऱ्या बाजूस समाजातील प्रभूत्वकारी लोक यांचा अतिरिक्त वापर करतात. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन संबंधी प्रश्न उपस्थित केले जातात. यातुन समाजात संसाधनाच्या अधिकारावरती

असमानता निर्माण केली जाते. ही असमानता गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, जाती-जमाती, कामगार-भांडवलदार वर्गीय विषमता अधिक अनुभवयास येते. ही असमानता रोखून समाजातील वंचित घटकांना या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी परिस्थितीकी समानता निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी पर्याय विकासाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात.

**१) परिस्थितीकी लोकशाही निर्मिती (Ecological Democracy Making) :** पर्याय विकासामध्ये प्रामुख्याने परिस्थितीकी लोकशाहीची निर्मिती करण्यात येते. या लोकशाहीमध्ये पर्यावरण आणि मानवी समाज यातील संबंध विकसित करण्यासाठी लोकशाही पद्धतीने निर्णय घेतले जातात. पर्यावरणाच्या संरक्षणासंबंधी धोरण निर्मितीमध्ये लोक सहभागातून धोरणाची निर्मिती केली जाते. त्यामुळे पर्यावरणाची संरक्षणाची जबाबदारी स्थानिक लोकांवरती येते. त्यानुसार त्यांना आपल्या उपजीविकेसाठी प्रयत्न करावे लागते. सद्यस्थितीत आधुनिक भांडवली उत्पादन पद्धती राज्य सरकारची धोरणे आणि पर्यावरणाविषयीचे कायदे यामधून पर्यावरण संबंधी प्रकल्पे, मोठी धरणे, आण्विक प्रकल, जंगल तोड, मोठे रस्ते, महामार्ग, विमानतळे, औद्योगिक उत्पादने, कचरा यांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे स्थानिक लोकांचे विस्थापन अधिक प्रमाणात होत आहे. यासाठी स्थानिक लोकांनी जनप्रतिरोध चळवळ उभारुन पर्याय विकासाचा उपयोग करण्यात सहभाग घेतला आहे. त्यामुळे पर्यावरण संतुलित धोरणाची अंमलबजावणी करणे महत्त्वपूर्ण राहते.

पर्याय विकास ही महत्त्वपूर्ण संकल्पना आहे जी पर्यावरण आणि मानव यातील संबंध सुरक्षित ठेवण्यासाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करते. त्यामुळे पर्यावरणाचा संतुलीत विकास करता येईल. ह्या पर्यावरणास अधिक सुरक्षित ठेवून मानवी विकास करता येईल. यासाठी पर्यायी व्यवस्थेची निर्मिती करण्यात येते. त्यामुळे जमीन, पाणी, हवा, वनस्पती, प्राणी, कीटके इतर घटकांचे संरक्षण करता येते. तसेच विकासात्मक आवश्यक पर्याय साधनाची निर्मिती केली जाते. त्यामुळे पर्यावरणाविषयीची व्यापक जाणीव ठेवून कार्य करण्यात येते. या संबंधी स्थानिक जनतेमधून एकात्मिक विकास करण्यात सहभाग महत्त्वपूर्ण आहे. तरच राज्यशासन धोरणे, भांडवली आक्रमणे आणि कायदे यांच्या आक्रमणात प्रतिरोध चळवळ निर्माण करुन धोरणात्मक पर्याय विकासाची अंमलबजावणी करण्यात येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) पर्याय विकासाचे महत्त्व सविस्तर विश्लेषण करा.

## ७.५ चिरंजीवी विकास (SUSTAINABLE DEVELOPMENT)

**प्रस्तावना (Introduction) :**

मानवी समाजाचा विकास अनेक शतकापासून सुरु आहे. त्यामुले विकासाची प्रक्रिया ही निसर्ग आणि मानव यांच्यातील संबंधामधून समजून घेता येते. या विकासाची सुरुवात उत्क्रांती प्रगती आणि विकास या परिवर्तनाच्या प्रक्रियेतून स्पष्ट होते. यामध्ये उपजीविका उत्पादन आणि समयोजनाचा समावेश होतो. हे होत असताना निसर्ग आणि मानव यामधील संबंधातील समतोलातून विकास समजून घेणे आवश्यक आहे. मानव आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गातील संसाधनाचा वापर करत असतात. त्यांचा पुढील पिढ्यांना वापर करता यावा असा दृष्टिकोन समोर येऊ लागला. यातून चिरंजीवी विकासाची संकल्पना समोर येऊ लागली. चिरंजीवी विकास संकल्पना ही मानवी विकासाची उद्दिष्ट पूर्तीचे संघटीत तत्व आहे. याबरोबर

सामाजिक आणि आर्थिक विकास अवलंबून आहे. यातून मानवी गरजा पूर्ण केल्या जातात. या करताना नैसर्गिक व्यवस्थेला स्थिरता आणि एकात्मतेला बाधा न पोहचता करणे आवश्यक आहे. त्यामुळे चिरंजीवी विकास हा विकास म्हणून स्वतःच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांसाठी गरजपूर्ती होईल या दृष्टिने पाहिले जाते.

सन १९८७ साली ब्रत्युटलॉनड अहवाल (Brundtland Report) यांनी आधुनिक चिरंजीवी विकासाची संकल्पना स्पष्ट करण्यात आली. ही संकल्पना एकविसाव्या शतकातील पर्यावरणाच्या संदर्भात चिरंजीवी वन व्यवस्थापनाच्या संबंधीत करण्यात आली. ही संकल्पना आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि पर्यावरण पुढच्या पिढ्यांच्या दृष्टीने समजुन घेण्यात येते. ही संकल्पना मानवी परिस्थितीकी व्यवस्थेचे समतोलाचे मानवी उद्दिष्टे पूर्ती करणे आहे. ही संकल्पना सखोल दृष्टिकोनाची प्रक्रिया आहे. ज्यातून समतोलाचा मुद्दा स्पष्ट होतो. या आधारे सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेचा पाया निर्धारित होतो. यावरती हवामानातील बदल आणि इतर आर्थिक विकास व्यापार व्यवस्था यांचा परिणाम होत असतो. यातून व्यवस्थापकीय चिरंजीवी विकास तत्व आणि व्यवहार स्पष्ट होतो.

चिरंजीवी विकास ही संकल्पना विस्तृत अर्थाने चिरंजीवी विकासाचे चिंरजीवी नेमके काय आहे. या प्रश्नासंबंधी चिकित्सात्मक विषय म्हणून स्पष्ट केले आहे. निसर्गातील साधन संपत्तीचे पूर्ण प्रक्रिया करुन त्यांचा वापर करण्यात येतो. हे औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत अधिक प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्तीचा कच्चा माल म्हणून वापर करण्यात येऊ लागला. त्यामुळे पर्यावरणातील जीवसृष्टी आणि नैसर्गिक साधन संपत्तीचा अधिक वापर करण्यात येऊ लागला. नैसर्गिक साधन संपत्तीचा विनास प्रदूषण आणि हवामानातील बदल यामुळे पर्यावरणाच्या समतोलाचा आणि संरक्षणाचा प्रश्न उपस्थित होऊ लागले. यामुळे हा निसर्गाचा विनाश आणि शोषण नियंत्रित आणण्यास चिरंजीवी विकासाची संकल्पना तत्व आणि व्यवहार यासंबंधी चर्चा करण्यात येऊ लागली.

चिरंजीवी संकल्पना ही निरतंर चाललेली उत्पादन प्रक्रिया जागतिक व्यवस्थापनाची प्रक्रियेचा व्यवहार आहे. निसर्ग आणि मानवी संसाधनाचा पुर्नवापर बरोबर समांतर मुल्याची निर्मिती ही निसर्गाचा समतोल न बिघडवता आणि विनाश न करत व्यवस्था निर्माण करणे आहे. चिरंजीवी विकास हा नैसर्गिक व्यवस्थेची काळजी सोबत सामाजिक आर्थिक आणि राजकीय आव्हानाना सामोरे जाण्यासाठी मानवतावादी चिरंजीवी विकास करणे आहे. पुढील पिढ्यांसाठी नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन संवर्धन आणि संरक्षण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे होय.

सतराव्या आणि अठराव्या शतकामध्ये युरोपमध्ये चिरंजीवी विकास संकल्पना ही चिरंजीवी वन व्यवस्थापन कल्पनेतून ही संकल्पना निर्माण झाली. इंग्लंड मधील लाकडाच्या साधनासंबंधी वाढीची जाणीव निर्माण झाली. सन १६६२ साली जॉन इवलीन (John Evelyn) यांनी Sylra या त्यांच्या निबंधामध्ये नैसर्गिक साधनाच्या आर्थिक शोषणाच्या विरोधात जनजागृतीवर लेख लिहिला. सन १७१३ साली Hans Carllron Carlowitz यांनी Sylvicutura Economic यांनी Saxony या पुस्तकामध्ये वनांच्या संबंधी लेखन केले आहे. या कार्याचा परिणाम वनक्षेत्राच्या नियोजनासंबंधी कार्य करण्यात आली. Gifford Pinchof यांनी US Foreset Service संबंधीत वनक्षेत्र व्यवस्थापना संबंधी संसाधन वापराबाबत करण्यात आली. सन १९६० साली Aldo Lepold यांनी जमीन नैतिकता संकल्पनेतून पर्यावरण चळवळीची निर्मिती केली.

सन १९६२ साली Rechel Carson's यांनी Silent Spring या पुस्तकामध्ये पर्यावरणाच्या ऱ्हास विकास आणि आर्थिक विकासाशी संबंध जोडण्यात आला. सन १९६६ साली Kenneth E. Boulding यांनी The Economics of the coming Spaceship Earth या निबंधामध्ये मर्यादित नैसर्गिक साधन संपत्तीच्या आधारे परिस्थितीकी आणि अर्थव्यवस्थेवरच संबंध जोडण्यात आला आहे. यामधून पर्यावरणाच्या संबंधित प्रश्नावर

सन १९७३ साली युनायटेड नेशन काँग्रेस यांच्या ???? कॉन्फरस मध्ये भविष्यकाळासाठी विकासासाठी वाढ आणि त्यांची अंमलबजावणी यासंबंधी चर्चा करण्यात आली. याविषयीची पहिला भूमिका स्पष्ट केली. जॉव्ह डीनेग्ल यांच्या अध्यक्षतेखाली. विल्यम फल्यांन मर्टिन, डेव्हिड, डॉडसेन ग्रे आणि एलिझाबेथ ग्रे यांनी याच्या भूमिका निर्मिती मध्ये योगदान दिले आहे.

सन १९८० साली International Union for Conservation of Nature यांनी जागतिक संपत्ती म्हणून चिरंजीवी विकास ही सर्वप्रथम संवर्धनाची धोरण म्हणून स्पष्ट करण्यात आले आणि चिरंजीवी विकासाची संकल्पनेची ओळख करुन दिली. United Nations World Charter for Nature यांनी संवर्धन पाच तत्व विकसित करण्यात आले जी मानवाने निसर्गाचे संवर्धनाचे पालन करावे हे सांगण्यात आले. सन १९८७ साली युनायटेड नेशन ने Our Common Future या अहवालामध्ये World Commission on Environment and Development याला Brundtland Report असे संबोधले जाते. हा अहवाल चिरंजीवी विकासाची व्याख्या केली. United Nation Charter यांनी चिरंजीवी विकासाच्या संकल्पनेविषयी आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि पर्यावरण संरक्षण या संबंधित अर्थ जोडण्यात आला आहे. युनायटेड नेशन यांच्या सहयोगाने जमीन विकास आणि शिक्षण, आरोग्य आणि जीवन जगण्याच्या प्रश्नासंबंधी विस्तृत मांडणी करण्यात आली.

सन २०१३ च्या चिरंजीवी विकास अहवालामध्ये परिस्थितीकी आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक घटकाशी परस्पर संबंधित पैलूचा संबंध स्पष्ट केला आहे. Education for sustainable Development यांच्या मते शिक्षण हे कौशल्य, मूल्य आणि दृष्टिकोनाचे ज्ञान हे चिरंजीवी विकास समांतर समाज अधिक निर्माण करता येईल याचा उद्देश चिरंजीवी विकास पर्यावरण पैलूशी सामाजिक आर्थिक आणि पर्यावरणाचा संबंध समतोल आणि एकात्मिक दृष्टिकोनाशी जोडण्यात आले. यामुळे चिरंजीवी विकास मानवी समाजाच्या विकासासाठी उपयोगी ठरते.

## ७.६ चिरंजीवी विकासाची व्याख्या (DEFINITION OF SUSTAINABLE DEVELOPMENT)

**ब्रयुन्डेटलानड रिपोर्ट (Brundtland Report) :**

"चिरंजीवी विकास हा असा विकास आहे जो भविष्यातील पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी कोणतीही तडजोड न करता सद्य गरजा पूर्ण करतो."

**इंसायक्लोपिडीया ऑफ इकॉलॉजी (Encyclopedia of Ecology) :**

"भविष्यातील पिढ्यांना त्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता कोणतीही तडजोड न करता सध्याच्या गरजा भागवणारा विकास म्हणजे चिरंजीवी विकास होय."

चिरंजीवी विकास ही व्यापक विकासाची संकल्पना आहे. ज्यामध्ये निसर्ग आणि मानव यांच्यातील संबंधामध्ये समतोल साधण्यात येतो. त्यामुळे पर्यावरणाच्या विनाषाच्या समस्या निर्माण केला जात नाही. मानवी संबंधामध्ये स्थिरता निर्माण करतात. त्यामुळे पुढील पिढ्यांना त्यांच्या गरजा पूर्ण करता येईल आणि विकास साध्य करता येईल.

## ७.७ चिरंजीवी विकासाची वैशिष्ट्ये (CHARACTERISTICS OF SUSTAINABLE DEVELOPMENT)

### १) नैसर्गिक साधनसंपत्ती संवर्धन (Preserve Natural Resources) :

मानव आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग केला जातो. ही भूमी हवा आणि पाणी यांचा नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर म्हणून करतात. ह्याचा अतिरिक्त वापर केला असता नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होईल. त्यामुळे निसर्गाचा समतोल साधला जाणार नाही. परिणामी भविष्यातील पिढ्यांना नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करता येणार नाही. त्यामुळे नैसर्गिक साधनाचे संवर्धन करणे महत्त्वाचे मानले जाते. तरच जैवविविधात आणि मानवी समाजाचे संवर्धन करता येईल.

### २) जागतिक तापमान वाढ कमी करणे (Reduce Global Warming):

जागतिक स्तरावरती हवामानातील बदलाचा परिणाम जाणवू लागला आहे. या तापमानामध्ये वाढ होताना पाहण्यास मिळते कारण हवेतील ओझनचा स्थर कमी होत आहे. ह्या स्थरावर वायू प्रदूषणाचा परिणाम अधिक दिसून येतो. हवेत कार्बनडाय ऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे. हे औद्योगिकरणाच्या माध्यमातून वायू प्रदूषण प्रमाण अधिक होत आहे. त्यामुळे ओझनचा स्थर नष्ट होत आहे. परिणाम तापमान वाढ, महापूर, भूकंप आणि वादळे हिमवर्षाव, नैसर्गिक आपत्तीचे प्रमाण वाढत आहे. म्हणून नैसर्गिक तापमान वाढ कमी करणे आवश्यक आहे.

### ३) पर्यावरण मैत्री रचना व्यवहार (Eco-friendly Building) :

निसर्ग आणि मानव यांच्यामध्ये समतोल राखावयाचा असेल तर पर्यावरणाशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण केले पाहिजे. यामध्ये पर्यावरणाचा संवर्धन, संरक्षण आणि समतोल ठेवण्यासाठीचा प्रयत्न केला जातो तसेच जैवविविधा टिकवण्यासाठी नैसर्गिक पर्यावरणाशी योग्य वर्तन करणे आवश्यक आहे. तो आपल्या जीवनाचा भास मानणे आवश्यक आहे. पर्यावरणाला हाणी पोहोचेल असे कोणतेही वर्तन करु नये तरच चिरंजीवी विकास साध्य करता येईल.

### ४) पाण्याच्या साधनाचे पुर्नवापर करणे (Use of Renewable Resources of Water) :

नैसर्गिक साधनामध्ये पाण्याच्या महत्त्वपूर्ण समावेश केला जातो. पाण्याचा वापर करुन आपल्या मुलभूत गरजा पूर्ण केल्या जातात. त्यामुळे पाणी हा मानवी मुलभूत अधिकार मानला जातो. पण सद्यस्थितीमध्ये नैसर्गिक पाणी स्त्रोताचे अधिक प्रमाणात गैर वापर केला जातो. औद्योगिकरणातून निर्माण झालेले प्रदूषण याचा पाण्याच्या दूषिती करणावरती अधिक परिणाम होत आहे तेव्हा या पाण्यावरती पुर्नवापराची प्रक्रिया करणे आवश्यक आहे त्यासाठी नवीन प्रक्रिया उद्योग उभारण्यात येत आहेत.

**५) सर्व प्रकारचे प्रदूषण कमी करणे (All Types of Pollution should be Minimized):**

चिरंजीवी विकास साध्य करण्यासाठी सर्व प्रकारचे प्रदूषण कमी करणे आवश्यक आहे. औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून नवीन उद्योगाची निर्मिती करण्यात येत आहे. यामधून सर्व प्रकारचे प्रदूषण केले जाते. परिणामी नैसर्गिक वातावरणाचा समतोल बिघडला जातो. निसर्ग आणि मानवी समाज यांना अनेक समस्येना सामोरे जावे लागते. त्यामुळे सर्व प्रकारचे प्रदूषण कमी करणे हे चिरंजीवी विकासामध्ये महत्त्वाचे समजले जाते.

**६) नैसर्गिक साधनसंपत्तीचा जाणीवपूर्वक वापर (Sensible use of Natural Resources) :**

चिरंजीवी विकास हा नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जाणीवपूर्वक वापराचे अवलंबन आहे. निसर्ग आणि मानवी समाजातील संबंध समतोल व सुरक्षित ठेवायचे असतील तर नैसर्गिक साधन संपत्तीचा जाणीवपूर्वक वापर करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपल्या पिढीतील लोकांनी नैसर्गिक संपत्तीचा अतिरिक्त वापर करुन नैसर्गिक साधन संपत्तीचा विनाश न करता पुढील पिढ्यांना कसा कमी होईल, या दृष्टीने जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. ही जाणीव निर्माण करण्याचे कार्य चिरंजीवी विकासातून साध्य करता येते.

**७) सौर ऊर्जा पवन ऊर्जा निर्मिती भर (Emphasis on Energy Source on Solar and Wind) :**

चिरंजीवी विकासामध्ये पारंपरिक ऊर्जा साधनामध्ये सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीसाठी भर दिला जातो. नैसर्गिक रित्या सुर्यप्रकाश आणि हवा याची सहजरित्या उपलब्ध होतो. साधनामधून सहजरित्या ऊर्जा निर्मिती करणे सुलभ होते. त्यामुळे या ऊर्जा साधनाचा सर्व ठिकाणी उपलब्ध करण्यात येते. त्यामुळे सर्वांना याचा उपयोग करणे शक्य होते. दूसरे या पासून निर्माण केली जाणारी ऊर्जा ही प्रदूषण विरहित असल्याने तिचा वापर करणे शक्य आहे. त्यामुळे ही ऊर्जा पर्यावरण संवर्धन, जतन आणि सुरक्षित करण्यासाठी उपयोगी आहे. तसेच त्यांचे पुर्ननिर्मितीकरण करणे शक्य होते त्यामुळे ही ऊर्जा चिरंजीवी विकासामध्ये महत्त्वाची आहे.

**८) नैसर्गिक वातावरणाचे संरक्षण (Protection of Natural Habitant):**

नैसर्गिक वातावरणामध्ये मानव आपले जीवन जगत असतो. तो आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक साधनांचा वापर करत असतो. पण केवळ आपल्या हव्यासापाई नैसर्गिक साधन संपत्तीचा अपेक्षे पेक्षा जास्त वापर करण्यात येतो. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला जातो. त्याचा परिणाम दुष्काळ, महापूर, भूकंप, ज्वालामुखी, आपत्ती प्रमाण वाढ होते आणि मानवी जनजीवन विस्कळित होते. या सर्व परिस्थितीचा विचार करता नैसर्गिक वातावरणाचे संरक्षण करणे महत्त्वाची बाब म्हणून समोर येते. या माध्यमातून चिरंजीवी विकास साध्य करणे आवश्यक आहे.

चिरंजीवी विकासाची संकल्पना व्यापक अर्थाने समजून घेता येते. ही निसर्ग आणि मानव यांच्यातील समतोलाची व्यवस्था निर्माण करते. नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर कसा करावा? किती प्रमाणात करावा? त्याचे संवर्धन जतन आणि सुरक्षितता कशी ठेवता येईल? या अनुषंगाने ही संकल्पनात्मक विश्लेषण समजुन घेता येते. निसर्गाच्या साधन संपत्तीचा योग्य प्रमाणात वापर करण्याबरोबरच त्याचे पुर्ननिर्मितीकरण करणे आवश्यक आहे. केवळ नैसर्गिक संपत्तीचा वापर

करुन चालणार नाही. तर त्याचा अतिरेक होणारा वापर टाळला पाहिजे. तरच नैसर्गिक संपत्तीचा विनाश टळेल. त्यामुळे दुष्काळ, भूकंप, अतिवृष्टी, हिमवर्षाव महापूर, हवा प्रदूषण इत्यादी अनेक समस्या टाळता येईल. तसेच निसर्ग आणि मानवी समाजाचे संरक्षण आणि हितसंबंध जपता येतील.

**आपली प्रगती तपासा :**

१) चिरंजीवी विकासाची व्याख्या सांगा.

२) चिरंजीवी विकासाची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

## ७.८ चिरंजीवी विकासाचे महत्त्व (IMPORTANCY OF SUSTAINABLE DEVELOPMENT)

चिरंजीवी विकास हा मानवी समाजाच्या सर्वांगीण विकास धोरण म्हणून समजून घेता येते. निसर्ग आणि मानव यांच्यातील संबंध हा समतोल संवर्धन आणि सुरक्षिततेच्या आधारे साधता येतो. ह्यासाठी योग्य धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. तरच ह्या संकल्पनेला महत्त्व प्राप्त होऊ शकेल. ह्याचे लोककल्याण आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्व आहे.

### १) साधन संपत्तीचा योग्य वापर (Proper use of Means and Resources):

चिरंजीवी विकास हा मानवी समाजाला साधन संपत्तीचा योग्य वापर कसा करावा याचे मार्गदर्शन करतो. यामध्ये भूमी, पाणी आणि हवा या नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर किती, कसा करावा याविषयी माहिती देते. पिण्याचे पाणी, औषधी, खते, रसायने, कीटकनाशके, वन उत्पादन याविषयीची वापरा विषयी चर्चा करते. मानवी गरजा पूर्ण करत असताना कमीत कमी साधनांचा वापर करुन अधिक उत्पादन कसे करता येईल याची पद्धती विकसित केली जाते. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीचे अतिरिक्त वापर टाळता येते.

### २) सकारात्मक दृष्टिकोनाचा विकास (Development of Positive Attitude)

चिरंजीवी विकास हा मानवी समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोनाचा विकास करते, हा दृष्टिकोन निसर्ग आणि मानव यांच्या संबंधातील समतोल, संवर्धन आणि सुरक्षितेचे वातावरण निर्माण करत असतात. या दृष्टिने सकारात्मक ज्ञान दृष्टिकोन आणि कौशल्याची निर्मिती चिरंजीवी विकासाच्या माध्यमातून केली जाते. हा दृष्टिकोन नैसर्गिक संपत्ती ही सार्वजनिक संपत्ती आहे. यामध्ये जमीन, जंगल, पाणी, जैवविविधता ही व्यक्तिगत नसून सामुदायिक संपत्ती आहे. असा मानणारा दृष्टिकोन सकारात्मक पातळीवरती चिरंजीवी विकास निर्माण करतो.

### ३) मुलभूत घटकांचा विकास (Development of Fundamental Part) :

चिरंजीवी विकास हा केवळ नैसर्गिक संपत्तीच्या संवर्धनाविषयी चर्चा करत नाहीत तर मानवी समाजाच्या मुलभूत शिक्षण आरोग्य शेती पर्यटन आणि मानवी समाजाच्या सुधारणेसाठीच्या घटकांचा समावेश करतात. या घटकांचा विकास करताना पर्यावरणाचे संवर्धन आणि एकात्मिक विकासमार्ग यानुसार अधिक प्रगतशील विकास साधण्याचे कार्य केले जाते. ज्यामुळे निसर्ग आणि मानवी संबंधाचा सकारात्मक विकास साधण्यास मदत होते म्हणून चिरंजीवी विकास हा मुलभूत घटकांचा विकास करते त्यामुळे मानवी समाजाचे कल्याण साधता येते.

**४) लोक सहभाग आधारित विकास (Development based on People's Participation) :**

चिरंजीवी विकास हा लोक सहभाग आधारित विकास आहे. लोक सहभागाशिवाय चिरंजीवी विकासाचे उद्दिष्ट साध्य करता येणे अशक्य आहे. स्थानिक लोकांमध्ये पर्यावरन, संवर्धन आणि विकासा संबंधीची आपलेपणाची जाणीव निर्माण करण्यातून विकास साध्य करता येतो. यामधून एकात्मता निर्माण करण्यात येते त्यामुळे पर्यावरणाच्या संवर्धनामध्ये सामुदायिक कार्यपद्धती विकसित करण्यात येते. परिणामी विकासात्मक उपेक्षित बदल साध्य करता येतो.

**५) विकासाला मर्यादा (Limitation of Development):**

चिरंजीवी विकास हा मानवी समाजाचा अविरत विकास साध्य करण्यासाठी आहे. असे असले तरी या विकासाला मर्यादा निर्माण करतात. कारण मानवाच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी विकासाची आवश्यकता आहे. पण या गरजा मर्यादित ठेवून विकास करणे गरजेचे आहे. त्यासाठी मूलभूत गरजा पूर्ण झाल्यानंतर समाधानाची जाणीव असणे आवश्यक आहे. अधिकचा हव्यास ठेवणे विकास अडथळा निर्माण करु शकते त्यामुळे एका मर्यादेनंतर विकासाला मर्यादा येते.

**६) दीर्घकालीन विकास (Long Lasting Development) :**

चिरंजीवी विकास ही दीर्घकाळ चालणारा विकास आहे. त्याचे मुख्य उद्दिष्ट हे सामाजिक आणि आर्थिक विकास साध्य करणे आहे. हे साध्य करत असताना नैसर्गिक साधन संपत्तीला इजा न पोहचवता त्याचा विनाश न करता त्यांचा योग्य त्या प्रमाणात वापर करणे आवश्यक आहे. हे करत असताना पर्यावरण आणि मानव यांच्यातील आपलेपणाचे संबंध विकसित होणे आवश्यक आहे. ज्यामुळे भविष्यातील पिढ्यांना याचा उपयोग करता येईल. या दृष्टिने दीर्घकालीन विकासाची प्रक्रिया चालू राहते.

**७) जैव विविधतेचे संवर्धन (Conservation of Ecological Diversifice) :**

चिरंजीवी विकास साध्य करत असताना जैवविविधता संवर्धन करणे महत्त्वाचे मानले जाते. निसर्गात हा वनस्पती, पक्षी, प्राणी, किटक, पाणी स्त्रोत इत्यादी मधून जैवविविधता पाहण्यास मिळते. ही विविधता अधिक दीर्घकाळ टिकली पाहिजे यासाठी चिरंजीवी विकस प्रयत्न करत असतो. नैसर्गिक पर्यावरण दीर्घकाळ टिकायचे असेल तर जैवविविधतेचे संवर्धन करणे आवश्यक आहे. तरच पर्यावरणाचे संवर्धन आणि सुरक्षितता साध्य करता येते.

**८) प्रदूर्षण नियंत्रण (Pollution Control):**

चिरंजीवी विकास हा प्रदूर्षण विरहित साध्य करता येतो. हे प्रदूर्षण हवा भूमी आणि पाणी प्रदूषणातून दिसून येते. मानवाने आपल्या हव्यासापाई नैसर्गिक साधन संपत्तीचा अधिक प्रमाणात वापर करण्यात येतो. त्यामुळे औद्योगिक कचरा, सांडपाणी, दूषित औषधे, धूर, कारखान्यातील दूषित वायू गळती, घनकचरा, प्लास्टिक इत्यादी मधून प्रदूषण अधिक प्रमाणात होत आहे. परिणामी मानवी जीवनावरती याचा परिणाम होतो. यातून होणारा विनाश रोखायचा असेल तर प्रदूषण नियंत्रण करणे आवश्यक आहे. यासाठी चिरंजीवी विकासाच्या दृष्टिकोनाची व्यवहारात अंमलबजावणी करावी लागेल.

चिरंजीवी विकास हा मानवी समाजाच्या कल्याणासाठी महत्त्वाचा मानला जातो. हा दृष्टिकोन पर्यावरण आणि मानवी समाजाच्या विकास संवर्धन आणि सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. समाजाला दीर्घकालीन भविष्यात विकास साध्य करावयाचा असेल तर चिरंजीवी विकासाच्या दृष्टीने वाटचाल करणे महत्त्वाचे म्हणून समजले जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१) चिरंजीवी विकासाचे महत्त्व सविस्तर लिहा.

## ७.९ पर्यावरणपूरक शेती (ECO-FRIENDLY FARMING)

**प्रस्तावना :**

सद्यस्थितीमध्ये जागतिक स्तरावरती पर्यावरणपूरक शेतीची संकल्पना अधिक महत्त्वाची म्हणून चर्चा होत आहे. या संकल्पनेची आवश्यकता आहे. ही संकल्पना शेती विकासाचे तंत्राची निर्मिती करते की जी सामाजिक आर्थिक, उत्पादन आणि पर्यावरण या दृष्टिकोनातून समजून घेता येते. या पुढील काळामध्ये अपेक्षित अन्नधान्य निर्मिती संबंधी आहे. आधुनिक पद्धती शेती उत्पादन ही चिरंजीवी उत्पादन पद्धती नसल्याचे दिसून येते. त्यामुळे शेती करणाऱ्या समाजाला दीर्घकालीन चिरंजीवी विकास असणारा शेती करणे अपेक्षित आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पर्यावरणपूरक शेतीची संकल्पना स्विकारण्यात आली. त्यातुन पर्यावरणाचा समतोल राखून शेतीची उत्पादन पूर्ण उत्पादन प्रक्रिया करता येऊ शकते. या संबंधीचा विचार आणि व्यवहार करण्यात येतो.

पर्यावरणपूरक शेतीची संकल्पना स्पष्ट करताना FAO म्हणतात की पर्यावरणपूरक शेती ही नैसर्गिक साधन व्यवस्थापन आणि संवर्धन संबंधीत आहे. सद्य आणि भविष्यकाळातील मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी सातत्याचे समाधान आणि संलग्नतेची शाश्वती हमी देण्यासाठी तंत्रज्ञान आणि संस्थात्मक स्थरावरती परिवर्तन करणे अपेक्षित आहेत. या माध्यमातून शेती, वने, मासेमारी क्षेत्र, जमीन संवर्धन, पाणी, वृक्ष लागवड आणि प्राण्याच्या वंश जपणूक इत्यादींचा समावेश करण्यात येतो. ह्याचे पर्यावरणाचा नाश, तंत्रज्ञान पूरक, सामाजिक आर्थिक मुल्याच्या आधारे स्विकारण्यात येते.

सन १९६० आणि १९७० च्या दशकामध्ये पर्यावरण पूरक शेतीच्या संकल्पनेविषयी चर्चा करण्यात येऊ लागली. ही एक स्वतंत्र चळवळ होती. ज्यावेळी जमीन विनाश, औषधे कीटक नाशकाचा अधिक वापर, जमीनीतील पाणी पातळी खालवणे या सारख्या समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे शेतीचा संबंध हा पर्यावरणाशी जोडण्यात आल्याची जाणीव अधिक स्पष्ट झाली. तेव्हा पर्यावरण पूरक शेती कशाप्रकारे करता येईल याविषयीची चर्चा करण्यात आली यातून पर्यावरणाचा समतोल राखून शेती करण्याचे प्रयोग करण्यात येऊ लागले.

पर्यावरण पूरक शेती ही संकल्पना शाश्वत विकासाच्या संबंधीत उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करतात. पण पर्यावरणपूरक शेती सेंद्रीय शेती असू शकत नाही. पर्यावरणपूरक शेती ही पर्यावरण व्यवस्थेची संबंधीत भूमी संवर्धन पाणी, कार्बन वायू नियंत्रक आणि जैवविविधते मध्ये वाढ करणे इत्यादी संबंधीत आहे. यातील जमीन कसण्याच्या पद्धती आणि पिक पद्धती या वेगळ्या प्रकारे वापरण्यात येते. ही शेती पद्धती परिस्थितीकी शाश्वत विकासास मदत करतात. या शेतीचा मुख्य उद्देश हा शाश्वत जमीन व्यवस्थापन आहे. खाद्य, अन्ननिर्मिती आणि शेती धान्य उत्पादन करत असताना जैवविविधतेची जपणूक करणे यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. या शेतीमध्ये

जमीन आणि वृक्षारोपण विषय काळजी घेतली जाते. त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन आणि सुरक्षितता राखली जाते.

## ७.१० पर्यावरणपूरक शेती व्याख्या (DEFINITION OF ECO-FRIENDLY FARMING)

FAO यांच्या मते, "पर्यावरणपूरक शेती ही नैसर्गिक साधनाचे व्यवस्थापन आणि संवर्धन संबंधीत आहे. ही सद्य परिस्थितीत आणि भविष्यकालीन मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी सातत्याने समाधान आणि संलग्नतेची शाश्वती देण्यासाठी तंत्रज्ञान आणि संस्थात्मक स्तरावरती परिवर्तन करणे आवश्यक आहे. या संबंधीची प्रक्रिया पद्धती म्हणजे पर्यावरण पूरक शेती होय."

आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी शेती ही पर्यावरणपूरक पद्धतीने केली जाते. या शेती पद्धतीमध्ये पर्यावरणाच्या संवर्धनात्मक विकास साध्य होय. ज्यामध्ये स्थानिक शेतकरी यांचा संवर्धनाच्या विकासात महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळे जैवविविध टिकवून ठेवण्यास प्रयत्न करतात. यामध्ये जमीन संवर्धन, पाणी व्यवस्थापन, पिक पद्धती, सेंद्रिय खतांचा वापर, अन्न उत्पादन, स्थानिक पर्यावरणाच्या आधारित पिक पद्धत विकसित करणे, कमीत कमी शेती उत्पादन खर्च त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक स्थिती उंचावण्यास प्रयत्न करणे, मानवी आरोग्याला पोषक असे अन्न धान्याची उत्पादन प्रक्रिया विकसित करण्याचे कार्य केले जाते. त्यामुळे विकासाची प्रक्रिया गतीशील करता येते.

## ७.११ पर्यावरणपूरक शेतीची वैशिष्ट्ये (CHARACTERISTICS OF ECO-FRIENDLY FARMING)

आधुनिक जीवन पद्धती मध्ये पर्यावरणपूरक शेतीची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे शाश्वत स्वरूपाची शेती उत्पादन पद्धती विकसित करण्यात येते. तसेच पर्यावरणाचे संवर्धन समतोल आणि सुरक्षित स्वरूपात केली जाते. त्यामुळे जमीन पाणी हवा आणि जैवविविधता यांचा समतोल ठेवण्यात येतो.

### १) जमीन संधारण (Land Conservation) :

पर्यावरण पूरक शेती मध्ये जमीन संधारण करणे महत्त्वाचे समजले जाते. शेती करण्यासाठी जमीनीचे संवर्धन करणे आवश्यक आहे. यासाठी जमीनीची घसरण थांबवणे आवश्यक आहे. जमीनीची कस टिकवणे आवश्यक आहे त्यामुळे जमीन अधिक उपजाऊ निर्माण होईल. एक सारखी पिक पद्धती कमी पाण्याचा वापर, मशागत औषधी रासायनिक खते यांची वापर कमी करणे आवश्यक आहे. तरच जमीनीची उत्पादन क्षमता वाढत जाईल.

### २) पाण्याची गुणवत्ता (Water Quality) :

शेती उत्पादनास पाण्याची आवश्यकता अधिक प्रमाणात महत्त्वाची आहे. पाण्याचा योग्य वापर करुन शेती उत्पादन केले जाते. पिकांना आवश्यक असेल तेवढेच पाणी वापरण्याच्या पद्धती विकसित करण्यात येतात. त्यामुळे पिक आणि पाणी व्यवस्थापन गुणवत्ता टिकवण्यास मदत होईल. यासाठी पृष्ठभागावरील आणि जमीनी खालील पाण्याची गुणवत्ता तपासणे आवश्यक आहे. उपलब्ध पाणी साठ्याच्या आधारे पाण्याचे नियोजन केले जाते. विशेषतः शेती उत्पादन आणि पशुपालन संबंधीत पाण्याची गुणवत्ता निगडीत आहे.

### ३) वायु गुणवत्ता (Air Quality) :

पर्यावरण पूरक शेती करत असताना हवा दूषित करणारी पिक पद्धत वाढवण्यावरती नियंत्रण ठेवण्यात येते. यासाठी पिक पद्धतीमध्ये बदल करण्यात येते. ग्रीनहॉऊस मधील पिक पद्धतीची वापर करणे बंद करणे आवश्यक आहे. त्यामुळे हवेची गुणवत्ता नष्ट करण्यास अमोनिया वायू आणि ग्रीनहॉऊस वायु यांचे प्रमाण अधिक वाढत आहेत आणि इतर ३०% वायू हा पर्यावरणास घातक आहे. त्यामुळे अशा प्रकारची शेती करणे आवश्यक आहे. पर्यावरणास घातक आहे त्यामुळे पर्यावरणपूरक शेती केली जाते.

### ४) जैवविविधता (Biodiversity) :

पर्यावरण पुरक शेती ही जैवविविधतेची जपवणूक आणि संवर्धन करण्याचे काम करते. ही जैवविविधता प्राणी, पक्षी, वनस्पती कीटके इतर घटक या संबंधीत आहे. त्यांची जपणूक करणे आवश्यक आहे. त्यामुळे परिस्थितीकी वातावरणात त्याचे स्वतंत्र अस्तित्व टिकवता येईल. अशा प्रकारची पर्यावरणपूरक शेतीचे नियोजन करण्यात येते त्यामुळे शेती उत्पादनामध्ये वाढ करता येते.

### ५) अन्न सुरक्षा (Food Safety):

पर्यावरण पूरक शेतीमध्ये अन्न सुरक्षा महत्त्वाची मानली जाते. मानवाला आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी अन्न निर्मिती केली जाते. अन्न धान्याच्या चांगल्या प्रतिचे, गुणवत्तेचे उत्पादन करण्यात येते. ही उत्पादने पर्यावरणास हाणी न पोहचवणारी केली जाते. त्यामुळे अपेक्षित असणारा अन्न पुरवठा करणे सोपे जाते. त्यामुळे पर्यावरणाचा नाश होणार नाही अशा प्रकारचे अन्न धान्य निर्मिती करण्यात येते.

### ६) पशुपालन (Animal Husbandry) :

पर्यावरण पूरक शेती करत असताना पशुपालन केले जाते. त्यामुळे शेतीस पुरक असा जोड व्यवसाय निर्माण करता येतो. त्यापासून सेंद्रिय खत निर्मिती प्रकल्पास मदत होते. तसेच दुग्ध व्यवसायाची निर्मिती करता येते. त्यातून जैविक उत्पादन निर्मिती साधन निर्माण केले जाते. पर्यावरणास पोषक असे पशुपालनाचा व्यवसाय करण्यात येतो.

### ७) सामाजिक आर्थिक विकास (Socio-Economic Development) :

पर्यावरण पूरक शेती करण्यातून सामाजिक आर्थिक विकास साध्य करता येतो. शेतकऱ्याला पर्यावरण पूरक शेती करण्यातून कमी गुंतवणूकी मधून अधिक उत्पादन आणि नफा मिळवून देणारी आहे. शेतीसाठी आवश्यक असणारी बी-बियाणे, सेंद्रिय खते, कीटकनाशक आणि इतर साधने यांची निर्मिती करताना दर्जेदार आणि कमी खर्चात निर्मिती केली जाते. यातून निर्माण झालेल्या उत्पन्नाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक नफा मिळवून देण्याची संधी अधिक आहे. या शेती प्रकारामुळे शेतकऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक दर्जा उंचावण्यास मदत होते.

वरील सर्व मुद्यांचा विचार करता शेतकऱ्यांना पर्यावरण पूरक शेती व्यवसाय अधिक फायदेशीर राहू शकतो. हे त्यांच्या वैशिष्ट्येतून स्पष्ट होतो. ही शेती करत असताना कोणत्याही प्रकारचा

पर्यावरणाला धोका पोहोचणार नाही अशाप्रकारे शेती केली जाते. त्यामुळे विकासाची प्रक्रिया अधिक सक्षम स्वरुपात करता येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) पर्यावरण पूरक शेतीची व्याख्या लिहा.

२) पर्यावरण पूरक शेतीची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

## ७.१२ पर्यावरण पूरक शेतीचे महत्त्व (IMPORTANCY OF ECO-FRIENDLY FARMING)

जागतिक स्तरावरती पर्यावरणामध्ये अनेक बदल होत आहे. त्याचा परिणाम मानवी समाजावरती होताना पाहण्यास मिळते. त्यांच्याशी संलग्न शेती व्यवसाय निगडीत आहे. यातून मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी शेती उत्पादनाची आवश्यकता आहे. यातून अन्नधान्याच्या आणि जीवन उपयोगी साधनाची निर्मिती केली जाते ते करत असताना पर्यावरणास हानीकारक परिस्थिती टाळून त्या ठिकाणी पर्यावरणाचा समतोल संवर्धन आणि सुरक्षा करणे आवश्यक आहे. त्यामुळे पर्यावरण पूरक शेतीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

### १) जैवविविधता संवर्धन (Conserving Bio-diversity) :

पर्यावरण पूरक शेती ही जैवविविधतेच्या संवर्धनास महत्त्व देते. जैवविविधता ही आपल्या परिसरातील प्राणी, पक्षी, वनस्पती, किटक, जीवजंतू इत्यादी स्वरूपामध्ये पाहण्यास मिळते. तिच्या अनेक उपजाती, प्रजाती काळाच्या ओघात नष्ट होत आहे. मानवाने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी निसर्गातील जैवविविधतेवरती आक्रमण केले आहे. परिणामी तिची जपणूक करण्याच्या संदर्भातून पर्यावरण पूरक शेती करण्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

### २) शेती उत्पादनात वाढ (Enhancing Agricultural Production) :

पर्यावरण पूरक शेतीचा मुख्य उद्देश शेती उत्पादनामध्ये वाढ करण्यात येते. ह्या प्रकारच्या कमी प्रमाणात गुंतवणूकीमधून अधिक उत्पादन करण्याचे पारंपरिक उत्पादन पद्धती निर्माण करतात. बियाणांची निर्मिती कीटकनाशक कमी वापर सेंद्रिय खते बॉयमास उत्पादन पारंपरिक मशागत तंत्र इत्यादीचा वापर करुन शेती उत्पादनात वाढ करण्यात येते. त्याचा वाईट परिणाम पर्यावरणावरती होत नाही. त्यामुळे शेती उत्पादन अधिक प्रमाणात करण्यात येते.

### ३) उदरनिर्वाह सुधारणा (Improving Livelihood) :

पर्यावरण पूरक शेती ही उदरनिर्वाह सुधारणा करण्यातून महत्त्व समजून येते. या प्रकारची शेती करण्याचा उद्देश हा पर्यावरणाचा समतोल आणि मानवी जीवनमानामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. या शेती प्रकारातून शेतकऱ्यांना कमी गुंतवणूकीमधून अधिक उत्पादनाचा नफा मिळवण्यास प्रयत्न केला जातो. त्यामुळे शेतीतुन निर्माण झालेली उत्पादनाना बाजारामध्ये मागणी करण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या गरजा पूर्ण करुन त्याचे उत्पादनाची विक्रीतून नफा मिळतो त्यामुळे शेतकऱ्याचा उदरनिर्वाह सुधारणा होते.

### ४) शेतकऱ्यांचा सहभाग (Farmers Participation) :

पर्यावरण पूरक शेतीमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग महत्त्वाचा सहभाग मानला जातो. या प्रकारच्या शेतीमध्ये शेतकरी स्वतःहून सहभागी होतो. त्यामुळे जैवविविधता टिकविण्यासाठी मदत होते. तसेच जमीन संवर्धनाचे कार्यात सहभागी होतो. याचसोबत उत्पादन किंमत, स्थिरतत्त्व निर्मिती आणि उत्पादनाची गुणवत्ता सुधारणा करणे इत्यादी कार्यामध्ये शेतकऱ्याचा सहभाग निर्माण केला जातो. त्यामुळे या शेती प्रकाराला महत्त्व प्राप्त झाले आहे.

### ५) अन्नधान्य गुणवत्ता वाढ (Increased Food Quality):

पर्यावरण पूरक शेती करताना अन्नधान्य गुणवत्ता वाढ करणे हे महत्त्वाचे मानले जाते. शेतीमध्ये अन्नधान्य निर्माण करण्यासाठी संकरित बियाणे, कीटकनाशके, औषधे, अधिकचे यांत्रिकीकरण यांचा वापराला विरोध करण्यात येतो. साध्या पद्धतीने शेती बि-बियाणे निर्मिती सेंद्रिय खताचा वापर जमीन पाणी नियोजनाचे काम करुन शेतीतील अन्नधान्य निर्मिती केली जाते. त्यामुळे या शेती प्रकारातून गुणवत्तापूर्ण अन्नधान्य निर्मिती करण्यात येते. त्यामुळे या शेती प्रकाराला महत्त्व प्राप्त झाले आहे.

### ६) प्रदूषण नियंत्रित (Polution Control) :

पर्यावरण पूरक शेती निर्मितीमध्ये प्रदूषण नियंत्रण केले जाते. पर्यावरणात घातक असणारे औषधे, कीटकनाशके, रासायनिक खते यांचा वापर केला जात नाही. त्यामुळे भूमि हवा आणि पाणी प्रदूषण होण्याचे प्रमाण नियंत्रित करता येते. परिणामी पर्यावरण संतुलन आणि समृद्ध विकास करण्यात येतो. शेतीच्या मालावरती पूर्णप्रक्रिया करण्यात येते. त्यामुळे उर्वरित कचरा याचे नियोजन करण्यात येते. यामुळे पर्यावरणपूरक शेती उपयोगी ठरते.

### ७) उत्पादन खर्च कमी (Low Input Cost) :

पर्यावरण पूरक शेती ही कमी उत्पादन खर्चात शेती केली जाते. या प्रकारामध्ये शेती ही नैसर्गिकरित्या निर्माण केली जाते. त्यामुळे अधिक महागडी बियाणे रासायनिक खते, औषधे, कीटकनाशके यांचा अधिक वापर करण्यात येत नाही. या शेती प्रकारात स्वतः शेतकरी काम करतो त्यामुळे मजूरीसाठी होणारा खर्च कमी होतो. त्यामुळे कमी खर्चात अधिक उत्पादन करणे हे उद्दिष्ट साध्य करता येते.

### ८) शेती मालाची मागणी (High Demands of Agricultural Production) :

पर्यावरण पूरक शेती उत्पादनाला बाजारपेठेत अधिक मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे साहजिकच या प्रकारच्या शेती मालाची किंमत बाजारपेठेत अधिक प्रमाणात होते. त्यामुळे शेतकऱ्यांला आपली आर्थिक प्रगती साध्य करण्यास मदत होते. त्यामुळे शेतकरी या शेती व्यवसायाच्या स्वरूपात काम करताना पाहण्यास मिळते त्यामुळे या शेतीला अधिक महत्त्व आले आहे.

वरील सर्व मुद्या मधून या पर्यावरण पूरक शेती मधून महत्त्वाचे स्वरूप समजुन येते. पर्यावरण पूरक शेती ही शेतकऱ्याच्या सामाजिक आर्थिक विकास साध्य करण्यास मदत होते. याचबरोबर जैवविविधता पर्यावरणातील संतुलन, समृद्ध विकास, नव उत्पादन पद्धती इत्यादीमुळे शेती

अधिक विकसित करण्यास मदत होते. त्यामुळे सद्यस्थितीत पर्यावरण पूरक शेती हा अत्यंत महत्त्वाचे म्हणून पाहू लागले आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१) पर्यावरण पूरक शेतीचे महत्त्व सविस्तर लिहा.

## ७.१३ सेंद्रिय शेती (ORGANIC FARMING)

**प्रस्तावना (Introduction) :**

सद्यस्थितीत नवीन आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासाचा परिणाम शेती क्षेत्रावरती होत आहे. या तंत्रज्ञाना सोबत रासायनिक खते किटकनाशके यांचा अतिरिक्त वापर करुन अधिक शेतीमालाचे उत्पादन करण्यास सुरुवात करण्यात आले आहेत त्यामुळे शेतीचे रासायनिकीकरण आणि पर्यावरणाचा समतोल बिघडवण्यास कारणीभूत ठरत आहेत. त्यामुळे मानवी आरोग्याचे प्रश्न सुद्धा निर्माण होत आहेत. तेव्हा यासाठी पर्यायी पर्यावरण संतुलित विकास करण्यासाठी सेंद्रिय शेती पद्धतीचा पर्याय उपयोगात आणण्यात आला. विसाव्या शतकामध्ये शेती व्यवस्थेत सेंद्रिय शेतीचा प्रयोग करण्यास सुरुवात केली. ऑस्ट्रेलिया मध्ये सत्तर कोटी क्षेत्रामध्ये सेंद्रिय शेतीचा प्रयोग यशस्वीपणे करण्यात येत आहे. या शेती पद्धतीने अनेक संघटनात्मक स्तरावरती कार्य करण्यास सुरुवात केली.

सेंद्रिय शेती पध्दती ही नैसर्गिक जैवतंत्राच्या आणि खताच्या वापरावरती केली जाते. यामध्ये कॉम्पोष्ट मनुयरे, ग्रीन मनुयरे यांचा वापर करतात. तर पिक पद्धती जैविक पेस्ट व्यवस्थापन समिश्र पिक पद्धती यांना अधिक प्रोत्साहन देण्यात येते. जैविक दर्जा हा नैसर्गिक उपलब्ध साधनाच्या योग्य वापराच्या संदर्भात केली जाते. हे नैसर्गिक व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी रासायनिक कीटकनाशके व खते यांचा वापर टाळणे आवश्यक आहे. यासाठी पारंपरिक कंपोस्ट खताचा वापर करणे योग्य राहील. तसेच पशुपालन कुकुटपालन मत्सउत्पादन या शेती संलग्न व्यवसायामध्ये सेंद्रिय पदार्थाचा वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे जैविक शेती ही आधुनिक चिरंजीवी विकासाचे समर्थन करते.

सेंद्रिय शेती व्यवस्था निर्मिती संदर्भात International Federation of Organic Agriculture Movement (IFOAM) या संस्थेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय संघटन बांधणी करण्यात आली आहे. सन १९७२ पासून या संस्थेने सेंद्रिय शेती विषय पद्धतीचा प्रसार करण्यात आला. सन १९९० साली सेंद्रिय अन्न आणि इतर सेंद्रिय शेती संबंधी उत्पादन निर्मिती प्रक्रियेचा स्विकार करण्यात आला. या सेंद्रिय शेती उत्पादनाची वाढ सन २००१ ते २०११ मध्ये ८.९% इतके वार्षिक स्तरावरती दिसून आला. सन २०१८ साली सेंद्रिय शेती लागवड क्षेत्र ७१,५००,००० हेक्टर इतके प्रमाण आढळून आले. यामधून सेंद्रिय शेतीचे उत्पादन अधिक किफायतशीर प्रमाणात दिसून येतो.

शेती उत्पादन ही हजारो वर्षापासून कसण्याची पद्धती पाहण्यास मिळते. १९ व्या शतकामध्ये शेती करण्याच्या पद्धतीमध्ये रासायनिक द्रव्य पदार्थाचा वापर अधिक प्रमाणात करण्यात येऊ लागले. शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी रासायनिक खते आणि पदार्थाचे उत्पादन अधिक प्रमाणात वापर करण्यात आले. सन १९४० साली रासायनिक खताचे प्रमाण अधिक असल्याचे दिसुन येते. नवीन शेती तंत्रज्ञानाचा अधिकचा वापरामुळे कमी वेळात शेती उत्पादनात वाढ

करण्यात आली पण ही पद्धत दीर्घकाळ टिकू शकली नाही. याचा जमीन पाणी आणि हवेवरती दिसून आली. रासायनिक खताचा अधिकच्या वापराने जमीनीची उत्पादकता कमी होऊ लागली. पाण्यामध्ये रासायनिक द्रव्याचा वापर अधिक होण्याने पाण्यातील मुलतत्व कमी होऊ लागली. तसेच अतिरिक्त रासायनिक औषधाच्या पिकावरील फवारणी मुळे हवेमध्ये प्रदूर्षण होऊ लागले. त्याचा परिणाम जैवविविधतेवरती होऊ लागला. याचे परिणामकारक जाणीव होऊ लागली.

सन १९२१ साली सेंद्रिय शेती निर्यातीचे उद्गाते अलर्बनट होवार्ड आणि गार्बेलीई होवार्ड या दांपत्याने याची सुरुवात केली. भारतातील पारंपारिक शेतीची सुरुवात करण्यासाठी Institutte of Plant Industry ची निर्मिती केली. त्यांनी शास्त्रीय प्रशिक्षणाच्या आधारे पशुपालन संबंधी कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांनी पारंपारिक शेती करत असताना रासायनिक द्रव्याचा अधिक वापर करणे टाळण्यात आले. त्यामध्ये कंपोस्ट आणि मनसुर यांचा वापर करण्यात आला. तसे गाव पातळीवरती सेंद्रिय शेती गटाचा निर्मिती करण्यात आली.

सन १९२४ साली सेंद्रिय शेती विषयी Biodynamic Agriculture संबंधी Ehrefifriend Pfeiffer यांनी असंख्य व्याख्याने देण्याचे कार्य केले. या शेती विषयीचा पैलूचा संबंधी चर्चा सज्ञांचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून सेंद्रिय शेती विषयक शेतकऱ्यांच्या मध्ये जनजागृती निर्माण करण्यात आले. सेंद्रिय शेती विषयी कार्य करत असताना शेतजमीनीच्या उत्पादन व्यवस्थेचा विकासावरती लक्ष केंद्रित केले आहे. जैव पैलूच्या आधारे शेती उत्पादन करण्यात येऊ लागली. सन १९४० साली हॉडवर्ड यांनी An Agriculture Testament या पुस्तकात सेंद्रिय शेतीच्या संकल्पना स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना सेंद्रिय शेतीचे जनक म्हणून ओळखतात. अमेरिकेतील T.I. Rodale यांनी सेंद्रिय शेतीच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यांनी सेंद्रिय शेती प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सन १९७० साली Charles Walters यांनी Acres Margin मध्ये Eco-Agriculture ची संकल्पना निर्माण करण्यात आली. सेंद्रिय शेती अधिक आर्थिक प्रगतीसाठी वापर करण्यात आले. सेंद्रिय शेतीला पर्यावरणीय शास्त्रीय आधारावरती निर्मिती करण्यात आली आहे.

## ७.१४ सेंद्रिय शेतीची व्याख्या (DEFINITION OF ORGANIC FARMING)

सेंद्रिय हा शब्दाचा वापर होवार्ड आणि रोडले यांनी सर्व प्रथम शेतीच्या संदर्भात वापरला. हा जैविक वास्तवाच्या संबंधीत आहे. ज्यामध्ये कंपोस्ट लागवड आणि पशुपालन सुधारणा यातून मानव प्रगती करण्यासाठी वापर करण्यात आला. या शेतीमध्ये जमीनीची उत्पादकता वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातात. जैवबद्ध शेतीतंत्रानी सेंद्रिय शेतीची संकल्पना सविस्तर स्पष्ट केली आहे.

**१)** वेडबेल बेरी यांच्या मते, सेंद्रिय शेती ही विशिष्ट शेती उत्पादना संबंधी सांगत नाही कथा पूरक आणि न कारणे हे सांगत नाही. नैसर्गिक व्यवस्थेचा स्वीकार करुन संरचनेची बांधणी करण्यात येते ही जैविकतेच्या संदर्भात स्वातंत्र्य आणि स्वावलंबनाच्या एकात्मीकरणाचि प्रक्रिया आहे. त्यास सेंद्रिय शेती म्हणून ओळखतात.

**२)** इंटरनेशनल फेडरेशन ऑफ आर्गेनिक अग्रीकल्चर मुव्हमेंट (IFOAM) यांच्या मते, सेंद्रिय शेती ही एकात्मिक शेती व्यवस्था आहे. ही चिरंजीवी विकासासाठी आहे. जैव विविधता आणि जमिनीच्या प्रोत टिकवण्यास महत्त्व देणे, रासायनिक औषधे, निरजंतुकी करण औषध फवारणी

यांच्या अधिक वापरावर नियंत्रण करुन नैसर्गिक स्वरूपाची शेती करण्यात येते त्याला सेंद्रिय शेती असे म्हटले जाते.

सेंद्रिय शेती ही नैसर्गिक पद्धतीने केली. रासायनिक खते औषधी फवारणी या विषयीचा वापरावरती नियंत्रण ठेवण्यात येते. पारंपरिक खत निर्मिती करण्यासाठी कंपोस्ट पद्धतीचा वापर करण्यात येतो. त्यामुळे रासायनिक खते, औषधे पदार्थ यांचा वापर न करता शेती उत्पादनात वाढ करतात. या पद्धतीचा वापर करुन अन्नधान्य, फळ उत्पादन, पशुपालन, दुग्ध उत्पादन मासेमारी इत्यादी सारखी उत्पादन केली जातात. त्यामुळे मानवाच्या आरोग्याच्या विकासास उपयोगी होईल. या दृष्टीने सेंद्रिय शेती केली जाते.

## ७.१५ सेंद्रिय शेतीची वैशिष्ट्ये (CHARACTERISTICS OF ORGANIC FARMING)

सेंद्रिय शेती ही अजैविक आणि रासायनिक पदार्थाच्या वापराशिवाय पिक उत्पादन आणि पुशपालन केले जाते. याचा मुख्य उद्देश हा पर्यावरणास कोणत्याही प्रकारचा धोका न पोहचवता मानवाचे कल्याण करणे आहे. ज्यामुळे मानवी जीवन समृद्ध करता येते. या शेतीमुळे जमीन पर्यावरण आणि लोक यांचे आरोग्य स्थिर स्वरुपात ठेवुन शेती उत्पादन केले जाते. त्याच सोबत जैवविविधता आणि पर्यावरणाची सायकल स्थिर स्वरूपात ठेवता येते. यामध्ये पारंपरिक शेती नाविण्य पर्यावरणाचे शास्त्रीय व्यवस्थापन करण्यात येते. या शेती प्रकारामधल्या आरोग्यदाई अन्न आणि शेती पर्यावरणाची काळजी घेतली जाते. त्यामुळे ही शेती शेतकऱ्यांना आणि पर्यावरणाला लाभदायक आहे. या शेतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १) परिस्थितीकी संदर्भात (Ecological Orientation) :

सेंद्रिय शेती ही जैव परिस्थितीकी आधारित शेती केली जाते. ही शेती करत असताना पर्यावरणातील सर्व घटकांची सुरक्षितता ठेवण्याचे कार्य केली. शेतीसाठी आवश्यक असणारी जमीन पाणी हवा आणि इतर घटकांमध्ये समन्वय ठेवून शेती केली जाते. त्यामुळे पर्यावरणाला हानी न पोहचवता शेती उत्पादन केले जाते.

### २) रासायनिक पदार्थावरती नियंत्रण (Control on Chemical Pest) :

सेंद्रिय शेती मध्ये रासायनिक पदार्थाचा वापर केला जात नाही. त्याच्या वापरावरती नियंत्रण ठेवले जाते. शेती पिकावरती रासायनिक पदार्थाचा अतिरिक्त वापर केल्यामुळे शेती आणि पर्यावरणावरती विपरित परिणाम होताना दिसून आले. त्यामुळे या रासायनिक खते आणि औषधे यांच्या वावरावरती नियंत्रण ठेवण्यात येते आणि पारंपरिक साधनाचा खताचा वापर करुन ही शेती केली जाते.

### ३) जमीन पाणी गुणवत्ता आणि प्राणी जीवनाचे संवर्धन (Conservation of Soils Water Quality and Wide Life) :

सेंद्रिय शेती ही पर्यावरणातील घटकांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कार्य करते. यामध्ये जमीन आणि पाण्याची गुणवत्ता टिकवण्यासाठी प्रयत्न केला जातो. यामध्ये जमीनीचा कस टिकवण्यासाठी कंपोस्ट खते यांचा नैसर्गिरित्या त्याचा वापर केला जातो. जमिनीची धूप किंवा वाइन न जाता तिचे संवर्धन केले जाते. तसेच शेतीसाठी योग्य प्रमाणात पाण्याचा वापर केला जातो. शेतीसाठी पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी करुन त्यांचा वापर ठिंबक तुषार सिंचन

प्रकारानुसार होतो. त्यामुळे पिकाला आवश्यक तेवढ्या पाण्याचा पुरवठा होतो. याचबरोबर शेती सोबत पशुपालनाचे संवर्धन केले जाते.

### ४) संसाधनाचे नूतनीकरण (Renewable Resources) :

सेंद्रिय शेती करत असताना स्थानिक उपलब्ध मुलभूत संसाधनाचे नूतनीकरण केले जाते. शेती करत असताना नैसर्गिक संसाधनाचा वापर केला जातो. जमीन पाणी हवा आणि इतर घटक यांचा समावेश यामध्ये केला जातो. या साधनाचा ऱ्हास न करता त्यांच्यामध्ये अधिक उत्पादकता निर्माण करण्यासाठी त्याचे नूतनीकरण केले जाते. त्यामुळे शेती आणि पर्यावरण यांचा समतोल टिकवला जातो.

### ५) वनस्पती पोषक आणि सेंद्रिय पदार्थांचे पुनर्चक्रमण अधिकतम करते (Maximizes Recycling of Plant Nutrients and Organic Matter):

जैविक सेंद्रिय शेती करत असताना वनस्पती पोषक आणि सेंद्रिय पदार्थाचे पुनर्चक्रमण अधिकतम केले जाते. शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वनस्पतीचे पोषण करण्यातून सेंद्रिय शेती दीर्घकाळ टिकवण्यात येते. तसेच नैसर्गिक घटकाचा एकदा वापर केल्यानंतर त्यांचा पुनर्चक्रमण अधिकत्तम केले जाते. त्यामुळे सेंद्रिय शेती उत्पादनामध्ये वाढ होते.

### ६) उत्पादन व्यवस्थेत विविधता कायम ठेवणे (Maintains Diversity in the Production System) :

सेंद्रिय शेती उत्पादन व्यवस्थेत विविधता कायम ठेवली जाते. शेती उत्पादन करताना पिक पद्धती मध्ये विविधता ठेवली जाते. एकसारखी पिक पद्धत यामध्ये वापरण्यात येत नाही. पिकांची फेरपालट करणे महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे पिकांचे उत्पादन वाढ होते. जमीन, पाणी आणि हवामान परिस्थिती पाहूनच उत्पादन करणे आवश्यक आहे. त्यानुसार पिक उत्पादनाचे नियोजन केले जाते.

### ७) प्रदूर्षण टाळणे (Avoid Pollution) :

सेंद्रिय शेती ही पारंपारिक पद्धतीचे बि-बियाणे, खते, अवजारे इतर घटकांचा वापर करुन शेती केली जाते. शेतीमध्ये साधी पिक पद्धत वापरात आल्यामुळे जमीन व पाणी यांचे योग्य नियोजन केले जाते. त्यामध्ये रासायनिक खताचा आणि औषधाचा वापर कमी केला जातो. त्यामुळे रासायनिक द्रव्यापासून होणारे प्रदूषण टाळले जाते. पालापाचोळा यापासून कंपोस्ट खत निर्मिती केली जाते. त्याचा वापर पिकांच्या उत्पादन वाढीसाठी होते त्यामुळे प्रदूषण मुक्त शेती केली जाते.

### ८) पशूपालन (Animal Husbandry) :

सेंद्रिय शेती ही पशुपालन करण्यावरती लक्ष केंद्रित करण्यात येते या शेतीला पूरक पशुपालन, कुकुट पालन, मत्स उत्पादन इतर घटकांचा समावेश यामध्ये करण्यात येते. यामुळे शेतीस आवश्यक असणारी शेण खत आणि जैविक खताच्या निर्मिती केली जाते. त्याचे पासून दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन करण्यात येते. त्यामुळे आर्थिक फायदा होतो. शेतकऱ्याच्या उतपजीविकेचे साधन म्हणून पशुपालन महत्त्वाचे ठरते.

**९) अन्न सुरक्षा (Food Security) :**

सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून अन्न सुरक्षा देण्यात येते. सेंद्रिय शेती मधून अन्नधान्य, फळे, भाजीपाला इतर उत्पादन केली जातात. यामध्ये रासायनिक खते, कीटकनाशके, औषधे यांचा वापर कमी प्रमाणात असल्याने अन्न सुरक्षित पुरवठा करता येतो. त्याचा मानवी आरोग्यावरती परिणाम चांगला होतो. त्याचा योग्य पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे मानवाची अन्नाची गरज पूर्ण होते.

वरील सर्व वैशिष्ट्यामधून सेंद्रिय शेती ही पर्यावरण आणि मानवी समाजाच्या विकासास महत्त्वपूर्ण म्हणून समजली जाते. सेंद्रिय शेती ही अधिक महत्त्वाची आहे त्यांच्या वैशिष्ट्यांमधून स्पष्ट होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) सेंद्रिय शेतीची व्याख्या सांगा.

२) सेंद्रिय शेतीची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

## ७.१६ सेंद्रिय शेतीचे महत्त्व (IMPORTANCY OF ORGANIC FARMING)

सेंद्रिय शेती पद्धती ही पर्यावरण आणि मानवी विकासामध्ये महत्त्वाची भूमिका निभावताना दिसून येते. ज्यामध्ये योग्य प्रमाणात रासायनिक खते आणि औषधाचा वापर केला जातो. तर पारंपारिक बी-बियाणे खते यांचा वापर करण्यात येतो. त्याचा शेती पर्यावरण व्यवस्थेच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी महत्त्व दिले जाते. त्यामध्ये जैवविविधता वनस्पतीशास्त्र जीवशास्त्रीय क्रिया यांचा समावेश होतो. त्यामुळे जैविक घटकांचे संरक्षण करण्यात येते. त्यासोबत अन्नसुरक्षा करण्यात येते. त्यामुळे मानवी आरोग्यास पोषक असणारा अन्न पुरवठा करण्यात येतो. या शेतीचे महत्त्व पुढील प्रमाणे सांगता येईल.

**१) चिरंजीवी विकास (Sustainable Development) :**

सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून चिरंजीवी विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यात येते. यातून शेतीचा विकास केला जातो. शेतीच्या माध्यमातून भविष्य पिढ्यांना पुरेल इतक्या प्रमाणात नैसर्गिक साधनाचा विकास करण्यात येतो. या शेतीच्या लागवडीतून बी-बियाणे खते इतर घडक यांचा वापर केल्याने पुढील पिढ्यांना या संसाधनाचा वापर करता येईल. या आधारे चिरंजीवी विकास शेतीच्या माध्यमातून करण्यात येते.

**२) पर्यावरण पुरक व्यवहार (Eco-Friendly Practices) :**

सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून पर्यावरणपूरक व्यवहार केले जातात. शेती करत असताना पर्यावरणास धोका होईल अशाप्रकारे वर्तन करु नये. त्यास पूरक असे तंत्रज्ञान विकसित करण्याचे कार्य सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून करणे आवश्यक आहे. या शेती प्रकारामुळे नैसर्गिक जैवविविधता याला धोका पोहचण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे सेंद्रिय शेतीची आवश्यकता आहे.

### ३) गुणवत्तापूर्ण पोषक द्रव्याची निर्मिती (Quality Nutritive Production) :

सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण पोषकद्रव्याची निर्मिती करण्यात येते. ही शेती करत असताना नैसर्गिक जमीन, पाणी, हवा, पर्यावरणातील इतर घटक यावरती बाह्य घटकांचा कोणताही परिणाम होऊ दिला जात नाही. त्यामुळे शेती उत्पादनाची गुणवत्ता पूर्ण पोषण द्रव्याची निर्मिती केली जाते.

### ४) आरोग्यासाठी धोकेदायीक नाही (Non Harmful Healthier) :

जैविक शेती उत्पादने ही मानवी आरोग्यासाठी पोषक आहेत कारण या शेती उत्पादनामध्ये आरोग्याला अपायकारक रासायनिक द्रव्याचा वापर केला जात नाही. नैसर्गिकरित्या शेती उत्पादने केली जातात. त्यामुळे या शेती उत्पादनाचा चांगले योग्य अन्न म्हणून ओळखले जाते त्याचा मानवी आरोग्यावरती वाईट परिणाम होत नाही.

### ५) रोजगार उपलब्धता (Availability of Employment):

जैविक शेती उत्पादन प्रक्रियेमध्ये रोजगाराची उपलब्धता करण्यात येते. या शेती उत्पादनामध्ये तंत्रज्ञान आणि यंत्राचा अधिक वापर केला जात नाही.

## ७.१७ अनकोली प्रकल्प सोलापूर (ANKOLI PROJECT SOLAPUR)

### प्रस्तावना (Introduction) :

जागतिक स्तरावरती पर्यावरणाच्या समस्येवरती अधिक प्रमाणात कार्य करण्यात येऊ लागले आहे. औद्योगिकरण, शहरीकरण आणि आधुनिकीकरण या परिवर्तनाच्या प्रक्रियेचा परिणाम निसर्ग आणि मानवी जीवनावरती होत आहे. त्यामुळे संपूर्ण पर्यावरणातील वनस्पती, प्राणी, पक्षी, जीव जंतू, कीटके, प्राणी, जमीन, भूगर्भातील हवामानात होणारे बदल आणि जैवविविधता इत्यादी वरती परिणाम होताना दिसून येते. त्यामुळे निसर्ग आणि मानवी समाजातील संबंध बदलत आहेत. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. मानवाने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा अधिक प्रमाणात वापर करण्यात आला आहे. त्यामुळे मानवाचे निसर्गावर आक्रमण अधिक शोषणाच्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे दुष्काळ, महापूर, भूकंप, अतिवृष्टी व हवामानातील बदल इत्यादींच्या समस्याना सामोरे जावे लागत आहे. हे सर्व पर्यावरणाचा समतोल ढासळण्यातून होत आहे. तेव्हा पर्यावरण संवर्धक सुरक्षित आणि जतनाच्या संबंधी उपयोजनात्मक प्रयोग आणि कृतीशील कार्यक्रम करण्यात येऊ लागली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवरती पर्यावरणपूरक वातावरण निर्मितीची संकल्पना अधिक वापरण्यात येत आहे. यासाठी पर्याय विकास निती, चिरंजीवी विकास आणि पर्यावरण पूरक शेती विषय दृष्टिकोन आणि प्रयोगाच्या पातळीवरती कार्य करण्यात आले. त्यास अनुसरुन शहरी आणि ग्रामीण भागामध्ये याविषयीची जाणीव जागृती झाल्याचे पाहण्यास मिळते. याविषयीचे पर्यावरण कृषी तज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते यांना लोकसहभागाच्या आधारे एकात्मिक विकास प्रकल्प निर्माण करण्यात आले. त्यासोबत शासन यंत्रणा स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून हे प्रकल्प उभारण्यात येत आहेत. याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. यामध्ये पर्यावरणाचे संरक्षण,

संवर्धन आणि सुरक्षितता या अनुशंगाने पर्यावरण पूरक शेती विषयीचा प्रयोग ग्रामीण दुष्काळी भागात शेती प्रयोगातून दिसून येते.

या अनुशंगाने सोलापूर जिल्ह्यातील अनकोली या दुष्काळी परिस्थिती असणाऱ्या गावामध्ये पर्यावरणपूरक शेतीच्या प्रयोगाची सुरुवात करण्यात आली. या विभागात सातत्याने पडणारा दुष्काळ, पाण्याची कमतरता, शेती व पशूपालन मागासलेले गरिबी, दारिद्र या परिस्थितीशी संघर्ष करण्यात येत होता. त्याविरुद्ध पर्याय विकास चिरंजीवी विकास आणि पर्यावरणपूरक पूरक शेती प्रयोग करण्यात येऊ लागले. यातून शेततळीच्या माध्यमातून सामुदायिक पाणी व्यवस्थापन विषयीचा प्रकल्प सोलापूर जिल्ह्यातील अनकोली गावामध्ये शेती शास्त्रज्ञ अरुण देशपांडे यांच्या मार्गदर्शन आणि सहकार्याच्या माध्यमातून करण्यात आला. त्यामुळे दुष्काळ भागातील शेति आणि शेतकऱ्यांना सामुदायिक स्तरावरती पाणी व्यवस्थापनाच्या माध्यमातून शेती कसण्यास सुरुवात करण्यात आली. त्यामुळे पर्यावरण शेती आणि पाणी व्यवस्थापन यासंबंधी कार्य करण्यातून पर्यावरणपूरक शेतीचा प्रयोग यशस्वी झाल्याचे दिसून येते.

## ७.१८ अनकोली प्रकल्पाची पार्श्वभूमी (BACKGROUND OF ANKOLI PROJECT)

भारतामध्ये अनेक राज्यामध्ये पर्यावरण विषयीच्या समस्या अनुभवयास येत आहे. या मागील दशकामध्ये मध्यप्रदेश राज्यात भोपाळ गॅस विस्फोट घटनेमुळे या सर्व परिस्थितीला वेगळे वळण प्राप्त झाले. यातून लोक विज्ञान चळवळ (People's Science Movement) ची स्थापना करण्यात आली. या चळवळीने पर्यावरणातील दुष्काळ, महापूर, भूकंप, वादळे आणि हवामानातील बदल याविषयीचा शास्त्रीय अभ्यास करण्यात आला. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कसे विज्ञानाचा वापर करता येईल याची चर्चा करण्यात येऊ लागली. मानवी समाजाला धोकेदायक परिस्थिती निर्माण होऊ असे प्रकल्प नाकारण्यात आले. त्यामुळे त्याला पर्यायी विकास निती चिरंजीवी विकास आणि पर्यावरण पूरक शेती दृष्टिकोनाचा विकास करण्यात आला.

लोक विज्ञान चळवळीचे कार्यकर्ते शेती शास्त्रज्ञ अरुण देशपांडे यांनी दुष्काळ निर्मूलनाच्या चळवळीचे कार्य करण्यास सुरुवात केली. या सोलापूर जिल्ह्यातील अनकोली या दुष्काळी भागात सामुदायिक पाणी व्यवस्थापन प्रयोग शेततळीच्या माध्यमातून करण्यास सुरुवात केली. या जिल्ह्याची पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळ भागातील जिल्हा म्हणून ओळख आहे. या भागात सर्वात कमी पावसाचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. पिण्याचे आणि शेतीच्या पाण्याची समस्या कायम पाहण्यास मिळते. कारण पावसाचे कमी प्रमाण आहे. तसेच भूगर्भातील पाणीसाठी ही अत्यल्प आहे. त्यामुळे जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी शहरी भागात स्थलांतरण करावे लागते. त्यामुळे ग्रामीण भागातील खेडी ओस पडू लागली आणि शहराचा आकार वाढत चालला आहे. ग्रामीण भागात उद्योग व्यवसाय नसल्याने बेरोजगार तरुणाना आपले गाव सोडून जावे लागत आहे.

या परिस्थितीत सन १९८६ साली शेती शास्त्रज्ञ अरुण देशपांडे आपल्या अनकोली गावी स्थिर झाले. त्यांनी या भागात सर्वे करुन प्राप्त परिस्थिती समजुन घेऊन काम सुरु केले. या भागात सातत्याने दुष्काळी परिस्थिती असल्याने पावसाचे प्रमाण कमी भूगर्भा पाणी साठा कमी आणि उष्णता याचे प्रमाण अधिक होते. या भागात ३०० फूट पर्यंत भूगर्भात पाणी साठा उपलब्ध नाही. या ग्रामीण लोकांना शासनाच्या टँकर पाणी पुरवठ्यावरती अवलंबून रहावे लागते. जमीनीचा कस

कमी आहे तसेच बोरवेल मधून पाणी साठा कमी प्रमाणात उपलब्ध आहे. या सर्व पार्श्वभूमीवरती श्री. अरुण देशपांडे यांनी सामुदायिक पाणी व्यवस्थापन शेत तळी बांधणी प्रकल्पातून शेतीला पाणी उपलब्ध करुन देण्याचा कार्यक्रम सुरु केला.

**अनकोली प्रकल्पाचे कार्य (Work of Ankoli Project) :**

पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील अनकोली सामुदायिक पाणी व्यवस्थापन शेततळी (Water Bank) ची जन चळवळ श्री. अरुण देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु केली. त्यांनी शास्त्रीय आधारे तत्व आणि तंत्रज्ञान यांच्या आधारे नियोजन करण्यात आले. त्यांनी प्रथम पाणलोट विकास प्रकल्पापासून सुरुवात केली. पाऊसाचा प्रत्येक थेंब हा जमिनीमध्ये मुरला पाहिजे. अशी व्यवस्था नियोजन करण्याचे निश्चित केले. त्यामुळे भूगर्भात पाणी साठ्यात वाढ होईल, यासाठी दुष्काळ निर्मूलन करणारे वृक्ष लागवड करण्यात आली. यामध्ये बाबुळ, लिंब आणि सुबाबळ या वृक्षाची लागवड करण्यात आली. याची वाढ पाच वर्षात झाली. यामुळे उष्ण वारे प्रमाण कमी झाले. याचबरोबर पावसाचे प्रमाण वाढले. आकाशातून पडणारे पाणी हे पाणलोट विभागात साठवण्यात मुरवणात येऊ लागले. त्यामुळे भूगर्भात पाणी साठ्यात वाढ करण्यात आली. त्यातून पाणी संवर्धन कार्य करता आले.

याबरोबर वृक्षलागवड प्रमाण अधिक करण्यात आले. त्यामुळे या भागातील दुष्काळ परिस्थितीत सूर्याच्या उष्णतेचे प्रमाण वाढल्याने जमीनीच्या धुपेचे प्रमाण कमी करण्यात आले. पाण्यातील वाफेचे प्रमाण कमी झाले. हवेतील आद्रता प्रमाण कमी झाले पण सन १९९८ च्या दुष्काळाच्या समस्येला काही प्रमाणात सामोरे जावे लागले. शेतीची नापिकता, स्थलांतरण आणि जनावरांच्या चाऱ्याची समस्या समोर आल्या. शासनाच्या टँकर पाणी पुरवठा आणि जनावऱ्यांच्या चाऱ्यासाठी चारा छावण्या उभारण्यात आल्या. पण दुष्काळ परिस्थितीला सामना करावा लागला.

या दुष्काळ परिस्थितीवरती मात करण्यासाठी पाण्याचा ताळेबंद (water audit) तयार करण्यात आला. या विषयीचे पिक आणि पाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात आले. या भागात कमी पाण्याची पिके घेण्यात आली. त्यामुळे या पिकांची बाजारातील किंमत मागणीनुसार उत्पादन करण्यात येऊ लागले. पाण्याचा ताळेबंद यासाठी करण्यात आला. दुधाचे उत्पादन हे शहरी भागात एक लिटर दुध विक्री केले जाते. तेव्हा या दुध उत्पादन करताना पशुपालनास एक हजार लिटर पाणी आणि चारा याचा वापर करण्यात येतो. कुकुटपालनासाठी सतराशे लिटर पाणी वापरण्यात येते. एक किलो मटन निर्मिती पस्तीस हजार लिटर पाणी, साखर उत्पादन चार हजार लिटर पाणी, भात पिकासाठी अकरा हजार लिटर पाणी, कागद निर्मिती पस्तीस हजार लिटर पाणी, मटन पन्नास लिटर पाणी एवढा अधिक पाणी वापर हा धक्कादायक आहे. शहरी भागाला एक कुटुंब १.५ करोड लिटर पाणी वापर केला जातो हे पाणी ग्रामीण भागातील तळ्या, नद्या, पाणी साठ्याचे उपसा करण्यात येतो. त्यामुळे ग्रामीण भागाला पाणी कमी पडते. यातून छत्तीस हजार लिटर पाणी वापरले जाते. अशी परिस्थिती पाण्याचे नियोजन अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या.

सन २००२ साली श्री. अरुण देशपांडे यांनी शेत तळी (water bank) विषयी कार्य करण्यास सुरुवात केली. हे करताना या शेततळ्याची सव्वीस फूट खोल खोदकामातून खड्डा तयार करण्यात यावा. यामध्ये विशेष प्लास्टिक म्हणून Geo-Membrance ह्या प्रकारचे पर्यावरणपूरक प्लास्टिकचा वापर करण्यात येतो. त्याचे बहुबाजू पातळ्या असतात. त्यांची रु. ७,००,००० खर्च करण्यात आला. त्याचा वापर शेततळ्याच्या पृष्ठभागापासून तळापर्यंत टाळण्यात येते. त्यामुळे शेत तळ्यातील पाणी जमीनीमध्ये झिरपत नाही तसेच या शेततळ्याच्या

बाजूस वृक्ष लागवड केली जाते. त्यांच्या सावलीमुळे उष्णतेचा पाण्याच्या बाष्पी भवनावरती होत नाही. पाण्याचे वाफेत रुपांतरण होत नाही. पाण्याची बचत होते.

यामध्ये शेततळ्याच्या बांधणीत कुटुंबातील बाबीस व्यक्तीचा यामध्ये सहभाग आहे. पाणी ठिंबक पाईप लाइनच्या माध्यमातून पाणी शेतीस देण्यात येते. पण नंतर श्री. देशपांडे यांनी लघुबंधारे बांधण्याचे काम पाणलोट क्षेत्रामध्ये सुरु केले. त्यामुळे पडणाऱ्या पावसाचे पाणी अडवणूक केली जाते. तसेच वृक्ष लागवड केल्याने जल संधारण कार्यास मदत होते. जमीनीची धूप प्रमाण वाहून जाणारे जमीनीवरील पाणी साठवणे मरवणे आवश्यक यामुळे जमीन आणि पाणी यांचे योग्य व्यवस्थापन करता येते. शेततळ्या माध्यमातून शेतीला पुरेल इतकेच पाणी वापर करण्यात येतो. जसे बँक मधून पैसे आवश्यकते प्रमाणे बचत आणि वापर करतो तसा प्रकाराची व्यवस्था शेत तळ्याच्या माध्यमातून करता येते.

भिमा आणि सिता नदी खोऱ्यामध्ये पन्नास एकर क्षेत्रात नानो पाणलोट क्षेत्र विकस प्रकल्प उभारण्यात आला. या क्षेत्रात पाच करोड लिटर पाणी साठवेल इतका शेततळी निर्माण करण्यात आली. या भाग पाच एकर क्षेत्रात वृक्षारोपण करण्यात आले. या भागात पाचशे लिटर पाऊस हा पावसाळ्यात पडतो. तसेच दोन ते तीन महिने विहिरींना पाणी उपलब्ध राहते. यामधून दहा टक्के पाणी प्रत्येक कुटुंबाकडून बचत केले जाते. यामुळे घरगुती पाणी, शेती पाणी, पशुपालन पाणी यासाठी पाणी वापर करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाने या भागात २५ शेत तळी निर्माण करुन दिली. यामध्ये पाणी पंचायत समिती निर्मित करुन दहा महिलांचा गट स्थापन करण्यात आला. त्यांनी राष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेतले. तसेच शासनाकडून सबसिडी घेऊन शेती करण्यास शेत तळी बांधणी केली. त्यांनी यातील पाण्याचा वापर करुन भाजीपाला, फळे यांची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल. तसेच मजूरीसाठी बेरोजगारांना शहरी भागात जावे लागत होते असे लोक पुर्नस्थलांतरी गावी आले. तसेच सेंद्रिय पिक पद्धतीचा वापर करुन शेती उत्पादन वाढ करण्यात आली. त्यामुळे शंभर कुटुंब शहरी भागातून ग्रामीण भागात परत येऊन स्वतःची शेती करण्यास सुरुवात केली. स्वतःच्या गरजा पूर्ण करुन बाजारात विक्रीसाठी शेती उत्पादन करण्यास सुरुवात झाली. त्यामुळे स्थानिक लोकांच्या जीवनमानाचा सामाजिक आर्थिक दर्जा मध्ये गतिशील विकास झाला. सायकलच्या माध्यमातून ऊर्जा निर्मिती करण्यात आली. त्यामुळे ऊर्जा निर्मिती करण्यात आली. असा विविध स्वरुपामध्ये ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी आपल्या जीवनात बदल करण्यात आल्याचे दिसून आले. यातून आर्थिक सहाय्य मिळवण्यासाठी अर्थ पुरवठा बँक मार्फत करण्यात येऊ लागला आणि सामुदायिक स्तरावरती विकास प्रक्रिया सुरु झाली.

## ७.१९ अनकोली प्रकल्पाचे निष्कर्ष (CONCLUSION OF ANKOLI PROJECT)

सद्यकालीन परिस्थितीत पर्यावरणाचा सुरक्षे संबंधीत प्रश्न नव्या स्वरूपात निर्माण होते. अशा स्थितीत पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भाग म्हणुन ओळखला जाणारा सोलापूर जिल्ह्यातील अनकोली गावातील प्रयोग महत्त्वपूर्ण आहे. या गावाने दुष्काळाच्या समस्येवरती मात करण्यासाठी सामुदायिक पाणी व्यवस्थापनाचा शेत तळीचे निर्मिती करण्यातून करण्यात आली. शेतकऱ्यांना योग्य प्रकारे शेती व्यवसाय आणि जीवन जगण्यास आवश्यक त्या गरजा पूर्ण करण्यासाठी हा प्रयोग यशस्वी करण्यात आला आहे तर दुसऱ्या बाजूने पर्यावरणाच्या दुष्काळ, हवेतील उष्णता,

पाण्याची व्यवस्था, पिक जमीन आणि पाणी व्यवस्थापनाचे प्रायोगिक तत्व आणि व्यवहार प्रत्यक्षात येण्यास हा प्रकल्प महत्त्व पूर्ण आहे. समाजातील प्रत्येक घटकाला आपल्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आत्मनिर्भर, स्वावलंबी आणि सन्मानाचे जीवन जगण्यासाठी पर्यावरण संतुलीत आणि समृद्ध विकासाचे धोरण म्हणून यांचा स्वीकार करण्यात आला आहे. विशेषतः स्त्रीयांना स्वातंत्र अस्तित्व, स्वाभिमानाने जगण्यास समृद्ध जगण्यास मार्गदर्शक ठरणारा असा प्रकल्प आहे. हे या प्रकल्पाचे यश म्हणून पाहता येते. याचा उपयोग दुष्काळ भागातील विकसास महत्त्वाचा म्हणून उपयोगात आणता येईल.

## ७.२० सारांश (SUMMARY)

जागतिक स्तरावरती पर्यावरणाच्या अनुषंगाने विविध तत्व प्रणाली आणि कृतीशील कार्यक्रम करण्यात येत आहेत. पर्यावरणाचा समतोल राखून मानवी समाजाचा विकास करणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट ठेवून पर्यावरणाचा आणि मानवी समाजाचा संबंध हा समृद्ध सुरक्षित आणि संवर्धन स्तरावरती होणे आवश्यक आहे. यासाठी पर्याय विकास निती, चिरंजीवी विकास आणि पर्यावरणपूरक शेती यांची तत्वे व्यवहारात उपयोगी करणे आवश्यक बनत आहे. ही तत्व व्यापक स्तरावरती प्रसारित करण्याचा सामुदायिक उपक्रमाची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन स्थानिक पातळीवरती लोक सहभागातून आणि सहकार्यातून उपक्रमाची निर्मिती करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने प्रशासकीय राजकीय प्रतिनिधी सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयं सेवी संस्था यांच्या सहभागातून पर्यावरण विकास समृद्धी आणि सुरक्षितेचा विषय, कार्य करणे महत्त्वाचे ठरेल.

## ७.२१ अभ्यासाचे प्रश्न

१) पर्यायी विकासाची व्याख्या सांगून त्याची वैशिष्ट्ये आणि महत्त्व सविस्तर लिहा.

२) चिरंजीवी विकासाची व्याख्या सांगून त्यांची वैशिष्ट्ये आणि महत्त्व थोडक्यात विश्लेषण करा.

३) पर्यावरण पूरक शेतीची संकल्पना आणि वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

४) सोलापूर जिल्ह्यातील अनकोली प्रकल्पाचे सविस्तर वर्णन करा.

५) पर्यावरण पूरक शेतीचे महत्त्व सविस्तर लिहा.

## ७.२२ संदर्भ पुस्तके (REFERENCE BOOKS)

1) Sutton Philip W. 2007, The Environment A Sociological Introduction, Polity Press, U.S.A.

2) Clerc J. M. (ed.) 1985, Introduction to working conditions on environment, International Labour Organization.

3) Fulekar M.H. Pathak Bhawana Kale R.K. (ed.) 2014, Environent and Sustainable Development, Springer, New York.

4) Sundar I 2006 Environment and Sustainable Development APH Publishing Corporation, New Delhi.

5) Jose Antonio Alonso, Giovanni Andrea Cornia Rob Vas (ed.) 2013 Alternative Development Strategies for the Post 2015 Era Blomsbury London.

6) Cathrine Brun, Piers Blaike m, Chale Jones (ed.) 2014 Alternative Development Unravelling Marginalization Voicining Change, Routledge London and New York.

7) Varadarasan Shanmugavel 2019 A Farmer's Handbook Ecofirendly Cardamom cultivation, Independently Published.

8) Sean clark (Ed.) 2016 Sustainable Agriculture - Beyone organic farming, MDPI

9) Vytautas Pilipavicius (Ed.) 2014 Organic Agriculture toward Sustainability, Printed in croatia.

10) www.prayog.org.

11) www.unodc.org.

12) www.sociologicaldiscusion.com

13) www.prayaspune.org.

❖❖❖❖

# ८

# लोककेंद्रित विकास: हिवरे बाजार आणि मेंढा लेखा

**प्रकरणाची रचना**

८.० उद्देश

८.१ प्रस्तावना

८.२ हिवरे बाजार: परिचय

८.३ हिवरे बाजार: लोककेंद्रित विकास आणि सर्वसमावेशकता

८.४ मेंढा लेखा: परिचय

८.५ मेंढा लेखा:स्थानिक उद्योग आणि व्यवस्थापन

८.६ सारांश

८.७ सरावासाठीचे प्रश्न

८.८ संदर्भ

## ८.० उद्देश

- प्रस्थापीत विकास संकल्पनेची चिकित्सा करणे.
- लोककेंद्रितविकासाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देणे.
- आर्थिक, राजकीय आणि सामाजिक समस्या समजून घेऊन त्या कशा प्रकारे सोडविल्या जातात याचे आकलन विद्यार्थ्यांना करून देणे.
- विद्यार्थ्यांमध्ये गाव विकासाची आणि स्वयंरोजगाराची तत्वे रुजविणे.

## ८ .१ प्रस्तावना

मानवाच्या उत्पत्तीपासून ते आधुनिक समजापर्यंत अनेक बाबतीत स्थित्यंतर घडून आले आहे. प्रामुख्याने प्रबोधन काळापासून मानवाने आपल्या स्थितीशील अवस्थेचा त्याग करून गतिशील अवस्था धारण केली. विकासाची अनेक रूपे आज वर मानवाने अनुभवली आहेत. भांडवलशाही समाज भौतिक विकासाला प्राधान्य देतो पण हा विकास एकांगी ठरत असल्याने अनेकदा त्याची चिकित्सा देखील केली जाते. शिवाय नैसर्गिक समतोल राखण्याचे आव्हान उभे राहते. अशा परिस्थितीत लोककेंद्रित विकासाची आवश्यकता निर्माण होते.

विकासहा अर्थ केंद्रित नसावा तर तो लोककेंद्रित असावा आणि पर्यावरणाला त्यामध्ये शिखर स्थानी ठेवले तरच तो विकास शाश्वत विकास समजला जातो. दिवसेंदिवस वाढत जाणारे प्रदूषण व त्यातून होणारा निसर्गाचा ऱ्हासतसेच समाजातील दुर्बल घटकांवर होणारा

नकारात्मक परिणाम याला आळा बसणे खूप महत्वाचे आहे. म्हणून विद्यमान समाजात समजला जाणारा विकास हा खरच विकास आहे का असा प्रश्न पडतो. निसर्ग समतोल राखणे व समाजातील दुर्बल घटकांचे सीमंतीकरण न होण्यासाठी सर्व समावेशक विकास हाच एक पर्याय मानवासमोर आहे.

डेनीअल लर्नर यांच्या मते, आपण आज भांडवलशाही विश्वात जगत आहोत.औद्योगिकरण आणि त्यातून घडून येणारे आधुनिकीकरण हेच आज चे तत्व बनले आहे. प्रस्थापीत विकासाची प्रतिमाने समाजातील सर्वच घटकांना एकत्रितपणे विचारात घेण्यात असमर्थ ठरत आहेत. पर्यावरण आणि समाजातील सीमांतीक घटकांना मात्र विकास प्रक्रियेतून प्रत्यक्ष आणि प्रत्यक्षपणे होणाऱ्या नकारात्मक परिणामांना सामोरे जावे लागते. औद्योगीकरणातून होणारे प्रदूषण पर्यावरणासाठी घातक ठरत आहे व अशा प्रकल्पांच्या स्थापनेसाठी स्थानिक समुदायांना विस्थापित केले जाते. त्यातून पुढे अनेक प्रकारच्या समस्या उद्भवतात.

महाराष्ट्रातील हिवरे बाजार व मेंढा लेखामात्र मानव केंद्रितविकासाची सर्व समावेशक प्रतिमाने आहेत. शासनावर अवलंबून न राहता गावातील सर्व ग्रामस्थांना विश्वासात घेऊन परस्परांना सहकार्य करून अपेक्षित यश कशा प्रकारे मिळविले जाते हे या दोन्ही उदाहरणामधून दिसून येते.भारत हा प्रामुख्याने खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये स्वयंरोजगार निर्मिती, पर्यावरणपूरक विकास आणि समाजातील सर्व घटकांना विचारात घेऊन पुढे जाण्याची नितांत आवश्यकता आहे. सद्यकालीन समाजातील ज्वलंत समस्या व त्यांची कारणे जाणून घेणे, त्यावर स्थानिक पातळीवर योग्य ते नियोजन करणे व त्यातून सर्वांगीण विकास घडवून आणणे हे आज च्या पिढीसाठी महत्वाचे सूत्र आहे. हिवरे बाजार व मेंढा लेखा ही अशाच अभूतपूर्व प्रयोगाची नांदी म्हणून आपण विचारात घेऊ शकतो.

## ८.२ हिवरे बाजार: परिचय

महाराष्ट्रातील अहमदनगरपासून अवघ्या १६ किमी अंतरावर अंदाजे 1200 लोकवस्तीचं असणारे हिवरेबाजार गाव बहुचर्चित आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता असे दिसून येते की, प्राचीनकाळात येथे हत्ती, घोड्यांचा बाजार भरला जायचा व या बाजारामुळेच गावाच्या नावामागे बाजार हा शब्द वापरला जाऊ लागला. १९७२ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. साहजिकच त्याचा नकारात्मक परिणाम हिवरे बाजारवरदेखील झाला. शेती आणि शेतीपूरक व्यवासायांवर अनिष्ट परिणाम झाल्याने गावात चरितार्थाचे साधन उरले नाही, बेरोजगारी वाढली, अनेकजण व्यसनाधीन झाले आणि एकूणच गावातील स्थिरता आणि शांतता नाहीशी झाली. अशाचनकारात्मक वातावरणात हे गाव सुमारे १५वर्ष जैसेथे अवस्थेत होते. नागरीकरणाचा अनिष्टपरिणाम गावावर देखील दिसून आला.

तत्कालीन गावातील तरुणपिढी नोकरी व्यवसाय निमित्ताने शहरांकडे वळली होती. गावात अनेक प्रश्न भेडसावत होते जसे की, शेतमालाला मिळणारा कमी भाव, अपुऱ्या सिंचन सुविधा, पावसाची अनिश्चितता, बेरोजगारी, व्यसनाधीनता, अस्वच्छता, स्थलांतर

यासारख्या समस्यांनी इतर गावांप्रमाणे या गावाला ही ग्रासलं होत. मात्र १९८९साली पोपटराव पवार सरपंच झाले. गावाचा कायापालट करण्याचा त्यांनी निर्धार केला व त्यामध्ये त्यांनी महत्वाची भूमिकादेखील बजावली. पदव्युत्तर पदवी शिक्षण घेतलेले गावातील ते एकमेव व्यक्ती होते. गावात अनेक समाजोपयोगी कामे त्यांनी ग्रामस्थांना हाताशी घेऊन पूर्ण केली.

**आपली प्रगती पहा:**

१. विकास संकल्पना स्पष्ट करा.

२. हिवरे बाजार चा थोडक्यात परिचय करून द्या.

## ८.३ हिवरे बाजार: लोककेंद्रित विकास आणि सर्वसमावेशकता

शाश्वत विकासाची कास धरून स्वच्छ आणि सुंदर गाव कसे निर्माण केले जाते याचे उत्तम उदाहरण हिवरे बाजार. ग्रामसभा केवळ कागदावर न घेता प्रत्यक्षात गावातील समस्या लक्षात घेऊन त्यांना कसे सोडविता येईल यासाठी नियोजन केले जाऊ लागले. ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांची उपस्थिती वाढावी म्हणून विशेष प्रयत्न करण्यात आले. सभेसाठी ग्रामस्थांचा उत्तम प्रतिसाद मिळू लागला व ग्रामसभेतील ग्रामस्थांची उपस्थिती उत्तरोत्तर वाढत गेली आणि परिणामी, त्यांच्यात सामाजिक बांधिलकी निर्माण झाली. शिक्षणाची गरज आणि महत्व ओळखून व गावातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेर जावे लागू नये म्हणून माध्यमिक शाळा सुरु करण्यात आली.

**जल व्यवस्थापन:**

सर्वप्रथम गावातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पाणलोट क्षेत्रावर काम करण्याचे निश्चित केले गेले व त्यासाठी सर्वग्रामस्थांनी एकत्रयेऊन योगदानदिले. केवळ शासकीय आश्वासन आणि मदतीवर विसंबूनन राहता प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. पावसाचं पाणी अडवण्यावर भर दिला जाऊ लागला, त्यासाठी चर, पाझर तलाव खोदण्यात आले तसेच शेत तळी निर्माण केली. पाणी अडवा - पाणी जिरवा ही मोहीम यशस्वीरित्या राबविली गेली व त्यामुळेच गावातील जलस्त्रोतांची पाण्याची पातळी देखीलवाढली. परिणामी दुष्काळाला दूर ठेवण्यात गाव यशस्वी झाले.

**वृक्ष लागवड आणि संवर्धन:**

गावात वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाचे काम होऊ लागले. सभोवतालच्या डोंगराळ प्रदेशावर वृक्षांची लागवड केली गेली. प्रत्येक माणसाने किमान एक झाड लावावे असा निश्चय केला गेला शिवाय मरण पावलेल्या व्यक्तीच्या नावे एक झाड लावून व त्याचे संवर्धन केले जाते. गावाने जशी पाण्याची समस्या सोडविली तसेच आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, शेती प्रश्नाच्या समस्या सोडविण्यासाठी देखील सकारात्मक पावले उचलली. गावातील लोक आप-आपसातले मतभेद विसरून पोपटराव पवारांच्या मागे एकजुटीने उभे होते व त्यातूनचही सारीफल निष्पत्ती झाली.

**कृषी व्यवस्थापन व पूरक व्यवसाय:**

शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण देण्यात येते. कृषी विषयक अभ्यास करून योग्य नियोजन आखून पिके घेतली जातात. शेती पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसायाला चालना देण्यात आली आहे. गावात दुध डेअरीची स्थापना करण्यात आली. दुधउत्पादनाचे प्रमाण अलिकडील काही वर्षात कमालीचे वाढले आहे. दुधामध्ये भेसळ होऊ नये म्हणून त्याची गुणवत्ता परीक्षण (Quality Check) देखील करण्यात येते. जनावरांसाठी चारा डेपो तयार करण्यात आल्याने गावातील जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध होतो. शिवाय गावात पशुवैद्यकिय दवाखाना उभारण्यात आला आहे.

**आर्थिक स्थिती व साक्षरता:**

गावातील लोकांचा आर्थिकदर्जा अतिशय चांगला आहे, ग्रामस्थ संपन्न आणि सुस्थितीत जीवन जगत आहेत. गावाची साक्षरता विचारात घेतली तर सुमारे ९५% साक्षरता आहे. आज भारतात बेरोजगारी एक ज्वलंत समस्या आहे पण हिवरेबाजारमध्ये एकही बेरोजगार नाही किंवा एकही माणूस गावातून स्थलांतरीत होत नाही. उलट गावसोडून गेलेले लोक पुन्हा गावी परतले आहेत.

गावात बहुतांशी घरांमध्ये शोषखड्डे आहेत तर सर्व घरात सांडपाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. गावाने कपडे धुण्यासाठी सार्वजनिक धोबीघाट बांधले आहेत. याधोबी घाटातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचे शुद्धीकरण करून ते पाणी फळबागांना देण्यात येते. पावसाचे प्रमाण मोजणे, पाण्याचा साठा मोजणे, पिकांची यादी तयार करणे ही सर्व कामे गावातील शालेय विद्यार्थी करतात. गाव विकासाची प्रेरणा पुढील पिढीमध्ये रुजली जावी म्हणून त्यांना देखील विविध उपक्रमांमध्ये समावेश करून घेतले जाते.

अन्य काही बाबींमध्ये ही गावाचे वेगळेपण दिसून येते जसे की, गावात तंटानाही, दारूबंदी आणि गुटखाबंदी केली आहे व त्याची काटेकोरपणे अंबलबजावणी केली जाते. विवाहापूर्वी मुला-मुलींची एच.आय.व्ही चाचणी करणे बंधनकारक आहे, गणपती व नवरात्री सारखेसण – उत्सव साजरे करताना पर्यावरणाचे भान राखले जाते. जल प्रदूषण होऊ नये म्हणून प्रतीकात्मक छोट्या मूर्तीचे विसर्जन केले जाते व निर्माल्याचे एकत्रीकरणकरून खत म्हणून वापरले जाते. ओला आणि सुका कचरा वेगळा केला जातो. त्यापासून गांडूळ तसेच कंपोस्ट खत तयार करण्यात येते. अनेक ठिकाणांहून आज समाजसेवक, विद्यार्थी, संशोधक, पर्यटक, पर्यावरणतज्ञ व्यक्ती गावाला भेट देण्यासाठी सातत्याने येत आहेत.

**हिवरे बाजारला पुढील पुरस्कारांनी गौर विण्यात आले आहे:**

- महाराष्ट्र शासनाचा आदर्श गाव पुरस्कार 1995
- महाराष्ट्र शासनाचा यशवंत ग्राम पुरस्कार 2000
- भारत सरकारचा निर्मल ग्राम पुरस्कार 2007
- भारत सरकारचा वन ग्राम पुरस्कार 2007

- भारत सरकारचा राष्ट्रीय जल पुरस्कार 2007
- संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान पुरस्कार 2007
- महात्मा गांधी तंटामुक्त ग्राम पुरस्कार 2008
- राजमाता जिजाऊ पुरस्कार 2012

## ८.४ मेंढा लेखा: परिचय

मेंढा लेखा महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्ह्यातील लहानसे गाव आहे. लोकसंख्या सुमारे ४७३ असून तालुक्याचे गाव धानोरा केवळ ०४ किमी अंतरावर आहे. ग्रामपंचायत कार्यालय लेखा या गावी आहे, मात्र दोन्ही गावाच्या सीमा परस्परांना लागून आहेत. मेंढा लेखा गडचिरोली शहरापासून ३५ किमी अंतरावर वसलेले आहे.गावात ०२ सरकारी शाळा आहेत. व्यावसायिक प्रशिक्षण संस्था व पदवी महाविद्यालय धानोरा या तालुक्याच्या ठिकाणी आहेत. सामुहिक आरोग्य केंद्र गावापासून जवळच ०५ किमी अंतरावर आहे. गावात रस्ते, वीजव पाण्याची व्यवस्था आहे, त्यासाठी एकूण ०७ विहिरी आहेत त्यापैकी ०५ सरकारी तर ०२ खाजगी असून हेंडपंप देखील आहेत. गावात सर्वात जवळील पोस्ट ऑफिस नजीक आहे. गावात सरकारी बस सेवा उपलब्ध असून रेल्वे स्थानक अवघ्या १० किमी अंतरावर आहे तर व्यापारी बँक धानोरा येथे आहे.

गावात एकात्मिक बाल विकास योजना पोषण आहार केंद्र उपलब्ध आहे तसेच ‘आशा’ आरोग्य सेविका आहेत. प्रामुख्याने उत्पादन भात, बांबू, तेंदूपत्ता, मोहाची फुले, मध आणि डिंक इत्यादीचे उत्पादन घेतेले जाते. गावात स्वयं सहायता गट आहेत, त्याद्वारे अनेक उपक्रम राबविले जातात व प्रत्येक गट विशिष्ट उद्दिष्ट समोर ठेऊन स्थापन करण्यात आला आहे. धान्य साठवणूक, जपणूक आणि विक्री तसेच अन्य व्यापारी बाबी देखील अशा गटांमार्फत नियंत्रित केल्या जातात.

**आपली प्रगती पहा:**

१. मेंढा लेखा गावाचा परिचय करून द्या.

## ८.५ मेंढा लेखा:स्थानिक उद्योग आणि व्यवस्थापन:

मेंढा लेखा गावातील लोकांचा निर्धार आपणाला त्यांनी दिलेल्या नाऱ्यातूनच दिसून येते. गावातील लोकांचा नारा ‘दिल्ली मुंबईत आमचे सरकार, आमच्या गावात आम्हीच सरकार’ असा आहे व यातूनच त्यांची भूमिका स्पष्ट होते. गावातील जमीन गावा बाहेरील व्यक्तींना विकता येणार नाही असा नियम आहे. गावातील प्रत्येक शेतकरी एकूण उत्पन्नातील २.५% धान्य कोशात जमा करतात. साठवलेले धान्य संकटसमयी, तसेच लग्न, समारंभ व उत्सवावेळी वापरले जाते. मनरेगा अंतर्गत जलशोषक चार खोदणे, अंतर्गत रस्ते, अस्थायी रोप वाटिका, मिश्र रोपवन, दगडी बंधारे इत्यादी कामे केली जातात. जंगलातून मध गोळा करून त्याची विक्री केली जाते. मेंढा लेखामध्ये बांबू उद्योग हा सर्वाधिक महत्वाचा असून या उद्योगामुळेच हे गाव अतिशय प्रसिद्ध आहे.

**आपली प्रगती पहा:**

१. उद्योग आणि व्यवस्थापनातील मेंढा लेखाची भूमिका स्पष्ट करा.

**बांबू उद्योग आणि चळवळ:**

देवाजी तोफा हे या चळवळीचे प्रणेते कारण त्यांच्या नेतृत्वाखाली जंगल जमीनी वरील हक्काची चळवळ कार्यन्वित राहिली. वयाच्या २३ वर्षापासून ते यामध्ये लढ्यामध्ये सक्रीय आहेत. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिष्ठान देणारा हा अभूतपूर्व प्रयोग आहे. 'वन व्यवस्थापन व ग्राम स्वराज' हे त्यांचे मुलभूत तत्व आहे. देवाजी तोफा मात्र हे सर्व श्रेय ग्रामस्थांना देतात. शासनाच्या आश्वासन, भाषणावर अवलंबून न राहता व केवळ घोषणाबाजी न करता जमिनीवर प्रत्यक्षपणे कसे काम केले जाते हेच त्यांनी त्यांच्या कृतीतून दाखवून दिले आहे. या चळवळीचा प्रारंभ १९८० च्या दशकात झाला. वन अधिकाऱ्यांमार्फत गावातील लोकांना जंगलात प्रवेश नाकारला जात असे. जंगलातून बांबू किंवा इतर काडी फाटा आणला तर अटक करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

१९२७ साल चा ग्राम वन कायदा स्थानिकांच्या हिताचा होता पण त्याची अंबलबजावणी नीट झाली नाही. सदर कायद्यान्वये कलम २८ मध्ये असे नमूद करण्यात आले होते की, गावातील सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन संबंधित जंगलाविषयीचे नियम बनवतील व त्या नियमावलीला राज्य सरकार मान्यता देईल. मात्र कुणीही त्याचा परिपूर्ण अभ्यास केला नाही व ग्रामस्थ त्यापासून अनभिज्ञ राहिले. जंगलाशिवाय मेंढा लेखा मधील लोक जगणार कसे? हा प्रश्न अनुत्तरीत होता कारण सर्व गोष्टी वन विभागातर्फे निश्चित केल्या जात असत. जंगल जमीन हेच एकमेव मेंढा लेखा गावातील लोकांचे जगण्याचे साधन होते. ते मिळविण्यासाठी केलेल्या संघर्षातून गावाला सुमारे १८०९.६१ हेक्टर इतकी जमीन मिळाली आहे. आता तेथील जंगल जमिनीवर तेथील ग्रामस्थांचा हक्क व अधिकार आहे. पूर्वी केवळ बांबू कटाई गावकरी करत असत मात्र आता विक्री देखील करत आहेत.

Forest Right Act 2006 नंतर त्यांना हक्क मिळाला कारण प्रथम गावातील लोकांनी हा कायदा समजून घेतला व मग न्यायासाठी लढा दिला. सदरचा दावा १८०९.६१ हेक्टर जमिनीवर मालकी हक्काच्या संदर्भात केला होता व १००% मंजूर झाला व ग्रामस्थांना यश प्राप्त झाले. हिंसक परिस्थितीमध्ये देखील लोकशाही मार्गाने देवाजी तोफा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे प्रत्यक्षात करून दाखविले होते. कारण वन अधिकारी आणि ग्रामस्थ यांच्यात नेहमीच संघर्ष होत असे. मात्र नंतर ग्रामस्थांना अनेक शासकीय अधिकारी व जन प्रतिनिधींना आपल्या बाजूने वळविण्यात यश मिळाले. माजी आमदार नामदेव हुसैन, तत्कालीन पर्यावरण संचालिका सुनीता नारायण व इतर मानव्यवरांना आपल्या बाजूने करण्यात ग्रामस्थ यशस्वी झाले होते. गावात तत्कालीन पर्यावरण मंत्री जयराम रमेश व मुख्यमंत्री देखील येऊन गेले आहेत. देवाजी तोफा म्हणतात की, गावात Election नाही तर Selection होते. गावाला त्यांनी राजकारणापासून पूर्णतः दूर ठेवले आहे. बांबू च्या उत्पादनापासून गावाला एका वर्षात सुमारे १ कोटी १५ लाख रुपये इतकी मोठी रक्कम मिळते. महत्वाचे सर्व निर्णय केवळ ग्राम सभेतच ठरविले जातात. त्यात ग्राम सभा आणि अभ्यास मंडळ असे दोन स्वतंत्र रचना आहेत. अभ्यास मंडळात केवळ एखद्या प्रस्तावाची

चर्चा व चिकित्सा करायची मात्र निर्णय घायचा नाही तर निर्णय केवळ ग्राम सभाच घेऊ शकते असा प्रमुख नियम आहे.

ग्राम सभेने स्वत:ची नियमावली तयार केली आहे. त्यानुसार, कुणीही एकट्याने किंवा ग्राम सभेची परवानगी न घेता जंगलातून काडी फाटा किंवा बांबू आणू नयेत. जंगलात जाण्याची परवानगी केवळ ग्राम सभाच देईल. ग्राम सभेची परवानगी मात्र प्रत्त्येकावर बंधकारक असेल. अशा प्रकारे गावातील लोकांनी स्वत:च स्वत:साठी काही नियम तयार केले आहेत. प्रत्येकी चार लोकांचे गट तयार केले असून ते जंगलाचे रक्षण करतात. त्या गटात महिला व पुरुष दोघांचाही समावेश केला जातो. संपूर्ण क्षेत्रामध्ये (१८०९.६१ हेक्टर) हे तयार केलेले गट नियोजनानुसार रोज फिरतात, जंगलाचे बारकाईने निरीक्षण करतात व त्यासाठी एक रजिस्टर ठेवले आहे. सकाळी जाताना व संध्याकाळी आल्यावर तेथे नोंद करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये दिवसभरात जे अनुभव आले, जंगलात कोणत्या गोष्टींचे निरीक्षण केले इत्यादी चा अहवाल लिहिला जातो. 'जंगल आमची आई आहे, तीच आमच पोट भरते' ही भावना गावातील प्रत्त्येकामध्ये आहे.

जंगलातील बांबूची ग्रामस्थ स्वत: कटाई व विक्री करतात तसेच संबंधित व्यापारी बांबू उत्कृष्ट प्रतीचा असल्याचे सांगतात. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ञ डॉ. माधव गाडगीळ, वृक्षमित्र संघटनेचे संयोजक मोहन हिराभाई हिरालाल व इतर तज्ञ व्यक्तींची साथ देखील गावाला मिळाली आहे. देश-विदेशातील अनेक विद्यापीठातील लोक गावाच्या संपर्कात आहेत. शिवाय अनेक विद्यापीठात देवाजी तोफा यांना मार्गदर्शन करण्यासाठी देखील बोलाविले जाते. 'प्रत्त्येक गावात काम आणि कामाला योग्य दाम' असे त्यांचे तत्व आहे. दक्षिण आफ्रिकेमध्ये देवाजींना बोलाविण्यात आले होते व तिथे त्यांनी गोंडी भाषेतून संवाद साधला होता. पुढील पिढी साठी संसाधन सुरक्षित ठेवणे हेच आपले आद्य कर्तव्य आहे असे ते मानतात.

**आपली प्रगती पहा:**

१. मेंढा लेखा मधील बांबू उद्योग चळवळीवर चर्चा करा.

**जैव विविधता संवर्धनातील भूमिका:**

सदर चळवळीचा परिणाम केवळ सामाजिक, आर्थिक व राजकीय झाला नसून पर्यावरणीय देखील झाला आहे. जंगल सुरक्षित राहिल्याने जैव विविधतेचे संरक्षण झाले आहे. जंगलातील प्राण्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. अस्वल, हरीण, सांबर, रान डुक्कर व बिबटे यांची संख्या वाढली असून त्यांचा स्थानिकांना अद्याप कोणत्याही प्रकारचा त्रास झालेला नाही. जंगलात आढळून येणारी माहु ची पाने अनेक ठिकाणी म्हणजेच पत्रावळी, सुत निर्मिती आणि औषधासाठी त्यांचा उपयोग केला जातो. जंगलातील वारुळाच्या मातीपासून भिंत आणि कौले तयार केली जातात. मेंढा लेखा मधील पूर्वीची व आत्ताची सामाजिक आर्थिक परिस्थिती पाहता त्यात अमुलाग्र बदल झालेला दिसून येतो, त्यासाठी गावातील लोकांनी केलेला संघर्ष मानव व निसर्गाचे अतूट नाते दर्शवितो.

**आपली प्रगती पहा:**

१. जैवसंवर्धनातील मेंढा लेखा चे योगदान स्पष्ट करा.

## ८.६ सारांश

विकास साधत असताना पर्यावरण आणि सामाजिक सर्व घटकांना देखील न्याय देता येतो हे आपण वरील विश्लेषणातून दिसून येते. पोपटराव पवार आणि देवाजी तोफा हे आजच्या पिढीसाठी आदर्श आहेत.प्रतिकूल परिस्थितीत अपेक्षित यश कसे संपादन करायचे हे आपण वरील दोन्हीही उदाहरणातून अनुभवू शकतो.निसर्गपूजा हा भारतीय संस्कृतीचा भाग आहे. मात्र आधुनिक जीवनशैलीत केवळ नैसर्गिक संसाधनांचा उपभोग घेण्याच्या प्रवृत्तीमुळे अनेक समस्या उद्भवल्या आहेत. आज मानव आत्मकेंद्रित बनला आहे, स्वत:च्या गावाचा, आप्तेष्टांचा त्याला विसर पडला आहे. नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने गाव सोडून शहरात जाऊन स्थायिक होणे व त्याला प्रगती समजणे ही मानसिकता आज सर्वत्र दिसते. मात्र हिवरे बाजार आणि मेंढा लेखा हे अशा मानसिकतेला अपवाद ठरले आहेत. या दोन्ही उदाहरणातून आपण कायशिकू शकतो व आपल्या पातळीवर आपण काय करू शकतो याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. मानवी समाजाला आपल्या सद्यकालीन प्रचलित विकासात्मक प्रतीमानांचे चिकित्सक परीक्षण करून त्यात अमुलाग्र बदल करणे आज काळाची गरज आहे.

## ८.७ सरावासाठी प्रश्न

१. 'हिवरे बाजार: एक आदर्श गाव' यावर संविस्तर भाष्य करा.

२. हिवरे बाजारमधील सर्वांगीण परिवर्तन कसे घडून आले, ते संविस्तर सांगा.

३. मेंढा लेखामधील स्थानिकांनी जंगलजमिनीवरील हक्काबाबत केलेल्या संघर्षाचे संविस्तर विवेचन करा.

४. लोककेंद्रित विकासातील मेंढा लेखा चळवळीचे योगदान स्पष्ट करा.

## ८.८ संदर्भ

१. Anand, Rahul. (2010). "Hiware Bajar: Model Village for the Nation." The Better India.

२. Bokil, Milind. (2012). "Gosht Mendha Gavachi." Mouj Publication.

३. Chesters, Greame. and Welsh, Ian. (2011). Social Movement: The Key Concepts, Routledge Publications: New York.

४. Gadgil, Madhav. and Guha, Ramchandra. (1995). Ecology and Equity, Routledge Publication: New York.

५. Singh, Shivbahal (2010), “Vikas ka Samajshastra”, Rawat Publication.

६. The Times of India. (March, 2011). “Panchayati Raj training centre to come up at Hiware Bajar.”

७. http://kalpavriksh.org/mendha-lekha-village

८. https://mr.vikaspedia.in

९. https://wikipedia.org

१०. https://youtube.be/lfdjubjdMtc

११. https://mr.m.wikipedia.org

१२. https://youtu.be/hRsdJTmKsF4


❖❖❖❖